म. ग्रं. सं. ठाणें
विषय
ग्रं. नं. १८५८

६०

# शिवराजलीला.

म. ग्रं. सं. ठाणें

विषय

संग्रहालय क्रमांक

लेखक

पुस्तकाचें नांव

सन

कें. कार्यालय २८८

ग्र. १७८८

# SHIVARÁJALILÁ.

THIS POETICAL WORK.

IS COMPOSED AND PUBLISHED

BY

**KESHAVA LAKSHMAN JORVEKAR,**
Head-Master English-Marathi School, at Darva.
**WOON DISTRICT, BERAR.**

*(Registered under act XXV of 1867.)*

Bombay:
Printed at the "Dnyan Dipaka Press."
BY OOKERDABHOY SEWJEE.

1874.

(Right of Translation &c. reserved.)

*Price* 12 *annas.*

# शिवराजलीला.

दिंडी

॥ सुप्रबंधीं सुरसाळ राजलीला ॥
॥ हेमकुंभीं पीयूष सन्मतीला ॥
॥ दिव्य कांचन शिवरत्नकोंदनाला ॥
॥ मरंदालय कीं रसिक मिलिंदाला ॥

हा ग्रंथ,

**केशव लक्ष्मण जोरवेकर,**

हेड मास्तर, इंग्रजी मराठी शाळा,

दारव्हा, जिल्हा वणी, प्रांत वऱ्हाड;

ह्यांनीं केला तो,

**मुंबईंत**

ज्ञानदीपक छापखान्यांत छापिला.

हें पुस्तक सन १८६७ च्या २५ व्या आक्ताप्रमाणें नोंदिलें आहे व भाषांतर करणें वगैरे सर्व प्रकारचे हक्क ग्रंथकर्त्यानें स्वाधीन ठेविले आहेत. सन १८७४ इ०

**किंमत १२ आणे.**

# प्रस्तावना.

श्रीमच्छत्रपति शिवाजीमहाराज मराठ्यांच्या गादीचे मूळपुरुष ह्यांचें चरित्र ह्या ग्रंथांत पद्यरचनेनें वर्णन केलें आहे.

सर्व हिंदुस्थानभर मुसल्मानांचा अमल होऊन एतद्देशीय लोकांस अत्यंत त्रास होऊं लागला, व अन्याय आणि अनीति हीं सर्वत्र व्याप्त झालीं. मोठमोठ्या हुद्यांच्या जाग्यांवर मुसल्मान लोक होते ते द्रव्यलोभानें हिंदुलोकांस लुटीत व नानाप्रकारचीं अनन्वित कर्मे करीत. अतिशय क्रूर शिक्षा लोकांस देऊन त्यांच्या धर्मसंबंधी कृत्यांमध्यें विनाकारण विघ्नें उत्पन्न करीत. अधिकाऱ्यांची अशी वर्तणूक पाहून दुसरे सुखवस्तु राहिलेले यवनही गरिबगुरिबांस पीडा देऊं लागले, व त्या संकटाची दाद कोठेंही लागेनाशी झाली. यवनांपासून आह्मास कष्ट होतात असें कोणीं ह्मटलें तर त्यास शिक्षा होत असे. अशा रीतीनें सर्व प्रकारें त्रास झाल्यामुळें सर्व देशभर हाहा:कार झाला होता.

अशा समयास शिवाजीमहाराज प्रकट होऊन त्यांनीं त्या दुष्ट अविंधांचें पारिपत्य केलें, व सर्व देशांत स्वधर्म करून स्वराज्याची स्थापना केली. पुढें आपल्या पदरी, मोठमोठे विद्वान् व देशकल्याणहितेच्छु लोकांचा

समाज बाळगून त्यांच्या साह्यानें जी उत्तम राज्यव्यवस्था कालदेशवर्तमान लक्ष्यांत आणून केली, तिच्या योगानें सर्व देशांतील लोकांस सुखाचा अनुभव प्राप्त झाला.

या देशांत असा देशाभिमानी पुरुष झालाच नाहीं. ह्यानें आपला संसार सोडिला, आपलीं शारीर सुखें सोडिलीं, आणि हिंदूंच्या मानेवरील दुष्ट यवनांचे जूं काढावें, ह्याच उद्देशानें आपलें शिर हातावर घेऊन, व अत्यंत संकटें भोगून, आपल्या देशबांधवांकरितां स्वतंत्रतारूप मंदिर बांधिलें. परकीय राजे आमचा परिणाम कसा लावितील अशा प्रकारची हिंदुलोकांस पडलेली धास्ती ह्यानें समूळ नाहींशी केली; व सर्व लोकांस आपआपल्या श्रमाचें फळ बिनघोर मिळावें अशा प्रकारची उत्तम राजनीति चालू केली.

इ० स० १००० पासून ह्मणजे यवनांचा पाय हिंदुस्थानांत शिरूं लागल्यापासून या भूमिकेच्या पोटीं मातृभक्त असें हेंच बालक निपजलें. ह्यानें आपल्या बाहुप्रतापानें आपल्या मातेचे पांग फेडिले, व आपल्या बांधवांस महत्संकटांतून मुक्त केलें. ह्या अद्वितीय बालकानें जेव्हां आपल्या बंधूंचे कष्ट अवलोकन केले, व त्यांचें निरसन करण्याचा दृढ निश्चय केला, तेव्हां त्याचा वर्तनक्रम कसा झाला, व त्यानें कोणत्या गोष्टींत सुख मानिलें ह्याविषयीं वर्णन केलें आहे त्यापैकीं थोडें येथें दाखवितो.

श्लोक (वसंततिलका.)

॥ ज्याला अविंधवध ही अट भोजनाला ॥

॥ त्याला स्वदेशहित जीवन जीवनाला ॥
॥ घालावया कवच अंबर दिव्य ज्याला ॥
॥ त्याला असे समरमंदिर वीरजाला ॥
॥ ज्याला द्विजावन महा सुख सत्तमाला ॥
॥ त्याला अमोल यशमौक्तिक भूषणाला ॥
॥ जाया जया निजसखी तरवार राया ॥
॥ न्हाया स्वदेशरिपुशोणित तें नृपा या ॥
॥ छाया करी नृपति जो द्विजगो सुखाया ॥
॥ हा आमुच्या धरणिचा सुत योग्य गाया ॥

असो अशा ह्या देशाभिमानी महाराजांचें चरित ऐकतांना ज्याच्या डोळ्यांवाटे अश्रुधारा चालणार नाहींत, व ज्याच्या अंगावर रोमांच उभे राहणार नाहींत असा हिंदु कोण आहे ?

ज्यांस त्या वेळच्या कालदेशवर्तमानाची कल्पना करितां येत नाहीं, व ज्यांस हिंदुधर्माचें रहस्य बिलकुल समजत नाहीं, असे कित्येक परदेशस्थ लोक, शिवाजी राजानें जीं महत्कृत्यें केलीं तीं राज्यलोभार्थ केलीं असें ह्मणतात, परंतु त्यांचें तें ह्मणणें अगदीं अज्ञानाचें आहे. शिवाजीमहाराजांची वृत्ति किती निरभिमान व श्रद्धालु होती, हें रामदासस्वामींच्या चरित्रांत जें लिहिलें आहे त्यावरून स्पष्ट दिसून येतें. पुष्कळ मुलुख हस्तगत झाल्यावर महाराजांनीं आपलें सर्व राज्य स्वामींस अर्पण केलें, आणि आपण त्यांच्या अनुयायीवर्गांत राहून भिक्षेवर उपजीवन करूं लागले. पुढें स्वामींनीं तूं माझा शिष्य

ह्मणजे पुत्राप्रमाणें आहेस, ह्याकरितां हें राज्य माझें असें समजून ह्याचें रक्षण कर, इत्यादि पुष्कळ रीतींनीं त्यांस समजाविलें, परंतु महाराज ऐकेनात. त्यांचें म्हणणें होतें कीं, भूभार हरण करावा व गोब्राह्मणांस सुखी करावें एवढाच माझा कार्य भाग होता, तो स्वामींच्या कृपेंकरून शेवटास गेला, आतां मला कांहीं कर्तव्य राहिलें नाहीं. राज्यसुखोपभोग घेऊन नरकाचें साधन कोणीं करावें? असें महाराजांचें ज्ञानवैराग्यसंपन्न भाषण ऐकून स्वामींस गहिंवर आला, व त्यांनीं महाराजांस देहाभिमान घालविण्याकरितां सुवर्णतुला ब्राह्मणास देण्याचा विधि सांगून, व आपल्या पादुका गादीवर स्थापन करण्यास देऊन, मोठ्या आग्रहानें त्यांस राज्याभिषेक केला.

आंता ह्या गोष्टी जरी भाविकपणाच्या आहेत तथापि ह्यांचा विचार केला असतां, महाराजांचें मन किती कोमल होतें, किती दयार्द्र होतें, आणि स्वधर्माकरितां व स्वदेशकल्याणाकरितां किती तट्तटां तुटत होतें, अशाविषयींचे त्यांचे त्द्गत लेख आपणास ज्ञानदृष्टीनें वाचतां येतात. आणि असे गुप्त लेख वाचल्यापासून त्यांच्या स्वरूपाचें जसें आपणास निश्चयात्मक व यथायोग्य अनुमान करितां येतें, तसें परकीय लोकांनीं दोषदृष्टीनें लिहिलेल्या इतिहासांतील बाह्यरंग चरित्रांवरून अनुमान करितां येत नाहीं हें अगदीं स्पष्ट आहे.

ज्या वेळेस मुसल्मानांनीं आपला अमल जोहे ड पूर्णपणें बसविला, व त्यांच्या राज्यांत दग्यादंग्यांची भीति

राहिली नव्हती, अशा वेळेस शिवाजी महाराज एका साधारण सरदाराचे पोटीं जन्मले. तथापि त्यांनीं आपल्या शारीर व मानसिक शक्तींच्या योगेंकरून अघटित घटना केली, व आपले बेत अचुक सिद्धीस नेले. त्यांची चपलता, त्यांचे धैर्यशौर्यादिगुण, त्यांची दूरदृष्टि, त्यांचें कालमानानुसरण, आणि त्यांचा अमोघ बाहुप्रताप, इत्यादि अपूर्व गुणांनीं भरलेलीं चरित्रें वाचून यूरोपियनादि परद्वीपस्थ लोकांसही अतिशय आश्चर्य वाटलें, व महाराज लोकोत्तर पुरुष होऊन गेले असें त्यांनीं आपल्या ग्रंथांत वर्णन केलें. अशा प्रकारचीं अमानुष कृत्यें, ज्याचे अंगीं परोपकारबुद्धि, स्वदेशकल्याणेच्छा, भूतदया, आणि ईश्वरभक्ति, इत्यादि अनुपम गुण नाहींत त्याच्या हातून होत असतात काय ? आणि यदाकदाचित् भगीरथ प्रयत्नांनीं झाल्यास त्यांचा परिणाम उत्तम होत असतो काय ? कधीं नाहीं. तात्पर्य, शिवाजीमहाराजांचें चरित्र आरंभापासून अखेरपर्यंत अगदीं निष्कलंक आहे. परंतु त्याचें प्रतिपादन करणाऱ्या परकीयग्रंथकर्त्यांनीं, कार्यकारणभाव नदाखवितां, हिंदुलोकांविषयीं, व हिंदुधर्माविषयीं, जो त्यांचा स्वाभाविक तिरस्कार, त्याच्या ओघानें तें लिहिलें आहे; ह्यामुळें त्या चरित्ररूप निर्मळ जीवनांत मिथ्यादोषरूपी मृत्तिका कालविली गेली आहे. तथापि तीं चरित्रें ज्यांनीं प्रत्यक्ष डोळ्यांनीं अवलोकन केलीं होतीं, अशा त्या वेळच्या लोकांनीं. महाराज अवतारी पुरुष आहेत, अशी जी खऱ्या मनोभावेंकरून रमणीय मुरली वाजविली आहे, तिचा ध्व-

नि हा कालपर्यंत लोकांच्या कानीं गुणगुणत आहे, व तो मंजुल स्वर इतिहास कर्त्यांच्या अतिशय कर्कश व कठोर स्वरानेंही नाहींसा होत नाहीं.

अशा ह्या अभिनव पुरुषाचें चरित्र कवितेंत वर्णन करण्यास कवि किती उत्तम पाहिजे? खरोखर, जर मोरोपंत, वामनपंडित, रघुनाथपंडित, इत्यादि कवींनीं हें चरित्र वर्णिलें असतें, तर तें प्रेमयुक्त, व नवरसान्वित व यथायोग्य होऊन त्यापासून वाचकांत परम आल्हाद झाला असता. परंतु मजसारख्याच्या दैवीं अशा पुण्यश्लोक राजाचें चरित्र वर्णन करण्यास येऊन काय उपयोग? कारण, एक तर मजमध्यें अशा कामास जशी कविताशक्ति असावी तशी नाहीं, व दुसरें इतिहास कर्त्यांनीं सर्व लोकांच्या मनांत महाराजांचे दोष इतके पक्के ठसवून दिले आहेत कीं, त्या मनांवर आतां, मजसारख्या अनभ्यस्त कवीच्या हातून निर्मळ यशाचा ठसा उमटणें अगदीं अशक्य होऊन गेलें आहे.

तथापि हा ग्रंथ रसभरित व मनोरंजक होण्याविषयीं मी आपल्याकडून अतिशय श्रम केले आहेत, व काळही पुष्कळ खर्च केला आहे. आतां माझ्या श्रमांचें सार्थक्य कितपत झालें आहे हें सांगण्याचें काम वस्तुतः माझें नव्हे, तें माझ्या प्रिय वाचकांनींच केलें पाहिजे. आणि जर त्यांजकडून हा माझा ग्रंथ त्यांच्या मनोरंजनास कांहींच अंशीं साधनीभूत होतो, असें मी ऐकेन तर माझे परिश्रम पूर्णपणें मला फलद्रूप झाले असें मी समजेन.

हा ग्रंथ सुधारण्याच्या कामांत रा० राजश्री विष्णु दाजी गद्रे हेडक्लार्क गव्हर्मेंट बुकडीपो, मुंबई ह्यांनीं मला अतिशय मदत केली त्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें.

ता० १ माहे मे }
सन १८७४ इ० }

के० ल० जो०
ग्रंथकर्ता.

२००

# अनुक्रमणिका.

## भाग १.

### पृष्ठ १ पासून १२ पर्यंत.

मंगलाचरण—शिवाजीच्या प्रतापाचें वर्णन—त्याच्या पूर्वजांचें वर्णन—त्याच्या गुणांचें वर्णन—शिवनेरी किल्ल्याचें वर्णन—शिवाजीच्या स्वरूपाचें आणि स्वभावाचें वर्णन—त्याच्या नजरेस देशस्थिति कशी आली तें—देवीची स्तुति आणि तिचा साक्षात्कार—(एकून पद्यें ६५)

## भाग २

### पृ० १२ पासून २२ पर्यंत.

शिवाजीचा वर्तनक्रम कसा होता तें—मावळे लोकांशीं त्याचें संभाषण—त्यांना केलेला उपदेश—मुसल्मानांची राज्य करण्याची शैली—मुलुख हस्तगत केला तें—शहाजीस कैद व तीपासून त्याची सुटका—त्यानंतर घेतलेले किल्ले—विजापुरकरांचें मोंगलांशीं युद्ध—त्या वेळ्यां शिवाजीनें केलेले प्रताप—त्यास जिंकण्याकरितां विजापुरकरांची तयारी—(एकून पद्यें ६३)

## भाग ३

पृ० २२ पा० ३४ पर्यंत.

शिवाजीचे धैर्यशौर्यादि गुण—विजापुरच्या बादशाहानें तयार केलेलें सैन्य—अफसुलखानाचें गर्विष्ट भाषण—त्याला पाहून शिवाजीची काळजी—रामदासस्वामींची भेट—व ब्रह्मसाक्षात्कार—अफसुलखानाची स्तुति—गोपिनाथपंताची भेट व एकांत—अफसुलखान आणि गोपिनाथपंत: ह्यांचें रूपक—अफुलखानाच्या भेटीची तयारी—सकाळचें वर्णन—अफसुलखानाचा वध—त्याच्या सैन्याचा नाश व पराजय—(एकून पद्यें ६९)

## भाग ४

पृ० ३४ पा० ४५ पर्यंत.

शिवाजीचें यशवर्णन—रुस्तुमजमानास जिंकल्याचें रूपक—शिरक्यांच्या बागेचें वर्णन—शिवाजीस मेजवानी—सोयराबाईस पाहून शिवाजी मोहित होतो—तिच्या उत्कृष्ट स्वरूपाचें वर्णन—तिजविषयीं शिवाजीची उत्सुकता—शिवाजीचें तिच्याशीं लग्न—तिच्या योगानें शिवाजीच्या गृहास आलेली शोभा—कवीची उक्ति—(ए० प० ६२)

## भाग ५.

पृ० ४५ पासून ५६ पर्यंत.

विजापुरचा बादशाहा शिद्दीजोहरास शिवाजीवर पाठवितो तें—तो शिवाजीस पन्हाळ्याच्या किल्ल्यांत कोंडितो—रामदासस्वामींची किल्ल्यांत भेट—शिद्दीवर

उत्प्रेक्षा—निबिड अंधःकाराचें वर्णन— अंधःकाराची कमाल आणि सैन्यावर चमत्कारिक अन्योक्ति—शिवाजी किल्ल्यांतून निघून जातो—शिद्दीशीं युद्ध—बादशाहा स्वतः युद्धास येतो—वर्षाकाळचें वर्णन—(ए० प० ५६)

## भाग ६.

### पृ० ५७ पा० ६७ पर्यंत.

शिवाजीची कीर्ति—विजापुरचा बादशाहा कर्नाटकांत जातो—सांवत व मुधोळकर शिवाजीवर येतात—त्यांचे परिणाम—बादशाहाचा शिवाजीशीं तह—रायगड किल्ल्याचें वर्णन—शिवाजीच्या मंदिराचें व बागेचें वर्णन—त्याच्या स्वारीचें वर्णन (कटाव) (ए०प० ४० व कटाव१.)

## भाग ७.

### पृ० ६८पा० ७८ पर्यंत.

शिवाजीची योग्यता—मोगलांच्या वाटेस जातो—त्यावर षाइस्तेखान येतो—त्याचा स्वभाव आणि गर्विष्ट वर्तणूक—शिवाजी त्यावर रात्रीं हल्ला करितो—चाकणच्या किल्ल्यावर हल्ला—खानाचे मदतीस जयवंतशिंग येतो—त्याचा पराभव—दुसरा सुलतान माजूम येतो व त्याचा पराभव—तो ब्राह्मणास त्रास देतो—ते शिवाजीकडे येऊन त्यास आशीर्वाद देतात—मोगलांचा धिःकार व त्यांचा मुलुख लुटिला तें—तें ऐकून दिल्लीचा बादशाहा कोपायमान होतो—शिवाजीवर नंतर जयशिंग आणि दिल्लीरखान येतात—(ए० प० ६०)

## भाग ३

पृ० २१ पा० ३४ पर्यंत.

शिवाजीचे धैर्यशौर्यादि गुण—विजापुरच्या बादशाहानें तयार केलेलें सैन्य—अफसुलखानाचें गर्विष्ट भाषण—त्याला पाहून शिवाजीची काळजी—रामदासस्वामींची भेट—व ब्रह्मसाक्षात्कार—अफसुलखानाची स्तुति—गोपिनाथपंताची भेट व एकांत—अफसुलखान आणि गोपिनाथपंत ह्यांचें रूपक—अफुलखानाच्या भेटीची तयारी—सकाळचें वर्णन—अफसुलखानाचा वध—त्याच्या सैन्याचा नाश व पराजय—(एकून पद्यें ६९)

## भाग ४

पृ० ३४ पा० ४५ पर्यंत.

शिवाजीचें यशवर्णन—रुस्तुमजमानास जिंकल्याचें रूपक—शिरक्यांच्या बागेचें वर्णन—शिवाजीस मेजवानी—सोयराबाईस पाहून शिवाजी मोहित होतो—तिच्या उत्कृष्ट स्वरूपाचें वर्णन—तिजविषयीं शिवाजीची उत्सुकता—शिवाजीचें तिच्याशीं लग्न—तिच्या योगानें शिवाजीच्या गृहास आलेली शोभा—कवीची उक्ति—(ए० प० ६१)

## भाग ५.

पृ० ४५ पासून ५६ पर्यंत.

विजापुरचा बादशाहा शिद्दीजोहरास शिवाजीवर पाठवितो तें—तो शिवाजीस पन्हाळ्याच्या किल्ल्यांत कोंडितो—रामदासस्वामींची किल्ल्यांत भेट—शिद्दीवर

उत्प्रेक्षा—निबिड अंधःकाराचें वर्णन— अंधःकाराची कमाल आणि सैन्यावर चमत्कारिक अन्योक्ति—शिवाजी किल्ल्यांतून निघून जातो—शिद्दीशीं युद्ध—बादशाहा स्वत: युद्धास येतो—वर्षाकाळचें वर्णन—(ए० प० ५६)

## भाग ६.

### पृ० ५७ पा० ६७ पर्यंत.

शिवाजीची कीर्ति—विजापुरचा बादशाहा कर्नाटकांत जातो—सांवत व मुधोळकर शिवाजीवर येतात—त्यांचे परिणाम—बादशाहाचा शिवाजीशीं तह—रायगड किल्ल्याचें वर्णन—शिवाजीच्या मंदिराचें व बागेचें वर्णन—त्याच्या स्वारीचें वर्णन (कटाव) (ए०प० ४० व कटाव१.)

## भाग ७.

### पृ० ६८पा० ७८ पर्यंत.

शिवाजीची योग्यता—मोंगलांच्या वाटेस जातो—त्यावर षाइस्तेखान येतो—त्याचा स्वभावं आणि गर्विष्ट वर्तणूक—शिवाजी त्यावर रात्री हल्ला करितो—चाकणच्या किल्ल्यावर हल्ला—खानाचे मदतीस जयवंतशिंग येतो—त्याचा पराभव—दुसरा सुल्तान माजूम येतो व त्याचा पराभव—तो ब्राह्मणास त्रास देतो—ते शिवाजीकडे येऊन त्यास आशीर्वाद देतात—मोंगलांचा धिःकार व त्यांचा मुलुख लुटिला तें—तें ऐकून दिल्लीचा बादशाहा कोपायमान होतो—शिवाजीवर नंतर जयशिंग आणि दिल्लीरखान येतात—(ए० प० ६०)

## भाग ८.

पृ० ७९ पा० ८९ पर्यंत.

जयशिंग व दिल्लीरखान ह्यांचे प्रताप—पुरंदरावरील युद्ध—त्यांच्याशीं शिवाजीचा तह—मोंगलांची चाकरी—दिल्लीशहराचें व बादशाहाच्या दरबाराचें वर्णन—शिवाजी दिल्लीस जातो—बादशाहाचा व त्याचा संवाद—शिवाजी तेथें कैदेंत पडतो—त्या संकटांतून त्याची सुटका—(एकून पद्यें ६४)

## भाग. ९.

पृ० ९० पा० १०१ पर्यंत.

शिवाजी रागानें युद्धाची तयारी करितो—सिंहगडकिल्ल्याचें वर्णन—शीत काळाचें वर्णन—तानाजी मालुसरा सिंहगड घेण्यास जातो—रात्रीचें वर्णन—सैन्यावरील उत्प्रेक्षा—सिंहगडावरील युद्ध—तानाजीच्या मरणास्तव शिवाजीचा शोक—सुलतानमाजुमास जेर करितो—औरंगजेब शिवाजीशीं सल्ला करितो—शिवाजीच्या प्रतापाचें वर्णन—( एकून पद्यें ६३ )

## भाग. १०.

पृ० १०२ पा० ११२ पर्यंत.

शिवाजीची राज्य करण्याची रीति—अष्टप्रधानांविषयीं उत्प्रेक्षा व रूपकें—बहिर्जी जासुदाचें वर्णन—पुन: मोंगलांशीं लढाई ( मोहबतखान )—मोंगलाई वीरांचें

वर्णन—विजापुरकराशीं पुनः युद्ध—प्रतापरावाचा मृत्यु—हंसाजी मोहित्याचा उत्कर्ष—किरकोळ वर्णन व कर्नाटकावरील स्वारी—( एकून पद्यें ५९ )

## भाग. ११.

### पृ० ११३ पा० १२३ पर्यंत.

हंबीररावाच्या कर्नाटकांतील प्रतापाचें वर्णन—त्याचें शिवाजीशीं उत्कृष्ट भाषण—मोंगलांस पूर्णपणें जिंकण्याचा यत्न—युद्ध सुरू करण्याचें कारण—लढाईची तयारी—मोंगलांशीं अतिघोर युद्ध—(कटाव)—(ए०पद्यें ४३ व क०१)

## भाग १२.

### पृ० १२४ पा० १३४ पर्यंत.

लढाईचें वर्णन पुढें चालू—शिवाजीचा पूर्ण उत्कर्ष—युद्ध सुरू असतां शिवाजीच्या स्त्रीयांची काळजी—त्यांच्या विरहाचें वर्णन—शिवाजीशीं त्यांच्या भेटी व आनंद. ( एकून पद्यें ५५ )

## भाग १३.

### पृ० १३५पा० १४६ पर्यंत.

शिवाजीची चौघी स्त्रियांशीं क्रीडा—रामदास स्वामींचें आगमन—राज्याभिषेक व सुवर्णतुलादान इत्यादि—सोयराबाईची विनंति—चौघी स्त्रियांचीं कुलशीलें—शिवाजीच्या पुत्रांचें वर्णन—शिवाजीची व ग्रंथाची समाप्ति—(एकून पद्यें ६३ )

## ग्रंथ लावण्यासाठीं उपयुक्त सूचना.

ह्या ग्रंथांत भूप, नृपति, महीपाल, क्षितीश्वर, तसेच धनुर्धर, चापपाणि, अविंधारि, इत्यादि नामें अगर विशेषणे आलीं तर तीं शिवाजीराजाकरितां आहेत असें समजावें. कधीं कधीं राजासंज्ञक कांहीं शब्द मुसल्मान राजाकरितांही योजिले आहेत, परंतु त्या ठिकाणीं अर्थसंबंधानें अमुक बादशाहा असें सहज कळण्यासारखें आहे. जेथें अर्थाचा बोध चांगला झाला नाहीं तेथें खालीं टिपा दिल्या आहेत.

ह्या ग्रंथांत जितके संस्कृत शब्द व दुसरे अवघड शब्द आले आहेत त्यांचा कोश शेवटीं वर्णानुक्रमानें दिला आहे. कित्येक अवघड सामासिक शब्दांचेही अर्थ कोशांत दिले आहेत. ह्यावरून कोशाच्या आश्रयानें ग्रंथ वाचल्यास आबालवृद्धांसही अर्थ स्पष्ट कळावा अशी व्यवस्था केली आहे. ज्या ठिकाणीं कल्पना फार खोल, व अन्योक्ति वगैरे कठिण विषय आला आहे त्या ठिकाणीं पृष्ठाच्या खालीं टिपा देऊन अर्थ स्पष्ट केला आहे. जेथें शब्दांचे अर्थ लाक्षणिक घ्यावयाचे, व अर्थ नांवांवरून विशेष नामें ओळखावयाचीं आहेत त्या ठिकाणींही टिपा दिल्या आहेत.

के० ल० जो० ग्रंथकर्त्ता.

काव्य ८२

# शिवराजलीला.

## भाग पहिला.

श्लोक. ( पृथ्वी छंद. )

॥ नमीं भुवनसुंदरा सुरवरा सुविद्याकरा ॥
॥ उदार जगदीश्वरा अघहरा कृपासागरा ॥
॥ जडत्वतमसंहरा शुभकरा स्वदासोद्धरा ॥
॥ कवित्वकथना गिरा मधुतरा मला दे वरा ॥१॥

आर्या.

॥ राज्यस्थित राजगडीं श्रीमन्नृपवरशिवाख्य धीरमती ॥
॥ अनुदिन यशीं जयाच्या तत्कथनामृतरसज्ञधी रमती॥ २॥
॥ त्याची कथा कथाया प्रेम मना बहुत वाटतें परिसा ॥
॥बहुगुणराशि धुरंधर क्षितिपति तोंसम न एक गुण परिसा॥ ३॥
॥ उन्मत्त वारणाच्या जैसा अंगीं अनंग रसरसतो ॥
॥ तैसा त्या नृपतीच्या कथनीं शृंगारवीररस रसतो ॥ ४ ॥

श्लोक ( शार्दूलविक्रीडित. )

॥ साजे या अधिकार विप्रभजका या भूमिकापालका ॥
॥ कारुण्याब्धि महा अनन्यगतिका तो तोषवी कामुका ॥
॥ जो रक्षी विशिखा वधोनि जनकातुल्य प्रजाभूमिका ॥
॥ शोभे तत्कथनास काव्यरचना त्या काय हो चूर्णिका॥५॥

॥ ज्याच्या शत्रु वधे विशाल पृतनाअग्रीं यशस्यंदन[१] ॥
॥ राकानायकशा नृपालवदना व्यामोहती अंगना ॥
॥ सेना गुप्त रणास घेइ यवना तो दानवा मर्दना ॥
॥ नाकेश त्रिदिवा तसा शिवधरानाथ प्रजापालना ॥ ६ ॥
॥ नानासंकटसंघ विप्रअवना भोगी महा यातना ॥
॥ नामी ज्या यशगंध पद्मनयना मैलागरूचंदना ॥
॥ नाहीं तुल्य यशोधनास भुवनामाझारिं चंद्रानना ॥
॥ तो नामें शिव तच्चरित्र रसना गावो जना रंजना ॥ ७ ॥
॥ जो पाळी क्षितिगौतमी ह्मणुन जो गोपालसा शोभतो ॥
॥ जो पाणिस्थितखड्ग नित्य समरा जो पाठ देण्या भितो ॥
॥ जो पाडी यवनास धाक, नव्हता लोपावया सारिखा ॥
॥ तो पावे समरीं न तैं रिपु धरी रोपास वा कार्मुका ॥८॥
॥ जो वाजी बहुरंग चाल शिकवी राजीवचक्षु प्रभु ॥
॥ जो गाजी अतुल क्षमापदतलामाजी रची जो विभु ॥
॥ विप्रा जीवन हीन दीन दुबळे यां जीविका देतसे ॥
॥ जो आजींस करी असंख्य नृप तो गाजी शिवाजी रसे॥९॥
॥ कोदंडा चिर सज्ज कांड वधण्या काळां अविंधादिकां॥
॥ उच्छेदी परकाय, तो न परका विप्रास गोप्ता निका ॥
॥ शोभे त्या अधिकाधिका नवयशप्राप्ति प्रजापालका ॥
॥ हंसा कांचनकाय,काव्य रसिका,का पद्मणीं सारिका[१]॥१०॥
॥ कार्याकार्य बघून कालगतिच्या ज्ञानें त्यजी सायका ॥
॥ कांता ज्या नगकन्यका वरद तो कामारि भूनायका ॥

---

१. याचरणांतील तिन्ही उपमा यशप्राप्तीशीं शोभे या क्रियापदा-नें तुळना करावयाच्या आहेत.

॥ कांतेतें श्रुतिपाठकादि वदती लावोनियां बालकां ॥
॥ नौकादान करोनियां भवनदीकांठास ने नाविका॥११॥
॥ जी वक्त्रस्मितचंद्रिका श्रमहरा त्यां भाविकां वैदिकां ॥
॥ व्रीडाकार मुखप्रभा नृपतिची ती तारकानायका ॥
॥ सौंदर्यें स्वगुणें सुकाल करितो गाया यशें गायका ॥
॥ जो पाडी वचका विपक्षशशका तो केसरी नेटका ॥१२॥
॥ लोकांच्या चिरकाल भूप पडला कामीं बहू नेमका ॥
॥ कांहीं लोकहितार्थ काज करितां व्हावी ह्मणे जीविका ॥
॥ ज्यामाजी द्विजकातराक्ष वघतां कालावतो हुंदका ॥
॥ राज्याकार सुखांत तो न विसरे स्वांतीं जगन्नायका ॥१३॥

**श्लोक** ( वसंततिलका. )

॥ देदीप्य होय जगतांत शिवप्रताप ॥
॥ गेला अधर्मतम दारूण विप्रताप ॥
॥ सूर्या विषाद घडला अपमान होतां ॥
॥ भासे ह्मणोनि रविबिंब[१]कलंक आतां॥१४॥

**दिंडी.**

॥ वागला जो अनुसरून देशकाला ॥
॥ दंडियेलें उन्मत्त यवनकाला ॥
॥ ये न ज्याच्या द्विजराज भानु तोला ॥
॥ शिवाजीचें त्या सुयश किती बोला ॥ १५ ॥

**श्लोक** (भुजंगप्रयात)

॥ कथा अल्प त्याच्या असे पूर्वजांची ॥
॥ परी तीमधें गोड धारा रसाची ॥

---

१ सूर्यबिंबावर जे आलीकडे डाग दिसण्यांत आले आहेत तद्बोधक

॥ यशें गाजवी शूर मालू स्वकूळ ॥
॥ तयापासुनी भोंसले राज्य मूळ ॥ १६ ॥

**साक्या.**

॥ निजामशाहीं जाधवरावें मालू सुवीर नेला ॥
॥ तेथें त्यानें भुजप्रतापें कुलभाग्योदय केला ॥१७॥
॥ त्याचा सुंदर तनय शहाजी लाजवितो मदनाला ॥
॥फाल्गुनमासीं भूषित करितो रावाच्या सदनाला॥१८॥

**श्लोक** ( इंद्रवज्रा. )

॥ श्रीमान तो राव विलासशाली ॥
॥ घेऊन लावण्य सुता दुशालीं ॥
॥ प्रेमें बसे नर्तनगानरंगीं ॥
॥ रंगांत ते सर्व हि गर्क रंगी ॥ १९ ॥

**दिंड्या.**

॥ तदा कन्या अज्ञान मंद चाली ॥
॥ तातअंका सोडोनि पुढें आली ॥
॥ धरी घालोनी झेंप शहाजीला ॥
॥ वाटला तो प्रिय बाल फार जीला ॥ २०॥
॥ राव बोले तैं हंसुन कौतुकानें ॥
॥ कसा रूपानें जोड हा वयानें ॥
॥ तशा मध्यें तीं बालकें निधानें ॥
॥ बालक्रीडा खेळती प्रमोदानें ॥ २१ ॥
॥ बोलिलीं तीं उभयतां गुलुल बोला ॥
॥ प्रेम पूर्वच कीं प्रीतिभरा आला ॥
॥ एकमेकावरि फेकिलें गुलाला ॥

॥ मोहिली ती हिरकणी दिव्यलाला ॥ २२ ॥
॥ क्रीडलीं तीं निःशंकशा मनांनीं ॥
॥ प्रेमकौतुक पाहिलें सेवकांनीं ॥
॥ तदा मालोजी हास्यविनोदांनीं ॥
॥ वदे व्याही जाहले राव मानी ॥ २३ ॥
॥ लागलें तें बहु वचन रावजाया ॥
॥ वदे सांगा सत्वरें त्यास जाया ॥
॥ शब्द कैसे तो वदे अगे बाई !! ॥
॥ पुरामाजी लोटीन जिजाबाई ॥ २४ ॥

**साकी.**

॥ मालोजीनें ईर्षेस्तव त्या प्रताप शिखरा नेले ॥
॥ बरोबरीच्या मानधनानें व्याही जाधव केले ॥ २५ ॥

**श्लोक ( इंद्रवज्रा )**

॥ मालोजिचा पुत्र पुढें शहाजी ॥
॥ वर्त्ते प्रतापें नकरीच हाजी ॥
॥ युद्धें करोनी बहु देश जिंकी ॥
॥ जाऊं न दे तो सुयशा कलंकीं ॥ २६ ॥

**साकी.**

॥ पुढे शहाजी निजामशाहीं वाढे बहुप्रकारीं ॥
॥ राज्य बुडे तैं अदीलशाहीं झाला महाधिकारी ॥२७॥

**दिंड्या.**

॥ तया पोटीं तो धीर वीर आला ॥
॥ पिता द्विजधेनूं काळ अविंधाला ॥
॥ बंधु हिंदूं प्रतिबंध अविद्येला ॥

॥ भानु वाटे देदीप्य नगीं ठेला ॥ २८ ॥
॥ शूलपाणि त्रिपुरारि महीमाजी ॥
॥ प्रकट झाला सद्धर्म सत्य काजीं ॥
॥ महा शौर्ये जगतांत नांव गाजी ॥
॥ महावीराचें सुयश सदा गा जी ॥ २९ ॥

**श्लोक** ( शार्दूलविक्रीडित. )

॥ जन्मे शृंगगडीं[१] समस्त विघडी राज्यें बहू फांकडीं ॥
॥ कोळी भील गडी अनाड अवडीं स्वार्था करी रांगडी ॥
॥ काढी तो सुगडीच वाट वरडी रानांतली वांकडी ॥
॥ लावोनी झगडी अविध रगडी वीरांस छापे गडीं ॥ ३० ॥
॥ येथें एक घडी रिपूस थपडी मारोनि जाई थडी ॥
॥ ऐसा तो सवडीं हयास दवडी फाडी रिपूआंतडीं ॥
॥ दावीना स्वकडी तडी वरघडी वाणी वदे रोकडी ॥
॥ देई तो लगडी द्विजां हरघडी कीर्ती अशी चोखडी ॥ ३१ ॥

**साक्या.**

॥ शिवनेरी तो किल्ला अनुपम नयना साजे खासें ॥
॥ अष्ट दिशांनीं देखियला तरि शिवरूपाचि जो भासे ॥ ३२ ॥
॥ गंगायमुना टाकें त्यामधिं दुजी त्रिवेणी वाटे ॥
॥ संगम त्यांचा शोभतसे बहु अल्पगवाक्षावाटे ॥ ३३ ॥
॥ यमुनेचें तें सुनील पाणी पांडुर गंगेचेंही ॥
॥ सुनील पंकज यमुनेमाजी धवलचि गंगाडोहीं ॥ ३४ ॥
॥ कमाणिचा तो तडाग मोठा कमाण त्याची हांसे ॥
॥ शिवराजाची जन्मभूमिका शिवसम सुंदर भासे ॥ ३५ ॥

---

१ शिवनेर.

## दिंड्या.

॥ राजहंसांचे कळप नांदताती ॥
॥ वुडुन मोतीटाक्यांत भक्ष्य खाती ॥
॥ ठायठायीं ते मोर नाचताती ॥
॥ वंशछिद्रांतुन पवन गीत गाती ॥ ३६ ॥
॥ सदा मानवरव चालतो शुकाचा ॥
॥ मधुर गानाचा थाट ही पिकाचा ॥
॥ सदा मौनी वक भासतात थोर ॥
॥ चंद्रविरही दुर्गांत त्या चकोर ॥ ३७ ॥
॥ मोर नाचे पिक गोड गान गाई ॥
॥ ताल धरितो कलहंस मंद पायीं ॥
॥ वदे शुक तो वक डोलवितो मान ॥
॥ चंद्रविरही दूरून देइ कान ॥ ३८ ॥
॥ रंग ऐसा सर्वदा तेथ चाले ॥
॥ देखणारा हो दंग मनीं डोले ॥
॥ अशा दुर्गीं भूनाथ तो उदेला ॥
॥ जगीं प्रासादचि वीररसा झाला ॥ ३९ ॥
॥ शतें सोळा वर वीस आणि सात ॥
॥ साल ठेवीं जन्मस्थ मानसांत ॥
॥ शिवादेवी शिवनेर शिवस्थान ॥
॥ शिवाकृतिही शिवनाम शिवा मान ॥ ४० ॥

## साक्या.

॥ घोर कली हा प्रथमचि चरणीं नेई धर्म लयाला ॥
॥ त्रासविती बहु अविंधदानव सुरभूगोद्विज यांला ॥ ४१ ॥

॥ ईशकृपेनें प्रकटे जगतीं यास्तव शिवावतार ॥
॥ चरित्र त्याचें पावन ह्मणुनी सप्रेमें अवधार ॥ ४२ ॥

**दिंडया.**

॥ रूप सुंदर अनुपम्य हो जयाचें ॥
॥ चिन्ह सूचक मुख भाग्यसंपदाचें ॥
॥ दिव्य कांति द्विजराज नभीं लाजे ॥
॥ तनू कोमल सुकुमार रम्य साजे ॥ ४३ ॥
॥ अनंगाची आजानुबाहु मूर्त्ति ॥
॥ धर्मपालक कुलतिलक विश्वकीर्ति ॥
॥ असे बहु तो निजदेश साभिमानी ॥
॥ स्वकृत्याचा पुरुषार्थही न मानी ॥ ४४ ॥
॥ भारतांतिल त्या युद्धकथीं प्रीति ॥
॥ हिंदुधर्मी आसक्त बुद्धि होती ॥
॥ अविंधाचा तो धर्म त्या न माने ॥
॥ दांत खाई त्यावरी प्रकोपानें ॥ ४५ ॥
॥ असे दादोजी सुज्ञ गुरू त्याचा ॥
॥ विप्र विश्वासू फार जो पित्याचा ॥
॥ स्वसत्तेनें वागोनि विप्र पाळीं ॥
॥ असा केला उपदेश अंतकाळीं ॥ ४६ ॥

**श्लोक** ( भुजंगप्रयात. )

॥ मनाचा पहा रोख होता तसाची ॥
॥ गुरुबुद्धि लाधे तया ज्ञात साची ॥
॥ यदा बाल तो सोडितो मातृअंका ॥
॥ तदापासुनी ठोकितो बंड डंका ॥ ४७ ॥

### श्लोक ( शार्दूलविक्रीडित. )

॥ हाका मारुनियां रणास जमवी लोकांस एकाक्षणीं ॥
॥ ठोका हो यवना ह्मणे न मिळती भीकाहि कोणा ह्मणी॥
॥ टाका निर्मुळ त्या करोनि सुख घ्या हांका स्वदेशांतुनी ॥
॥ वांका तो बहुलाघवी सुभटही पक्काच अश्वासनीं ॥४८॥
॥ बापापासुन दूर योग्य न जिणें तापांत वाटे जया ॥
॥ पापा चाकरिच्या भिऊन धरिलें चापा मही घ्यावया ॥
॥ कांपाया द्विज लाविती यवन, गौ कापावया धांवती ॥
॥ त्या पाहे व्यसनास तैं नृप महातापा चढे सन्मती ॥४९॥

### श्लोक ( मालिनी. )

॥ यवन असुर पाहे मातले सर्व देशीं ॥
॥ सुमनत्हृदय झाले विप्र सारे विदेशी ॥
॥ विधिविहित सुकर्मा भंग देवालयांचा ॥
॥ अनुदिन बहु चाले काल धर्मक्षयाचा ॥ ५० ॥
॥ निशिदिन करिती ते लूट देवद्विजांची ॥
॥ मति निगमसुधर्मीं भ्रष्टिती ज्ञाति ज्यांची ॥
॥ कठिण समय ऐसा रोदती विप्र सारे ॥
॥ हरहर! जगदीशा! काळ आला कसारे!!॥५१॥
॥ बहु अदय कृपेच्या सागरा जाहलाशी ॥
॥ किति तरि भगवंता अंत आतां पहाशी ॥
॥ अतिशय कुदशा ही पाहुनी वेदपांची ॥
॥ बहु विकल सुधी ते जाहली सन्नृपाची ॥५२॥
॥ मम असु जरि गेले होय सार्थक्य लोकीं ॥
॥ व्यसन परि कदा हें मी न नेत्रीं विलोकीं ॥

॥ सदय वच वदे हें घेतसे चाप हातीं ॥
॥ नव सुभट भटाची लोक लीला पहाती ॥३१॥

**श्लोक** ( इंद्रवज्रा. )

॥ गेला वनीं सोडुन मोह माया ॥
॥ प्रार्थीतसे शक्ति महान माया ॥
॥ त्याच्या कुळींची कुलदेवता ते ॥
॥ जी चालवी सर्व चराचरातें ॥ ५४ ॥

( अंजनीवृत्त. )

॥जयजगदंबे जय नगसूते॥ त्रिभुवन सर्वहि पाळिशि हातें ॥
॥ कोप तुझा कां मजवर माते ॥ सांगें लवलाही ॥ ५५ ॥
॥बाल तुझा मी बहु अज्ञान ॥ तुजला शोधित आलों रान ॥
॥देई भेटिचें मजला दान ॥ नमितों तुज हातें ॥ ५६ ॥

**श्लोक** ( भुजंगप्रयात. )

॥ मनीं हेतु हा धर्मसंस्थापनाचा ॥
॥ कृपेवेगळा व्यर्थ तो व्हावयाचा ॥
॥ बहु क्षुद्र मी थोर हा कार्यभाग ॥
॥ परी होतसे फार पोटांत आग ॥ ५७ ॥
॥ जगा माय तूं तूज हें गोड वाटे ॥
॥ जगाची दया मन्मनीं व्यर्थ दाटे ॥
॥ तरी सांग गे तारिशी कां न लोकां ॥
॥ द्विजां धेनुंला व्यर्थ कां भीति धोका ॥५८॥
॥ जरी मारणें मार त्यां एकदांची ॥
॥ असें गांजणें फार लोकांस जाची ॥
॥ तुझा वाटतो होतसे हा विनोद ॥

॥ अविंधासुरा होतसे थोर मोद ॥ ५९ ॥
॥ जळाले परी जाण काळीज माते ॥
॥ अगे आमुचें काय दावूं तुला तें ॥
॥ मला देखवेना द्विजांची दशा ते ॥
॥ जना सोडुनी पातलों त्वत्पदातें ॥ ६० ॥
॥ तरी तूं मला तार कीं मार माई ॥
॥ परी या नको वास लोकांत बाई ॥
॥ अविंधासुरीं भ्रष्टिला धर्म सारा ॥
॥ नसे भाविकां वांचण्या देख थारा ॥ ६१ ॥
॥ अशी ऐकुनी प्रार्थना सन्नृपांची ॥
॥ जगन्मोहिनी मोहली माय साची ॥
॥ जशी पान्हवे धेनु वत्सास मोहें ॥
॥ कृपादृष्टिनें भूपवक्त्रास पाहे ॥ ६२ ॥
॥ वदे बालका धन्य तूं या त्रिलोकीं ॥
॥ जगाकारणें तूंच रुद्रांश लोकीं ॥
॥ जगीं जेधवां धर्म लागे बुडाया ॥
॥ प्रभू तेधवां होय उत्तीर्ण राया ॥ ६३ ॥

**दिंड्या.**

॥ तरी आतां तूं धैर्य धरीं पोटीं ॥
॥ देवकार्यातें सैन्य महा थाटीं ॥
॥ प्रयुक्तीनें दुष्टांस जिंक जा जा ॥
॥ साह्य होइन मीं करिन तूज राजा ॥ ६४ ॥
॥ तदा होई ते गुप्त महादेवी ॥
॥ भूप अवघें तें कृत्य त्हदीं ठेवी ॥

॥ देवकार्या अश्रांत निघाला हो ॥
॥ साह्य वनगापासाव पावला हो ॥ ६५ ॥

# भाग दुसरा.

श्लोक (वसंततिलका.)

॥ मार्तंड मंडळ महा परि अंकिताहे ॥
॥ विस्तीर्ण थोर धरणी रविअंकिता हे ॥
॥ चंद्रप्रभारिपु असे क्षितिगोलछाया ॥
॥ वायांच हीं शिवयशस्तुलना कराया ॥ १ ॥
॥ ज्याला अविंधवध ही अट भोजनाला ॥
॥ ज्याला स्वदेशहित जीवन जीवनाला ॥
॥ ज्याला द्विजावन महा सुख सत्तमाला ॥
॥ त्याला कशीं तुलति हीं अति उत्तमाला ॥ २ ॥
॥ घालावया कवच अंबर दिव्य ज्याला ॥
॥ ज्याला असे समर मंदिर वीरजाला ॥
॥ ज्याला अमोल यश मौक्तिकभूषणाला ॥
॥ त्याला नसेचि उपमा शिवराजयाला ॥ ३ ॥
॥ ज्यानें जगीं सकल भूधर कांपवीले ॥
॥ ज्यानें यशें दिवपदीं सुर डोलवीले ॥
॥ ज्याची प्रकाशित असे स्वगुणें स्वकाया ॥

॥ वायांच चंद्र रवि त्या रुचि दाखवाया ॥ ४ ॥
॥ जाया नया निजसखी तरवार राया ॥
॥ न्हाया स्वदेशरिपुशोणित तें नृपा या ॥
॥ छाया करी नृपति तो द्विजगो सुखाया ॥
॥ गायास योग्य सुरसा कविता अशा या ॥ ५ ॥
॥ पेला जरा परिसणार कथासुधेला ॥
॥ हेलावला परि पयोनिधि पूर्णिमेला ॥
॥ दोला करोनि सुकथा सुरसांत डोला ॥
॥ बोला चरित्र पुढती सुरसाळ बोला ॥ ६ ॥

**दिंड्या.**

॥ भूप देखे तो खूप पहाडांत ॥
॥ मावळे ते बहु दुःखसंकटांत ॥
॥ अन्नवस्त्राची भ्रांति ज्यांस पाहीं ॥
॥ इमानी ते परि शूर स्वभावांहीं ॥ ७ ॥
॥ मधुर वचनें तो वीर तयां बोले ॥
॥ अहा ! तुमचे हे हाल काय झाले ॥
॥ द्रव्य नेलें हो लुटुन अविंधांनीं ॥
॥ मिळेना हो हिंदूंस अन्नपाणी ॥ ८ ॥
॥ क्षुधा नाहीं रे तृषा तुह्मां देवा ! ॥
॥ यवन ऐसे करितात सदा हेवा ॥
॥ कसे फिरतां नग्न रे रानमाळ ॥
॥ सोशितां ही उष्णता सर्वकाळ ॥ ९ ॥
॥ अरे धरणी आपुली सत्य जाणा ॥
॥ अविंधांनीं घेतली बळें माना ॥

॥ प्रमादानें धन द्रव्य नेतिं बा रे ॥
॥ भिके आपण लागलों लोक सारे ॥ १० ॥

### साक्या.

॥ तिन्ही ऋतूंच्या कठोरतेतें अनुभवितां निजदेहीं ॥
॥ अन्न अन्न तें करीत फिरतां रानीं वनीं नगीं हीं ॥ ११ ॥
॥ धनसंपन्ना या भूमीवर परके सुखें रहाती ॥
॥ आपण मालक धुळीं मिळालों ईर्षा मनीं वहा ती ॥ १२ ॥
॥ शरीर तुमचें वज्रापरि हें सुदृढ ईशकृपेनें ॥
॥ असोनि ऐसें दुःख भोगितां जीवन लाजिरवाणें ॥ १३ ॥
॥ कपट करोनी यवनीं अपुली नेली धरणीमाता ॥
॥ पुत्र तिचे दृढ आपण धिक्‌धिक्‌! नाहीं तिजला त्राता ॥ १४ ॥
॥ माता गेली यास्तव गेलें वात्सल्यहि ममतेचें ॥
॥ संकट भोगा मरा भुकेनें आहे कोण दयेचें ? ॥ १५ ॥
॥ "मारो ठोको लूटो कूटो" वचनें ऐशीं कानीं ॥
॥ निशिदिन पडती हरहर! आली कुदशा कशी निदानीं ॥ १६ ॥

### दिंड्या.

॥ आपदेनें रे ग्रासिलें तुह्मांला ॥
॥ यवनदैत्यें बहु पीडिलें जनाला ॥
॥ लढा यास्तव वीरहो यवन झोडा ॥
॥ मरा अथवा मारोनि सुयश जोडा ॥ १७ ॥
॥ अशी वाणी परिसोनि थक्क झाले ॥
॥ तयासंगें युद्धास ते निघाले ॥
॥ मातृपृष्ठीं बालकें धांवताती ॥
॥ तया मागें ते वनग तेवि जाती ॥ १८ ॥

॥ अशांच्या तो मग द्रव्य देइ पोटा ॥
॥ दावियेल्या त्यांणींच चोरवाटा ॥
॥ त्यास संगें नेऊन महा रानीं ॥
॥ सर्व किल्ले दाविले माहरांनीं ॥ १९ ॥

**आर्या.**

॥ लावा बाण धनुष्या कलंक लावा न आपुल्या तोंडा ॥
॥ ऐसें वचन वदोनी बंडाचा रोंविला नृपें झेंडा ॥ २० ॥

**श्लोक** ( इंद्रवज्रा. )

॥ गोब्राह्मणा हिंदुजनास राखा ॥
॥ करा ह्मणे तो रिपुचाचि वाखा ॥
॥ अविंध त्यांचे बहु पक्षपाती ॥
॥ लुटा कुटा त्यां मिळवाच माती ॥ २१ ॥
॥ देऊं नका किंचित लक्ष्य माती ॥
॥ कुटा अविंधा न करा क्षमा ती ॥
॥ त्रासोनि गेली बहु त्यां क्षमा ती ॥
॥ नेली कशी हो अपरोक्ष मा ती ॥ २२ ॥

**दिंड्या.**

॥ अविंधांच्या राज्यांत धूम मोठी ॥
॥ लांच खाण्याची चाल असे खोटी ॥
॥ बळी होई जो त्यास मिळे रोटी ॥
॥ गरीबाच्या हातांत ये नरोटी ॥ २३ ॥
॥ असे सत्ता ज्या तोचि बहु ज्ञानी ॥
॥ असा दावित ते शोक मुसल्मानी ॥
॥ काल्गत्या जे दिसत फार दीन ॥

॥ प्रमादानें धन द्रव्य नेतिं बा रे ॥
॥ भिके आपण लागलों लोक सारे ॥ १० ॥

## साक्या.

॥ तिन्ही ऋतूंच्या कठोरतेतें अनुभवितां निजदेहीं ॥
॥ अन्न अन्न तें करीत फिरतां रानीं वनीं नगीं हीं ॥ ११ ॥
॥ धनसंपन्ना या भूमीवर परके सुखें रहाती ॥
॥ आपण मालक धुळी मिळालों ईर्षा मनीं वहा ती ॥ १२ ॥
॥ शरीर तुमचें वज्रापरि हें सुदृढ ईशकृपेनें ॥
॥ असोनि ऐसें दुःख भोगितां जीवन लाजिरवाणें ॥ १३ ॥
॥ कपट करोनी यवनीं अपुली नेली धरणीमाता ॥
॥ पुत्र तिचे दृढ आपण धिक्‌धिक्! नाहीं तिजला त्राता ॥ १४ ॥
॥ माता गेली यास्तव गेलें वात्सल्यहि ममतेचें ॥
॥ संकट भोगा मरा भुकेनें आहे कोण दयेचें ? ॥ १५ ॥
॥ "मारो ठोको लूटो कूटो" वचनें ऐशीं कानीं ॥
॥ निशिदिन पडती हरहर! आली कुदशा कशी निदानीं ॥ १६ ॥

## दिंड्या.

॥ आपदेनें रे ग्रासिलें तुह्मांला ॥
॥ यवनदैत्यें बहु पीडिलें जनाला ॥
॥ लढा यास्तव वीरहो यवन झोडा ॥
॥ मरा अथवा मारोनि सुयश जोडा ॥ १७ ॥
॥ अशी वाणी परिसोनि थक्क झाले ॥
॥ तयासंगें युद्धास ते निघाले ॥
॥ मातृपृष्टीं बालकें धांवताती ॥
॥ तया मागें ते वनग तेवि जाती ॥ १८ ॥

॥ अशांच्या तो मग द्रव्य देइ पोटा ॥
॥ दावियेल्या त्यांणींच चोरवाटा ॥
॥ त्यास संगें नेऊन महा रानीं ॥
॥ सर्व किल्ले दाविले माहरांनीं ॥ १९ ॥

**आर्या.**

॥ लावा बाण धनुष्या कलंक लावा न आपुल्या तोंडा ॥
॥ ऐसें वचन वदोनी बंडाचा रोंविला नृपें झेंडा ॥ २० ।

**श्लोक** ( इंद्रवज्रा. )

॥ गोब्राह्मणा हिंदुजनास राखा ॥
॥ करा ह्मणे तो रिपुचाचि वाखा ॥
॥ अविंध त्यांचे बहु पक्षपाती ॥
॥ लुटा कुटा त्यां मिळवाच माती ॥ २१ ॥
॥ देऊं नका किंचित लक्ष्य माती ॥
॥ कुटा अविंधा न करा क्षमा ती ॥
॥ त्रासोनि गेली बहु त्यां क्षमा ती ॥
॥ नेली कशी हो अपरोक्ष मा ती ॥ २२ ॥

**दिंड्या.**

॥ अविंधांच्या राज्यांत धूम मोठी ॥
॥ लांच खाण्याची चाल असे खोटी ॥
॥ बळी होई जो त्यास मिळे रोटी ॥
॥ गरीबाच्या हातांत ये नरोटी ॥ २३ ॥
॥ असे सत्ता ज्या तोचि बहु ज्ञानी ॥
॥ असा दावित ते झोंक मुसलमानी ॥
॥ कालगत्या जे दिसत फार दीन ॥

॥ तयां हिंदूंतें वदत बुद्धिहीन ॥ २४ ॥
॥ न्यायकर्त्ते सर्वत्र मुसल्मान ॥
॥ स्वजातीचा ठेविती थोर मान ॥
॥ न्याय देतां ते करून पक्षपात ॥
॥ दीन हिंदूंचा करित महाघात ॥ २५ ॥
॥ थोर हुद्दा यवनास सदा देत ॥
॥ दगडघाशी कामांस हिंदु घेत ॥
॥ फार महिमा अपसव्य लिपीचा हो ॥
॥ अलेफ्बेचा सर्वत्र सदा टाहो ॥ २६ ॥
॥ वर्णसंकर करण्यास यत्न मोठे ॥
॥ भ्रष्टजाती त्यांवरी प्रेम दाटे ॥
॥ वेदनिंदा गुरुदेवविप्रनिंदा ॥
॥ अविंधाच्या लागती लोक छंदा ॥ २७ ॥
॥ यवन विश्वासू वदत दक्ष नामी ॥
॥ योग्य नसती हे हिंदु थोर कामीं ॥
॥ असें दूषण लावून ते हरामी ॥
॥ स्वार्थ साधित आपुला जनस्वामी ॥ २८ ॥
॥ बादशाहाचें स्थान विजापूर ॥
॥ राज्यमर्यादेहून फार दूर ॥
॥ जागजागीं सरदार गर्डी होते ॥
॥ म्लेच्छ अमलीं निशिदिनीं गुंग हो ते ॥२९ ॥
॥ बहू निद्रा आलस्य ज्यांस पाहीं ॥
॥ ज्ञाननीतीचा लेश नसे कांहीं ॥
॥ काळ त्यांचा तो जाय मिजाशींत ॥

॥ ऐषआरामीं ख्यालिखुशालींत ॥ ३० ॥
॥ अनीतीस्तव हिंदूस दंड भारी ॥
॥ दंडवर्जित ते यवन कारभारी ॥
॥ बोलण्याची तो ऐट असे मोठी ॥
॥ परी नाहीं अवसान लेश पोटीं ॥ ३१ ॥
॥ गोमटे ते बहु पुष्ट दिसायाला ॥
॥ लांब दाढीही भव्य मिशा ज्यांला ॥
॥ सुस्त दैवीं विहितार्थ भिस्त ज्यांची ॥
॥ चाड कैंची त्यां नीतिउद्यमाची ॥ ३२ ॥
॥ स्वस्थ राही सुलतान सदा धामीं ॥
॥ कारभारी मुक्त्यार सर्व कामीं ॥
॥ बहू चालत राज्यांत धूमधामी ॥
॥ राज्य करण्याची रीति अशी नामी! ॥ ३३ ॥
॥ खबर नाहीं येथील तेथ कांहीं ॥
॥ दग्या दंग्याची भीति ज्यांस नाहीं ॥
॥ अशांच्या तें राज्यांत बंड केलें ॥
॥ गांव लुटुनी भांडार भरीयेलें ॥ ३४ ॥

**आर्या.**

॥ अठरावें या वर्षीं प्रथमचि घे दुर्ग तोरणा हो तो ॥
॥ त्याच दिनापासोनी पृथ्वीपति सिद्ध तोरणा होतो ॥ ३५ ॥
॥ नंतर किल्ला त्याणें बांधीयेला नवीन राजगड ॥
॥ ठाणें करी प्रमोदें साधाया कार्य भूपराज गड ॥ ३६ ॥

**श्लोक (स्वागता.)**

॥ घेइ सिंहगड दुर्गम नामी ॥

॥ भूप एक जगतीं शिवनामी ॥
॥ घे पुरंदरहि थोर शिवाजी ॥
॥ युक्तिनें प्रबळ वीर नवा जी ॥ ३७ ॥

श्लोक (शिखरिणी.)

॥ तळें घोसाळें हे उभय गड रेडीहि तिसरा ॥
॥ सही केले त्याणें निजभुजबळें त्यां दृढतरां ॥
॥ असे किल्ले जाणा बहुत दुसरे ही गवसिले ॥
॥ प्रतापा या त्याच्या निजयवनभूपें परिसिलें ॥३८॥

दिंड्या.

॥ सुभा कल्याणी घेइ वीर छापें ॥
॥ खजीन्यातें लूटिलें पहा भूपें ॥
॥ असा होई वर्धिष्णु देशबंधु ॥
॥ शुद्धपक्षींचा जेवि बाल इंदु ॥ ३९ ॥

श्लोक (इंद्रवज्रा.)

॥ अघोर तें बंड अशा प्रकारें ॥
॥ वाढे तदा बादशहा थरारे ॥
॥ धरोनि त्याच्या स्वपित्याशि बंदीं ॥
॥ घाली सभोंती बसवी शिबंदी ॥ ४० ॥

साक्या.

॥ वदे शहाजी कर जोडुन तो माझा तनय खरा तो ॥
॥ परंतु घेउन वतन मलाही नाडायास पहातो ॥ ४१ ॥
॥ अशा प्रकारें विनंति त्याणें केली बादशहाची ॥
॥ परंतु गमलें सत्य न त्याला वाटे नारद हाची ॥ ४२ ॥
॥ कळे नृपा ही खबर तदा तो भ्याला फार मनांत ॥

॥ वचन भवानी बोले होतें मिथ्याभूत जनांत ॥४३ ॥

श्लोक ( भुजंगप्रयात.)

॥ जया साह्य तो तात विघ्नेश्वराचा ॥
॥ तया धाक का हा मनुष्येश्वराचा ॥
॥ जया रक्षिता तो जगन्नाथ हातें ॥
॥ तया बापुडें विघ्न येऊं पहातें! ॥ ४४ ॥

दिंड्या.

॥ बंड झालें कर्नाटकांत मोठें ॥
॥ दुजा नाहीं राज्यांत वीर कोठें ॥
॥ शहाजीच्या वांचोनि गती नाहीं ॥
॥ अशी आली यवनास वेळ पाहीं ॥ ४५ ॥
॥ मंत्रसामर्थ्यें बद्ध जेवि भोगी ॥
॥ प्रमोदानें डोलतो अग्रभागीं ॥
॥ तसें झालें त्या थोर अविंधाला ॥
॥ बद्ध हातें विनवितो पहा त्याला ॥ ४६ ॥
॥ आणिला म्यां निष्काम हरी रागा ॥
॥ काय नेणे देवांत अग्रभागा ॥
॥ महावीरा अपराध करीं माफी ॥
॥ बंड मोडुन अधिकार पुन्हा स्थापीं ॥ ४७ ॥

श्लोक (शार्दूलविक्रीडित.)

॥ बापाची सुटका बघून घटका साधी द्विजांचा सखा ॥
॥ संगें घे कटका बहूत दचका पाडी नसें ज्यां शिखा ॥
॥ दुर्गांशीं धडका प्रमत्त गज का देतो गमे भेदका ॥
॥ भूषा दे कढकादि सैन्यघटका प्रेमें महा सैनिका ॥४८॥

॥ रोहीडा गड घेतला मग शिवाजीनें कसा तो पहा ॥
॥ रात्रीं लावुन त्या शिडी घनतमीं वेंघे गडीं त्या महा ॥
॥ तो कोलाहल ऐकुनीच उठला बंडाळ सेनापति ॥
॥ मारी त्यास सुवीर वीर परभू लाभे तदा सन्मति ॥४९॥

श्लोक (इंद्रवज्रा.)

॥ अनंत हस्तीं प्रभु साह्यकारी ॥
॥ त्या जिंकणें काय नराधिकारी ॥
॥ स्वयें घडे सर्व हितानुगामी ॥
॥ जाळ्यांत ये आप विहंग नामी ॥ ५० ॥

दिंडया.

॥ मोंगलांचा औरंगजेब थोर ॥
॥ आदिलशाहीशीं लढे करी जोर ॥
॥ नीच जाती अपसांत मनीं खोटे ॥
॥ देशबंधूस्तव अश्रु केंवि लोटे ॥ ५१ ॥
॥ ज्यास नाहीं अभिमान देशजातीं ॥
॥ जगीं नांदे तो मत्त भद्रजाती ॥
॥ पशुजाती स्वजनांत वैरकारी ॥
॥ दोन लढतां तिसऱ्यास लाभ भारी ॥ ५२॥
॥ लढे स्वजनीं दुर्दैव थोर आलें ॥
॥ जगीं यवनांचें पुण्य सर्व झालें ॥
॥ उठे भलता मारील तो अशास ॥
॥ निर्बळांना रणधीर हो कशास ॥ ५३ ॥
॥ असो केला भूनाथ जेर त्यानें ॥

---

१ विजापुरचा बादशाहा.

॥ ग्रासियेला मंडूक भुजंगानें ॥
॥ राहुराहुन घालितो फणी झेंपा ॥
॥ तसा देई भूपास थोर तापा ॥ ५४ ॥
॥ एक मागे दिधल्यास दुजें मागे ॥
॥ पुन्हा तिसऱ्यास्तव युद्ध करूंलागे ॥
॥ बिडाळाची धरसोड मूषकाला ॥
॥ गमे तैसा तो मार महोपाला ॥ ५५ ॥

**श्लोक ( शार्दूलविक्रीडित. )**

॥ ऐसे ते झगडीं निमग्न मग हा स्वार्थी करी तातडी ॥
॥ जाई एक घडी जुनाट सुगडीं आणी जमा रोकडी ॥
॥ हस्तीची नरडी प्रमत्त हरि तो फोडी क्षणीं तोकडी ॥
॥ तैसा तो करडी कमाण फिरवी राज्यासमोडी घडी॥५६॥

**दिंड्या.**

॥ वीर्य दावुन आगळें श्वापदाला ॥
॥ सिंह राजा विपिनांत जसा झाला ॥
॥ यवन मारून संगरीं प्रतापानें ॥
॥ भूप झाला तो तसा स्वतेजानें ॥ ५७ ॥
॥ पुरुषपुंगव रणधीर धरी हातीं ॥
॥ देशकाजा नववीर वरी साती ॥
॥ उरीं घातुक खंजीर जरी जाती ॥
॥ अचुक त्यांचे रिपु तीर तरी खाती ॥ ५८ ॥

**साक्या.**

॥ मोंगल गेल्यामागें तेथें ठरला मग मनसोबा ॥

---

१ जीर्णपुर=जुन्नरच्या शिवनेरास.

॥ प्रचंड मोंगल स्वकीय वदती परका शत्रु नसो बा॥५९॥
॥ त्या राज्यामधिं एकमतानें त्रिवार निश्चय झाला ॥
॥ सेना धाडुन बद्धकरीं त्या आणावें अर्धमाला ॥ ६० ॥
॥ कथा पुढें ती फार मनोहर सज्जनमन मोहाया ॥
॥ सकामपुरूषा कमललोचना येते परिरंभाया ॥ ६१ ॥
॥ हावभाव ते करीत येइल नाचत गात सुगान ॥
॥ अवयव तीचा एकएक परि पाहुन डोलिव मान॥६२॥
॥ बहुविधछंदी सरळ पदांची सुवर्णमंडित बाला ॥
॥ गळां पडे तैं चित्सुख कोंदे विसरे मन दुःखाला॥६३॥

---

# भाग तिसरा.

---

## दिंड्या.

॥ शिवाजीला[1] उपमा न जगामाजी ॥
॥ द्विजा राजी सज्जना ह्मणे या जी ॥
॥ एक वाजी वसणार जगीं हा जी ॥
॥ अतुल गाजी कवनांत यास गा जी ॥१ ॥
॥ धैर्य ज्याचें तें पर्वतासमान ॥
॥ दया ज्याची ते जातिपुष्प मान ॥
॥ तेज ज्याचें रवितुल्य दिव्य गाजे ॥

---

१ शिवाजीला.

॥ सिंधुसदृश ते शांति जगीं साजे ॥ २ ॥
॥ धैर्य दावी समरांत अविंधांना ॥
॥ दया दावी हृदयांत सुद्विजांना ॥
॥ तेज दावी वीरांस शस्त्रधारी ॥
॥ शांति दावी संतांस अविंधारी ॥ ३ ॥

**श्लोक** (शिखरिणी.)

॥ कसा जाई येई प्रकट नृप होई तरि कसा ॥
॥ कसा वाजी फेरी सुभट अरि मारी झट कसा ॥
॥ अविंधा विंधी जो कमलमुख वंदी द्विज कसे ॥
॥ कथूं भार्गी या तें नवकथनसारामृत रसें ॥ ४ ॥

**श्लोक** (इंद्रवज्रा.)

॥ शार्दूल जो विद्ध वनीं शरानें ॥
॥ तापे बहु क्रोध नवज्वरानें ॥
॥ कोपे तसा तो मग बादशाहा ॥
॥ गोळा करी तुंबळ सैन्य पाहा ॥ ५ ॥

**दिंड्या.**

॥ पंचशत ते दशगुणित अश्व देखा ॥
॥ पादसेना शतसप्तति ही लेखा ॥
॥ बहू जेजाला करून सिद्ध तोफा ॥
॥ खान अफसुल बाहिला वीर तोफा ॥ ६ ॥
॥ बादशाहा खानास ह्मणे मीरा ॥
॥ देख तुंबळ हें सैन्य महावीरा ॥
॥ महायुद्धें तूं खोड मोड त्याची ॥
॥ मला ज्याच्या बहु वासना वधाची ॥ ७ ॥

श्लोक (वसंततिलका.)

॥ जावें ससैन्य पृतनाधिपते लढावें ॥
॥ धांवे प्रमत्त पशु त्यास रणीं वधावें ॥
॥ वा वेसणीं धरून त्वां जयवंत यावें ॥
॥ व्हावें जगीं यश तुझें चिरही रहावें ॥ ८ ॥

दिंडी.

॥ मोंगलाच्या रणरूप पावसांत ॥
॥ चढे पाणी ज्या बहुत थिल्लिरांत ॥
॥ खान गर्जे तो सघन घनावाणी ॥
॥ सभेमध्यें सावेश वदे वाणी ॥ ९ ॥

श्लोक (वसंततिलका.)

॥ राया मला श्रम नको रिपु हा धराया ॥
॥ सायास देइ गज तो हरिला कसा या ॥
॥ पायां पडेल करूनी शतशा उपायां ॥
॥ वायां प्रचंड बल हें भय दाखवाया ॥ १० ॥
॥ साहील काय मम तेज महारसा ही ॥
॥ दाही दिशांसकट मच्छर एक दाही ॥
॥ पाहीं जगीं बहुत मी नरयातुपां ही ॥
॥ नाहीं परंतु तुलले मजशीं रणांहीं ॥ ११ ॥

श्लोक (इंद्रवज्रा.)

॥ कुरंग तो पारध केसरीला ॥
॥ राजीवउत्पाटन तें करीला ॥
॥ मानी न खद्योत विपक्ष भानू ॥

---

१ शिवाजीस तिरस्कारानें पशु म्हटलें आहे.

॥ हें कृत्य तैसें किति हीन मानूं ॥ १२ ॥
॥ अजिंक्य मी एक जगीं प्रतापी ॥
॥ म्यां जिंकिले मोंगल वीर तापी ॥
॥ मला रणा पोकळ हिंदु काय ॥
॥ अशक्त जो उद्भिज भक्ष्य खाय ॥ १३ ॥
॥ तोही असे बालक अल्पदेही ॥
॥ गाजे न लोकीं स्वबळें मदेंही ॥
॥ तें श्वान देखा लघु पायरीचें ॥
॥ कशास हें सैन्य अशा परीचें ॥ १४ ॥
॥ असो मला मान्य कशीहि आज्ञा ॥
॥ ससैन्य जातों धरण्यास अज्ञा ॥
॥ नमी असें बोलुन बादशाहा ॥
॥ अविध सारे वदती अहाहा!! ॥ १५ ॥

श्लोक (शिखरिणी.)

॥ असा येतां देखे अरि निकट तो खान विजयी ॥
॥ मराठ्यांच्या भूपा दचक बसली तेच समयीं ॥
॥ प्रसंगीं या देतो मदत मज तो कोण बरवी ॥
॥ जगीं प्राणांतींही कवण नर धैर्यास धरवी ॥ १६ ॥

श्लोक (भुजंगप्रयात)

॥ पराकारणें कोण घेई श्रमातें ॥
॥ असा कोण तो साह्य होईल मातें ॥
॥ पराकारणें देह जाळी स्वताचा ॥
॥ जगीं कोण या धन्य सत्यव्रताचा ॥ १७ ॥
॥ असा दीसतो एक माझ्या मताचा ॥

॥ स्वदेशा जना धेनुविप्रा हिताचा ॥
॥ पराकारणें भार घेई श्रमाचा ॥
॥ जगीं गाजतो दास सर्वोत्तमाचा ॥ १८ ॥
॥ जगा तारण्या वायुपुत्रावतार ॥
॥ तया रामदासा पुसावा विचार ॥
॥ परी विघ्न हें प्राण घेण्यास आलें ॥
॥ अविंधासुरा जिंकणें व्यर्थ झालें ॥ १९ ॥
॥ मला वाटलें साह्य आहे भवानी ॥
॥ उपेक्षी परी माय दासाभिमानी ॥
॥ मला ठाउकें प्राण जाईल यांत ॥
॥ परी चंडिनें घातलें या पथांत ॥ २० ॥
॥ गमे चंडिनें लाविले गच्च डोळे ॥
॥ जळो राज्य हें शत्रु तोडील लोळे ॥
॥ मरो देश हा कीं जळो धर्म सारा ॥
॥ मला या जगीं तो न सौख्यास थारा ॥ २१ ॥
॥ गमे हें जरी ते तरी सद्दया रे ॥
॥ मना प्रेरिते प्राण जावो लया रे ॥
॥ परी सन्मती विप्र सौख्यांत राहो ॥
॥ सदा ते दया फोडिते हाच टाहो ॥ २२ ॥
॥ मरें मी परी सौख्य मोठें जनाला ॥
॥ तऱ्हेनें कशा होय नेणें मनाला ॥
॥ तरी नेम मी हा करीं निश्चयाचा ॥
॥ वदे दास तो बोल मानीन साचा ॥ २३ ॥
॥ असा जाहला तो मुमुक्षु स्वभावें ॥

॥ जगत्स्वामिया त्या नमीं शुद्ध भावें ॥
॥ असूंपूर आले तनूलागि कांटे ॥
॥ न वाचा फुटे गद्गदां कंठ दाटे ॥ २४ ॥
॥ वदे स्वामिया पूर्ण तूं देव साचा ॥
॥ मला बोधि रे बोध माझ्या हिताचा ॥
॥ त्वरें सांग बापा दया कां अशी रे ॥
॥ मला जाळिते पामरा हे कशी रे ॥ २५ ॥
॥ सुधर्मा द्विजा धेनुला दुःख होतां ॥
॥ कृपा काळजी योग्य विश्वाधिनाथा ॥
॥ असा ऐकुनी बोल त्या सन्नृपाचा ॥
॥ सुखावे मनीं सिंह कालद्विपाचा ॥ २६ ॥
॥ तया बोधिला बोध तो आत्मबोध ॥
॥ जया थोर देहाभिमाना विरोध ॥
॥ मनीं शोधितां बोध आश्चर्यदायी ॥
॥ गमे त्या नृपा ठायिंचें सर्व ठायीं ॥ २७ ॥
॥ विराला समीं सर्व देहाभिमान ॥
॥ सुखानंद तैं कोंदला दिव्यमान ॥
॥ भुले भूप तो मीपणा तूंपणातें ॥
॥ भुले सद्गुरूही भुले आपणातें ॥ २८ ॥
॥ सुखें कोंदला रंजला अंतरंगीं ॥
॥ मनीं दंगला रंगला एकरंगीं ॥
॥ विवेकें पुढें भासलें मी महेश ॥
॥ त्रिलोकेश मी मीच नाकीं सुरेश ॥ २९ ॥
॥ सवित्रेंदु मी चालवीं विश्व पाळीं ॥

॥ जगीं प्राणियांच्या मना मीच चाळीं ॥
॥ असा जाहला प्रत्ययो त्या नरेशा ॥
॥ स्मृतीनें पुन्हा विस्मरे त्या परेशा ॥ ३० ॥
॥ कळे त्यास तेव्हां मला कां दया ही ॥
॥ कळे कां मला वेढिले काळज्यांहीं ॥
॥ मला तें कळे काय कर्त्तव्य नाथा ॥
॥ अकर्तेपणें मारितों शत्रु आतां ॥ ३१ ॥

श्लोक ( मालिनी. )

॥ चरणकमल तेव्हां वंदिलें स्वामियाचें ॥
॥ अनुभव कथियेले सर्वही प्रत्ययाचे ॥
॥ गुरुवर वदला तूं होय रुद्रावतार ॥
॥ यवनअसुर मारीं जाइं लोकांस तार ॥ ३२ ॥ ✓

दिंडया.

॥ असा झाला कृतकृत्य भूप लोकीं ॥
॥ पुढें अनुकुल तें सर्वही विलोकी ॥
॥ मनीं आणी जें तेंच शेवटास ॥
॥ स्वयें जाई शितिकंठ साह्य त्यास ॥ ३३ ॥
॥ असो खानाचे स्तुतिस्तोम केले ॥
॥ सुरस वक्त्याच्या मुखें बोलवीले ॥
॥ महागर्वी जो त्यास हेंच जाळें ॥
॥ जाणियेलें सर्वज्ञ सत्कृपाळें ॥ ३४ ॥

श्लोक (अमृतध्वनि.)

॥ वीरामहा चतुर धीरा दिसे वर जगीं रावसाच सुमणि ॥
॥ मीरा प्रतापरणधीरा अमोल नव हीराच कीं दिनमणि ॥

॥ तीरा त्यंजी न मम शीरार्थ तूं संबळ कीराचिया विनवितों॥
॥स्थीरावुनी नयननीराकडे बघ सुधीराज मीति वरितों॥ ३५॥

श्लोक (कामदा)

॥ शूर तूं महा थोर सैन्य हें ॥
॥ क्षुद्र सैनिका मी तयास हे॥
॥ शांत हो त्वरें बलधुरंधरा ॥
॥ वचन देउनी ने विजापुरा ॥ ३६ ॥

दिंडी.

॥ कामिनी ते मोहिते सकामाला ॥
॥ तसा मोही त्या भूप अविंधाला ॥
॥ खान दानव हा विजयसुधा पाही ॥
॥ त्यास राजा मोहिनीरूप मोही ॥ ३७ ॥

आर्या.

॥ खानाजवळी होता विश्वासू गोपिनाथ विप्र पहा ॥
॥ केलें वकील करण्या शिष्टाई साम दंड भेद महा ॥३८॥

श्लोक (शिखरिणी.)

॥ तया विप्राच्या त्या नृपति सदनीं एक सुदिनीं ॥
॥ निशीमाजी जातो नमन करितो साश्रुनयनीं ॥
॥ कथी त्याला सारें गुरुगुज भवानीवरहि तो ॥
॥ तदा प्रेमें डोळे वच परिसतां विप्र पुशितो ॥ ३९ ॥

दिंडी.

॥ कंठ दाटुन तो वदे गोपिनाथ ॥
॥ अहा! तुष्टे विप्रांस जगन्नाथ ॥
॥ काय शेवीं आलीच दया त्याला ॥

॥ विश्वजनका जगदेकपालकाला? ॥ ४० ॥
॥ सांग शिवबा तरि काम मला बापा ॥
॥ तुझ्या योगें होईन मुक्त पापा ॥
॥ जगीं अवतरशी स्थापण्या स्वधर्मा ॥
॥ विसर पाडाया यवनदुष्टकर्मा ॥ ४१ ॥

**श्लोक ( शार्दूलविक्रीडित. )**

॥ झाले एकवटी सुयुक्ति सुभटी आतां करावी कशी ॥
॥ तेव्हां विप्र घटी विचार सुघटीं कृप्ति प्रयत्ना अशी ॥
॥ दुर्गस्थानतटीं तुझ्याचि निकटी येईन मी आणि तो ॥
॥ तेथें तूं निवटीं तया झटपटी एकास मी आणितों॥४२॥

**आर्या**

॥ सांगे भितो मराठा खाना द्विज साधण्यास देशहित ॥
॥ युद्धाशिवाय येइल प्रेमें हातांत संपदेसहित ॥ ४३ ॥

**दिंडया.**

॥ खान गाधिज हा वीर्यतपें माजे ॥
॥ त्यास पाहुन नृपइंद्र जणूं लाजे ॥
॥ मेनकाही तो गोपिनाथ धाडी ॥
॥ क्षणीं त्याचा तपगर्व सर्व काढी ॥ ४४ ॥
॥ मंजुवचन स्मितवदन नयन मोडी ॥
॥ मानवर्धन करचरणकमल जोडी ॥
॥ सत्य रंभा तो गोपिनाथ झाला ॥
॥ मोहनास्त्रें स्वाधीन खान केला ॥ ४५ ॥
॥ स्त्रैण जैसा वचनांत कामिनीच्या ॥

---

१. अफझुलखान.

॥ तसा मानी बोलास खान त्याच्या ॥
॥ नटे ऐसा स्त्रीवेष गोपिनाथ ॥
॥ देशकाजा तुष्टला जगन्नाथ ॥ ४६ ॥

**श्लोक. ( पृथ्वी छंद. )**

॥ तसाच मग वागवी यवन विप्र शब्दावरी ॥
॥ सुकाणु जलधींमधें गलबता जसें आवरी ॥
॥ सुधासुवचवर्षणें यवन वीर तो मोहला ॥
॥ स्वकीय दल सोडुनी अचलमंदिरा चालला ॥ ४७ ॥

**दिंडी.**

॥ तदा तोडाया भूप निघे वादा ॥
॥ सवे तानाजी घेइ शूर प्यादा ॥
॥ आंत घाली चिलखता गुप्त रूपें ॥
॥ वरी केला पोषाक रम्य भूपें ॥ ४८ ॥

**साक्या.**

॥ स्वदेशहित जरि या कृत्याला असेल सत्य निदान ॥
॥ जय जगदंबे जय गुरुनाथा द्यावें मज जयदान ॥ ४९ ॥
॥ अशा प्रकारें प्रार्थुन तो नृप बिचवा हत्यार घेई ॥
॥ वाघनखें तीं वामकरीं तो घालुन भेटिस जाई ॥ ५० ॥
॥ सन सोळाशें साठ त्यांत तो एक उणा या सालीं ॥
॥ शरदृतूची शुक्ल अष्टमी होती सायंकाळीं ॥ ५१ ॥

**श्लोक ( इंद्रवज्रा. )**

॥ अर्धा दिसे भास्कर चंद्रमाही ॥
॥ भूगोल अर्धा सघन द्रुमांहीं ॥
॥ अर्धे द्रिसे व्योम समेघ गोल ॥

॥ दिनार्ध पक्षार्धहि त्यास बोल ॥ ५२ ॥
॥ संध्याप्रभा उत्तम रक्तरंगी ॥
॥ भूमंडळा शोभविते सुरंगीं ॥
॥ ती नेसवी भूप्रति[1] लाल शेला ॥
॥ प्रेमें गमे भूधरलालशेला ॥ ५३ ॥
॥ संध्यावधू सुंदर हेमरंगी ॥
॥ अब्दीं लिही गोपुर पंचरंगी ॥
॥ तारानगा आड पटाब्द लावी ॥
॥ सलज्ज अर्केंदु कुचांस दावी ॥ ५४ ॥

**श्लोक** ( वसंततिलका. )

॥ चंद्रार्क हे कुच तिचे घन कांचनाचे ॥
॥ भूकंचुकी असित लेउन देख नाचे ॥
॥ आकाश मस्तक सुनील विशाल राजे ॥
॥ नक्षत्रभूषण तयावर फार साजे ॥ ५५ ॥
॥ पक्षी सुशब्द करिती पळतात गाई ॥
॥ शैलावरून निघती अजसंघ पाहीं ॥
॥ गुंजारव भ्रमर तामरसीं करीती ॥
॥ वाहे समीर बहु शीतल मंद रीतीं ॥ ५६ ॥

**श्लोक** ( इंद्रवज्रा. )

॥ दिशाच सौभाग्यवती सुरंभा ॥
॥ प्रमोदकें पूरित हेमकुंभा ॥
॥ सूर्या कटी घेउन भेटताहे ॥
॥ सुभद्र ऐशा शकुनास लाहे ॥ ५७ ॥

---

१ इंद्रधनुष्यरूपी.

॥ रोमांच अंगीं तरु जी धरीती ॥
॥ भूगौतमी शैलपयोधरी ती ॥
॥ बालार्क घेतो स्तनपान नेटें ॥
॥ पयस्विनी त्यास सवत्स भेटे ॥ ५८ ॥

**श्लोक** ( द्रुतविलंबित. )

॥ वदन सोज्वळशी हंसते दिशा ॥
॥ बघुन भाग्यद या शकुना अशा ॥
॥ गमन तो करितो नृप धीर तो ॥
॥ बहुत वीररसीं बुधधी रतो ॥ ५९ ॥

**आर्या**

॥ सावेशें त्या स्थानीं येउन तो धीर वीर आंत शिरे ॥
॥ आलिंगितां अविंधा खोवी उदरीं नखांस एकसरें॥६०॥
॥ खान दुरी तो सरके काढी शस्त्रास घालण्या घाव ॥
॥ नृपही त्यावर जैसा सिंहावर सिंह घेतसे धांव ॥ ६१ ॥
॥ मारिति अन्योन्यावरि चपलत्वें क्रोधयुक्त तरवार ॥
॥ पावक चम चम चमके शस्त्रें शस्त्रास लागतां वार ॥६२॥
॥ खड्ग सुवेगें फेरिति नजर ठरेना क्षणार्ध त्या वेगा ॥
॥ अति त्वरेनें जैशी व्योमीं चपला क्षणांत धांवे गा ॥६३॥
॥ युद्धविशारद नृप तो सावध लढला सुवीर वीर जसा ॥
॥ गडबडला प्रतिपक्षी गमला नाहीं अविंध वीरजसा॥६४॥
॥ वातशरीरी खाना जिंकी वेगें नृपाल बलवान ॥
॥विशाल दाढी धरुनी बिचव्यानें झटचि कापिली मान॥६५॥

**साकी.**

॥ अफझुलखानाचें मग नेई भूपति शिरतरवार ॥

॥ अति हर्षानें काढी दुर्गीं बहुत जयाचे बार ॥ ६६ ॥

श्लोक ( कामदा. )

॥ बार काढितां खूण जाहली ॥
॥ गुप्त ठेविलेली चमू भली ॥
॥ शत्रुच्या बळीं जाउनी पडे ॥
॥ यामिनीतमीं विघ्न रोकडें ॥ ६७ ॥

श्लोक (मालिनी)

॥ धडधडधड तोफा सोडिल्या एकदांचि ॥
॥ प्रमुखविगत लोकां कृत्य तें फार जाची ॥
॥ भर भर भर सेना शत्रुची ती पळाली ॥
॥ गज रथ बहु घोडे युद्धशस्त्रें मिळालीं ॥ ६८ ॥

श्लोक ( कामदा. )

॥ थोर नाश तो घोर सांकडें ॥
॥ यवनभूप तें ऐकुनी रडे ॥
॥ बोलिला मला दुष्ट घातकी ॥
॥ प्रबळ शत्रु हा जाहलाच कीं ॥ ६९ ॥

# भाग चवथा.

श्लोक ( इंद्रवज्रा. )

॥ गा जे सुकीर्ति त्रिजगांत गाजे ॥
॥ माजे कथा योग्य सुरद्रुमा जे ॥

॥ राजेश हा इंद्र नृपांत राजे ॥
॥ साजे यशाधिक्य कथारसा जे ॥ १ ॥
॥ कळे महा हें भवसार ज्याला ॥
॥ देई धनें यास्तव तो द्विजांला ॥
॥ पाळी पित्यातुल्य समग्र भू तो ॥
॥ नांदे असा राजगडीं[1] प्रभू तो ॥ २ ॥

श्लोक ( पृथ्वी छंद. )

॥ नरेंद्रगड हा महा सुगड शोभतो भूतलीं ॥
॥ रमा रमण या स्थलीं त्यजुन वाटतें पातली ॥
॥ नृपाळ बहु येथिचा सदय शांत सिद्धांतरी ॥
॥ अबंध नृप तो कसा वर भवप्रबंधा तरी ॥ ३ ॥

दिंडी.

॥ सत्यमार्गी तो धर्मराज जेवीं ॥
॥ धर्मनिष्ठा निष्ठाच बहू देवीं ॥
॥ आत्मवेत्ता शास्त्रज्ञ महाज्ञानी ॥
॥ जगीं ख्याती तो कर्ण असे दानीं ॥ ४ ॥

श्लोक ( इंद्रवज्रा. )

॥ अविंध जो प्रत्यहिं धेनु कापी ॥
॥ जिंकोनि त्या काळरिपु प्रतापी ॥
॥ नृपाळ तो धीट बहूत झाला ॥
॥ धास्ती पडे ब्राह्मणगोद्विषांला ॥ ५ ॥

दिंडया.

॥ असा होई तो यवनचमूभंग ॥

---

१ राजगड.

॥ लोक झाले पाहोनि मनीं दंग ॥
॥ वदति सुटतो तो म्लेच्छ दुष्टसंग ॥
॥ स्वराज्याचाही सुखद दिसे रंग ॥ ६ ॥
॥ भूप विजयी तो समरमंदिरांत ॥
॥ सुखें डोले केसरी काननांत ॥
॥ सवें घेई चतुरंग सैन्य साचें ॥
॥ निघे मृगयेला यवनकुरंगांचे ॥ ७ ॥

**साक्या.**

॥ तकड्धुं तकड्धुं डंका वाजे तुरंग नाचति तालें ॥
॥ हेटकरी गडकरी शिकारी श्वानसमूहचि चाले ॥ ८ ॥
॥ श्वानसंघ नृप तत्पर पाहुनि नयनीं अश्रु सुढाळी ॥
॥ कोमल मृदुमृदु वचनकरानें सप्रेमें कुरवाळी ॥ ९ ॥
॥ खेळणार ते रांगणारही कुत्रे तडक निघाले ॥
॥ दुर्ग खेळणा अचल रांगणा घेरावयास आले ॥ १० ॥

**श्लोक** ( इंद्रवज्रा. )

॥ कोंडीयले त्यांतिल जीव त्यांणीं ॥
॥ कुरंग शार्दूलहि शस्त्रपाणि ॥
॥ मारी तयां भूप शर प्रभावें ॥
॥ दुर्गांस त्या दो नरसिंह पावे ॥ ११ ॥
॥ भेटे पुढें त्यास महा शिकारी ॥
॥ रूस्तुं[1]जमान प्रतिपक्ष भारी ॥
॥ भिडे नृपा तो रिपुसिंह रानीं ॥
॥ जो वेष्टिला जंबुकसूक[2]रांनीं ॥ १२ ॥

---

१ विजापुरच्या बादशहाचा सरदार. २ त्याची सेनापर्शक.

॥ दाढी सटा कुंतल लंबमान ॥
॥ दाढा जया दुर्मद शब्द मान ॥
॥ नखें जया तीक्षण शस्त्रधारा ॥
॥ न भी परी बंदुकतोफमारा ॥ १३ ॥
॥ वीर्यप्रतापें हरि गर्जना तो ॥
॥ करी तया श्वापदलोक भीतो ॥
॥ माजे बहू उन्मद काननांत ॥
॥ नाहीं तयाला रिपु संगरांत ॥ १४ ॥
॥ नृपा अशी पारध सिंह ठेला ॥
॥ एकाच बाणें मृततुल्य केला ॥
॥ कुत्रे सहाया बहु भूधराला ॥
॥ ते मारिती जंबुकसूकरांला ॥ १५ ॥
॥ भ्याला रिपू कोंकत तो पळाला ॥
॥ विजापुरा जाय महा बिळाला ॥
॥ वाटे अविंधां सकलांहि लाज ॥
॥ परी तयांला नसुचे इलाज ॥ १६ ॥
॥ पुढें प्रभू तेथुन तो निघाला ॥
॥ असंख्य मारोनि मृगां सृगांला ॥
॥ सुवीर चूडामणि कोंकणांत ॥
॥ आला असे श्रांत महारणांत ॥ १७ ॥

**दिंड्या.**

॥ तदा पुढतीं उद्यान एक पाहे ॥
॥ रम्य झाडी घन गर्द लागताहे ॥
॥ फणस आंबे जंबीर निंब ठेले ॥

॥ सुरू शंखाकृति उंच नभीं गेले ॥ १८ ॥
॥ बहू शोभे ती बाग पोफळींनीं ॥
॥ जांब जांबुळ नारिंग नारळींनीं ॥
॥ बकुळ उंबर अंजीर चंपकातें ॥
॥ गगनचुंबी त्या देख चंदनातें ॥ १९ ॥
॥ नागचापा डाळिंब बदामी ही ॥
॥ खर्जुरी ते अंकोल मना मोही ॥
॥ पारिजातक अक्रोड पादपांहीं ॥
॥ रम्य रंभा रंभोरु उभ्या पाहीं ॥ २० ॥

**श्लोक** ( भुजंगप्रयात. )

॥ गमे आंवळी नारळी पोफळी या ॥
॥ लिहीती नभीं स्वस्तिका सांवळीया ॥
॥ पराकारणें छत्र किंवा धरीती ॥
॥ करें कीं गमे वारिती चामरी ती ॥ २१ ॥

**श्लोक** ( इंद्रवज्रा. )

॥ सीताफळी रामफळी अशोक ॥
॥ दावी चकोत्रा सकलांस झोंक ॥
॥ पुष्पें फळें वृक्ष निडारले हो ॥
॥ भारें महा भासति वांकले हो ॥ २२ ॥

**श्लोक** (वसंततिलका.)

॥ आला अशा नृपति सुंदर रम्य बागीं ॥
॥ देखे बहू रुचिर मंदिर अग्रभागीं ॥
॥ आले धनी नृपतिच्या शिरके समोर ॥
॥ श्रीमान ते बहुत योग्य कुलीन थोर ॥ २३ ॥

॥ श्रांता ससैन्य रणविप्रिय पार्थिवाचा ॥
॥ केला तिहीं बहुत आदर गौरवाचा ॥
॥ बागेंत त्याच मग सुंदर मेजवानी ॥
॥ केली नृपा सुसदनीं नरपुंगवांनीं ॥ २४ ॥

**श्लोक** (इंद्रवज्रा.)

॥ बसावया चंदनयुक्त पाट ॥
॥ द्रव्यें सुगंधी बहु घंघभाट ॥
॥ विशाल ताटें सकलां रुप्याचीं ॥
॥ पंक्ती बसे श्रीमत सज्जनांची ॥ २५ ॥

**आर्या.**

॥ वाढावयास आली शिरक्यांची दिव्य कन्यका तिलका ॥
॥ चवदा वर्षांमध्यें उपवर ते अर्धसस्मिताकलिका ॥ २६ ॥
॥ भूप तिला तों मोहि त्याच्या रूपास चंद्रमाभा ती ॥
॥ चंद्रास भा तशी ते चारु कळी त्या सुरद्रुमा भाती ॥२७॥
॥ पाहे चकोर चंद्रा दिव्य नरेंद्रा तशीच ते रमणी ॥
॥ भ्रूधनु ओढुन नेटें नयनशरें विद्धिला सुवीरमणी ॥ २८॥

**श्लोक** ( इंद्रवज्रा. )

॥ श्रीखंड मांडे मधु खीर बुंदी ॥
॥ मोतीचुरा केशरभात गंधी ॥
॥ स्वादिष्ट नानाविध शाकभाजा ॥
॥ केला असे मोहनभोग राजा ॥ २९ ॥
॥ कोशिंबिरीही कथिका खुमारी ॥
॥ वाढी नृपा प्रीतिरसें कुमारी ॥
॥ परी न सेवी यवनोत्तमारी ॥

॥ ज्या कामिनी लोचनबाण मारी ॥ ३० ॥

**आर्या.**

॥ भ्रूनर्तनांत राजी भूषवितो तो सुलक्ष्यवसनांहीं ॥
॥ गुंते सुवक्त्रपद्मीं भूपअलीची सुबुद्धिरसमा ही ॥ ३१ ॥
॥ भोजन रुचतें कैचें क्षणोक्षणीं वीज चमचमां चमके ॥
॥ न सुचे भाषण त्याला विसरे संबंध बोलणें अमकें ॥ ३२ ॥
॥ जनलज्जेनें फारच कष्टी तैं भूप इंदुवदना हीं ॥
॥ जळलें हृदय परी तें त्या उभयांचें सुगुप्त मदनांहीं ॥ ३३ ॥

**श्लोक ( इंद्रवज्रा. )**

॥ झालें असो भोजन तें कसेंही ॥
॥ लागे परी वेध नृपाळ देहीं ॥
॥ सुचे न त्याला हित तें जनाचें ॥
॥ सदा शुभांगी त्द्दयांत नाचे ॥ ३४ ॥
॥ कुरंगनेत्रा नवहेमरंगी ॥
॥ तन्वी शुभी सिंहकटी सदंगी ॥
॥ चंपाकळी नासिक रम्य नामी ॥
॥ नितंबिनी कुंजरमंदगामी ॥ ३५ ॥
॥ भुजंगवेणी रुचिरांगपाणी ॥
॥ सुहास्यवक्त्रा गुणरत्नखाणी ॥
॥ सुमौक्तिकीं भूषितकर्ण बाला ॥
॥ रत्नान्विता मंडित कंठमाला ॥ ३६ ॥
॥ भारें लवे पुष्पित दिव्य वेली ॥
॥ उरोजभारें लवली मराळी ॥
॥ नितंबभारें परि सावरीलें ॥

॥ टेंकूकटी होउन साम्य ठेलें ॥ ३७ ॥
॥ लाजे तिला चंद्र नभांत भारी ॥
॥ देखे कटी खिन्न पडे द्विपारि ॥
॥ शोकीं बुडे मंदगती गजेंद्र ॥
॥ नोहे कसा लुब्ध तिला नरेंद्र? ॥ ३८ ॥
॥ ओष्ठप्रभा विद्रुमतुल्य भासे ॥
॥ दंतप्रभा रत्नरूचीस हांसे ॥
॥ धिःकारिती जे कुच पद्मकोशा ॥
॥ ते मानिती फार परी क्षितीशा ॥ ३९ ॥

**आर्या.**

॥ पंतां[1] ह्मणे नृपति तो शिरके कर भव्य सोयरा माला ॥
॥ घाली असें करीं कीं तन्वंगी दिव्य सोयेरा[2] माला ॥ ४० ॥

**श्लोक ( इंद्रवज्रा. )**

॥ शरदृतुस्त्री नव यौवनाची ॥
॥ विशुभ्रवस्त्रा खगभूषणाची ॥
॥ राका धरी संपुट चंद्र हातीं ॥
॥ मागे जरा तेज मुखा पाहा तीं[3]! ॥ ४१ ॥
॥ पंता प्रभा हे मुखचंद्रमाची ! ॥
॥ माझी मती थक्क नरोत्तमाची ! ॥

---

१. शामराज पंतास. २. सोयराबाई.

३. शरदृतूची बायको पूर्णिमा तरूण, शुभ्र वस्त्र परिधान केलेली, व ग्रहरूप अलंकार घातलेली, अशी चंद्ररूप वाटी हातांत घेऊन माझ्या प्रियेच्या मुखाजवळ तेजाची भिक्षा मागायास येते पहा ! असें शिवाजी बोलतो.

॥ मलाच ते योग्य यशोधनाला ॥
॥ नागीण मैलागिरि चंदनाला ॥ ४२ ॥
॥ पंता कशी कोमल अंबुजाक्षी ॥
॥ धनुर्धरा प्रेक्षण बाण लक्षी ॥
॥ घायाळ मी तीव्रशरप्रहारें ॥
॥ भीरू मला जिंकितसे पहा रे ॥ ४३ ॥
॥ धन्वी महा दिग्विजयी प्रतापें ॥
॥ तन्वी करी त्या हत पुष्पचापें ॥
॥ अमोघ ज्याचा शर भूमि फोडी ॥
॥ सुभ्रू तया अस्त्र सुहास्य सोडी ॥ ४४ ॥

**दिंड्या.**

॥ जाय शिरक्याशीं बोल याच काळीं ॥
॥ कुरंगीनें गांठिला सिंह जाळीं ॥
॥ प्रेम रज्जू लावण्य जाल ज्याला ॥
॥ मुक्त वेगें कर सक्त मृगेंद्राला ॥ ४५ ॥
॥ बोल मजला जगतांत एक वीर ॥
॥ पुष्पधन्वा निशि लक्षितसे तीर ॥
॥ चारुगात्रा आणोनि पुढें ठेवी ॥
॥ तीव्र आपण मागून बाण लावी ॥ ४६ ॥
॥ करीं मीही धनु सज्ज झुंजण्याला ॥
॥ प्रतापानें शत्रूस जिंकण्याला ॥
॥ गुप्त होई परि होय तो अनंग ॥
॥ गप्त रूपें ह्रदयांत करी रंग ॥ ४७ ॥
॥ पुन्हा वाटे वेधूंच सारसाक्षी ॥

॥ परी ज्ञानी मी होय सार साक्षी ॥
॥ वधी कैसा रणधीर कोमलांगी ॥
॥ भीरु अबला रंभोरु हेमरंगी ॥ ४८ ॥
॥ अरे इंदीवर होय कांचनाचें ॥
॥ ज्यांत वाटे लावण्य अंबु नाचे ॥
॥ मरंदाच्या ज्यांतील सुवासानें ॥
॥ भृंग होती रे गलित देहभानें ॥ ४९ ॥
॥ भ्रमर कैसा फोडील त्यास दातें ॥
॥ चुरूं कैसीं मी चारुकळी हातें ॥
॥ परी सखया वाटतें अंतरंगीं ॥
॥ मला परिरंभो गोरटी सदंगी ॥ ५० ॥
॥ ह्रदय माझें हें विद्ध शत्रुबाणीं ॥
॥ शस्त्रघातें हे वज्र होत पाणी ॥
॥ पथीं माझे चालोनि पाय गेले ॥
॥ अंग युद्धें हें स्पर्शहीन झालें ॥ ५१ ॥
॥ सदंगीच्या त्या पीन उरोजांनीं ॥
॥ ह्रदय माझें होईल शांत मानीं ॥
॥ कर स्पर्शे होतील सुखी दैवें ॥
॥ अंग शीतल होईल घट्ट खेंवें ॥ ५२ ॥
॥ अमित कांटे टोंचले मत्पदातें ॥
॥ यास तरुणी चोळील काय हातें ॥
॥ वीरअंकीं मानेल काय जागा ॥
॥ कामिनीच्या त्या मृदु नितंबभागा ॥ ५३ ॥
॥ ऊरु रंभोरु एक होइ का रे ॥

॥ पद्महस्ती हस्तीस भुजाधारें ॥
॥ कटी सुकटी हें त्हृदय उरोनांशीं ॥
॥ वदन होई का वक्त्रशशांकाशीं ॥ ५४ ॥

श्लोक ( इंद्रवज्रा. )

॥ ऐसें वदे तो नृप शामराजा ॥
॥ मोही त्वरें तो शिरक्यास राजा ॥
॥ स्वयंवरीं ते मग आदरांहीं ॥
॥ प्रेमें नृपा वाहति पुष्प पाहीं ॥ ५५ ॥
॥ अनर्घ्य तें रत्न अविद्ध लाहे ॥
॥ रसद्र अस्वादित सत्फला हे ॥
॥ नोहे कसा चंद्र सतेज हातीं ॥
॥ चंद्रानना शोभविते गृहा ती ॥ ५६ ॥
॥ लावण्य तेजें नृप मंदिरांत ॥
॥ विद्युत्प्रभा ते चमके नभांत ॥
॥ सद्यौवनीं ते मदनिर्भरानें ॥
॥ शोभे सदा धुंद सुलोचनानें ॥ ५७ ॥
॥ प्रकाशलें मंदिर वक्त्रधामीं ॥
॥ नोहे कसा तो विधु भूपधामीं ॥
॥ डोले सदा सुंदर मंदगामी ॥
॥ इभी कशी ते सदनीं न नामी ॥ ५८ ॥

श्लोक ( वसंततिलका. )

॥ नोहे कसा कृशकटी नृप मंदिरांत ॥
॥ कैशी विशालनयनी न मृगी गृहांत ॥
॥ रंभा कशा वद न भूचर पाद जीचे ॥

॥ लोकांत धन्य अति दैव तिच्या पतीचें ॥ ५९ ॥
॥ कंजा परी कवन हें धरितें सुरंगा ॥
॥ शृंगार त्यांत मधु हा रस लोकभृंगा ॥
॥ चंडांशु हा कवि तयास सुबुद्धि गंगा ॥
॥ चंद्रानना जनमती बघती सदंगा ॥ ६० ॥
॥ शृंगार कीं बहु सुशोभित हा अनंगा ॥
॥ छंदानुसार नव होइ कथाप्रसंगा ॥
॥ मंदार कीं कविस हा भवभीतिभंगा ॥
॥ रंगांत जो उडवितो सुमनस्तुरंगा ॥ ६१ ॥
॥ मंदाकिनी कविमनोगत वा चिदंगा ॥
॥ शब्दांबुओघ निववी भवतप्तअंगा ॥
॥ पंकांकिता जरि गमे जलधार मंदा ॥
॥ संतास नेइ परि ईशपदारविंदा ॥ ६२ ॥

# भाग पांचवा.

श्लोक ( पृथ्वी छंद. )

॥ प्रभा प्रकट या जगीं रवि करप्रदानें करी ॥
॥ तशी सुयशभा प्रभू सुमति विप्रदानें करी ॥
॥ सुधा सुवच बोलतो द्विजजनांस आधारसें ॥
॥ ह्मणोनि कवि जोडितो बहुत या प्रबंधा रसें ॥ १ ॥

**दिंड्या.**

॥ शिवाजीचा उत्कर्ष जाहला हें ॥
॥ विजापुरचा तो बादशहा पाहे ॥
॥ दुःखपंकीं तो यवन भग्नजाती ॥
॥ पडे घाली तोंडांत पहा माती ॥ २ ॥
॥ दिवसरजनी विव्हळे अंतरंगीं ॥
॥ धैर्य नाहीं तिळमात्र परी अंगीं ॥
॥ चरफडे तो जाळ्यांत जेंवि मीन ॥
॥ प्रधानातें होऊनि वदे दीन ॥ ३ ॥
॥ पहा आचरिलें शत्रुजंतुकानें ॥
॥ सिंहराज्यीं हें कपट निर्भयानें ॥
॥ यास वधिल्यावांचोनि सौख्य नाहीं ॥
॥ तरी काढा सुविचार यास कांहीं ॥ ४ ॥
॥ तदा केला सिद्धांत एक त्यांणीं ॥
॥ महा योद्धा अनिवार सैन्य यांणीं ॥
॥ रणीं जिंकावें बंडपुंगवाला ॥
॥ लपुन मारी जो यवनकुरंगाला ॥ ५ ॥

**साकी.**

॥ जोहर शिदी योजियला मग जिंकावयास त्याशी ॥
॥ अफसुलखानाहुन बहु सेना दिधली तयास खाशी ॥ ६ ॥

**दिंडी.**

॥ पन्हाळ्याच्या किल्ल्यांत शिवाजीला ॥
॥ शूर शिद्दीनें त्वरित गांठियेला ॥
॥ दिला वेढा निर्भेद्य त्या गडाला ॥

॥ मार्ग मुंगी जाण्या न ठेवियेला ॥ ७ ॥

श्लोक ( कामदा. )

॥ चार मास तो शिद्दि रांगडा ॥
॥ युक्तिने बहू वेढि त्या गडा ॥
॥ ठेविला जरा ही न वांव रे ॥
॥ लोकनाथ तैं फार घाबरे ॥ ८ ॥

श्लोक ( पृथ्वीछंद. )

॥ भयें न दडतो जरी लघु अशा नगाभीतरीं ॥
॥ कधींहि निजशत्रुच्या गवसतो न गाभीं तरी ॥
॥ मिळे न मज शिद्दिच्या कटकसागरीं या तरी ॥
॥ जळे नृपति तो महा बहुत विव्हळे अंतरीं ॥ ९ ॥

श्लोक ( कामदा. )

॥ शत्रु भोंवतीं काळ भासले ॥
॥ वाटलें तया आयु संपलें ॥
॥ विघ्न घेतसे प्राण हें खरें ॥
॥ माय अंबिके धांव सत्वरें ॥ १० ॥

श्लोक (वसंततिलका.)

॥ आले बये बहुत संकटसंघ गेले ॥
॥ या लेंकरास परि हें वधण्यास ठेलें ॥
॥ याला उपाय न सुचे निरसावयाला ॥
॥ कां लांबवी सुजननी निजबालकाला ॥ ११ ॥
॥ पाहे सुदान मज देइ गुरो कृपा हें ॥
॥ पाहें तरी स्वनयनीं मम आपदा हे ॥
॥ आहें पदांकित तुझा तुज लाज बा हे ॥

॥ साहेचि मृत्यु परि दर्शनआस राहे ॥ १२ ॥
॥ वाणी अशी परिसतां बहु दीनवाणी ॥
॥ ज्ञानी महान गुरु येइ नभप्रयाणी ॥
॥ पाणी असे नृपवरा नयनीं न आणीं ॥
॥ त्या नीववी गुरु अशा मृदु भाषणांनीं ॥१३॥
॥ आला जयौघ तुजला अभिमान झाला ॥
॥ घाला ह्मणोनि बसला तुज भूमिपाला ॥
॥ माया अशी बहुत दुस्तर लोकराया ॥
॥ वायांचि हे परि खरी तुज भेवडाया ॥ १४ ॥
॥ दायाद षड्रिपु तुला उठले लुटाया ॥
॥ कायामनें विसरशी तंव विश्वकाया ॥
॥ हा मीं असें स्फुरण विस्मर तोच रामीं ॥
॥ कामीं पुढें विषय पाडितसे लगामीं ॥ १५ ॥
॥ स्वामी अहो नृप वदे बहु मी सुकामी ॥
॥ यामीं पहा निमिषही रतलों न नामीं ॥
॥ कामीं मजा उडविली बहु रम्यधामीं ॥
॥ त्या मीपणास मज हें अति विघ्न नामी ॥ १६॥
॥ माला नको गुरुवरा विषराजप्याला ॥
॥ काला क्रमीन पद सेवुन चित्रसाला ॥
॥ हा सेवकाशय गुरू परिसोनि हांसे ॥
॥ कांसे धरोनि वदला वदलास खासें ॥ १७ ॥
॥ राजा असें मदत मी तुज देवकाजा ॥
॥ जा जा अशा भिउं नको व्यसना सुराजा ॥
॥ त्याला असें कथुन तो तपसिद्धिशाला ॥

॥ आला तसा नभपथीं झट गुप्त झाला ॥ १८ ॥

दिंडया.

॥ असो, शिद्दीचें काय पुढें झालें ॥
॥ कसें संकट तत्काल थोर गेलें ॥
॥ ताप शिद्दीचा अनल पेटला कीं ॥
॥ भूप कैसें पर्जन्यअस्त्र टाकी ॥ १९ ॥
॥ दर्प शिद्दीचा सर्प नृपा बाधी ॥
॥ तदा मोहन मंत्रास भूप साधी ॥
॥ गमे शिद्दी दशवदन दैत्य भारी ॥
॥ भूपसीता ते स्वतंत्रता चोरी ॥ २० ॥
॥ तिमिरवानर येऊन देख कामा ॥
॥ कशी सीता लाधली भूपरामा ॥
॥ शिद्दिरावण कैलासदुर्ग घेरी ॥
॥ परी कैसें शिव व्यसन तें निवारी ॥ २१ ॥

श्लोक (वसंततिलका.)

॥ पाहोनि तें कटक दक्ष सदा निदानीं ॥
॥ गेला तहास करण्या नृप बद्धपाणि ॥
॥ बोले प्रगल्भ वचनें बहु दीनवाणीं ॥
॥ प्राणा मना बल हरी मृदु भूपवाणी ॥ २२ ॥
॥ वाटे तयां समर दुर्धर होत नाहीं ॥
॥ झाला रिपू अबल दुःसह यातनांहीं ॥
॥ ते पारणा बहुत जागरणा कराया ॥
॥ निद्रेस सेविति रसें श्रमही हराया ॥ २३ ॥
॥ ते कृष्णपक्षनिशि, अंतहि चंद्रिकेचा ॥

॥ आकाश कृष्ण घनगर्द; सुतारकेचा ॥
॥ नाहीं प्रकाश दिसला नभ दावणार ॥
॥ सत्सूच्यभेद्य[1] भरला घन अंधकार ॥ २४ ॥
॥ कृष्णांबरें कसित कास निशा भयान ॥
॥ झिल्ली उभी गमतसे जगतीं जवान ॥
॥ चंद्रार्कतेज हरुनी विजयांत डोले ॥
॥ त्यांतीं हळू किणि किणि मृदु शब्द बोले ॥२५॥
॥ प्राणी निशाचरहि हिंस्र महान भ्याले ॥
॥ पाहून त्या घन तमा वन गप्प झाले ॥
॥ भक्षावया मुख करासहि तें नदीसे[2] ! ॥
॥ ज्याचें तयास गमलें न सजीव मीसें ! ॥ २६ ॥

श्लोक (इंद्रवज्रा.)

॥ तशांत ते कज्जलपर्वताली ॥
॥ विशालशा कृष्णरथांत आली ॥
॥ जुंपून त्या मत्त गजां निघे ते ॥
॥ हाकावया नागिण कृष्ण घेते ॥ २७ ॥
॥ आपाद कृष्णांबर वेष्टिलेली ॥
॥ सेवे सवें कृष्ण सखीहि ठेली ॥
॥ नीलोत्पला घे नव वाम हातीं ॥
॥ प्रियांधकारा सुरता वहाती ॥ २८ ॥
॥ मदांध तैं होउन अंधकार ॥
॥ आलिंगितो तीस करी बहार ॥

---

१.(सत्-सूचि-अभेद्य)=अणीदार सुईनेंही टोंचण्यास कठीण असा.
२. हाताला तोंडात घास घालण्यास दिसेना ( इतका अंध:कार.)

॥ ते एक होती सुरतप्रभावें ॥
॥ घनांधकारास अगाध गावें[1] ॥ २९ ॥

श्लोक ( स्रग्धरा· )

॥ ऐशा त्या अंधकारीं असित सुवसनी घेतलें सैन्य देख ॥
॥ गोळा दारू समस्तां नव चक्र दिधलीं अस्त्रशस्त्रें सुरेख॥

---

१. "तशांत ते कज्जलपर्वताळी" येथून या तीन श्लोकाचे अर्थ दोन आहेत. एक सरळ अर्थ असा कीं, आधींच पुष्कळ अंधार पडला असतां त्या समयास अंधाराची स्त्री काजळाच्या टेंकडीसारखी ओळ, ही काळया रथांत बसून व त्यास काळे हत्ती जुंपून, हातांत काळी सर्पीण हाकण्यास घेऊन आणि काळें वस्त्र परिधान केलेली डाव्या हातांत काळ्या कमळाचें फूल हुंगण्यास घेऊन, कृष्णवर्ण एका सखीसहवर्तमान आली. ती आपल्या पतीस क्रीडा करण्यास बोलावूं लागली व त्या वेळेस तिचा नवरा अंधःकार हाही मदोन्मत्त होत्साता तिजबरोबर रममाण होऊन दोघें एकमय झालीं. तेणेंकरून अंधाराची अत्यंत परमावधि केलीआहे. ही अतिशयोक्ति दाखविणारा हा सरळ अर्थ होय. आतां दुसरा अर्थ अन्योक्तीनें असा घ्यावयाचा कीं, त्या वेळेस शिवाजीचे लोक काळीं वस्त्रें परिधान करून पळून जाण्याकरितां त्या किल्ल्याच्या मैदानांत ओळीनें उभे होते, हीच कोणी एक काजळाची ओळ मानली आहे. तो किल्ला हाच कोणी एक काळा रथ, आणि शिद्दी जोहराचे वीर हेच कोणी हत्ती त्या रथास जुंपले आहेत. त्या हत्तीस हाकण्याकरितां त्यांनीं तरवार घेतली होती हीच काळी नागीण व डाव्या हातीं ढाल होती हें काळें पुष्प घेतलें आहे असें मानिलें, व त्या लोकांच्या डाव्या बाजूस बंदूक होती ही त्यांची सेवा करणारी सखी धरली आहे. आतां त्या वेळेस त्या लोकांस अंधार अत्यंत प्रिय होता सबब ते अंधकारास मनापासून बोलावीत होते हें उघड आहे. हे लोकही काळे आणि सर्व सामान काळें यामुळें अंधकार फार माजला व ते सर्व अंधःकारमय होऊन अत्यंत अंधार झाला असें रूपक वर्णिलें आहे.

॥ रज्जूमार्गें प्रयत्नें हळु हळु उतरे काननीं भूमिपृष्ठीं ॥
॥ गेला देवोनि टाळी निजरिपु करिं तो युक्तिनें दीर्घदृष्टि॥ ३० ॥

श्लोक ( इंद्रवज्रा. )

॥ गेल्यावरी फार दुरी करी तो ॥
॥ शत्रू हरी काय तरी धरीतो ॥
॥ जागे करी मानकरी करीं तो ॥
॥ देखे अरी एक गिरीवरी तों ॥ ३१ ॥

श्लोक (स्वागता.)

॥ लागलेचि रिपु पाठि धराया ॥
॥ यामिनींत रण घोर कराया ॥
॥ शत्रुचा कपटगर्व हराया ॥
॥ काननीं विजयकीर्ति वराया ॥ ३२ ॥

श्लोक (शिखरिणी.)

॥ निशीमाजी दैवें विपुल वहु पर्जन्य पडला ॥
॥ महावेगें मोठा सरसुतट तोयें विघटिला ॥
॥ जलौघानें तेव्हां विपिन भरलें सर्वहि पहा ॥
॥ तदा यत्नें त्याचें मुख फिरवितो काय नर हा! ॥३३॥

आर्या.

॥ शिद्दीनें देखियला खिंडीमध्यें नृपाल चढतांना॥
॥ क्षितिपतिअनुगांनींही विलोकिलें त्या स्वपृष्ठिं येतांना ॥ ३४ ॥

१. पन्हाळा किल्ला हा कोणी एक तलाव; शिद्दीच्या लोकांचा वेढा हा त्याचा तट; शिवाजीचे काळीं वस्त्रें धारण केलेले लोक हेंच कोणी त्या तलावांतील पाणी; व रात्रीं पडलेला अंधःकार हाच कोणी पर्जन्य होय. तो सैन्यरूप जलौघ सर्व अरण्यभर पसरल्यावर हा शिद्दी काय त्यांना पुन्हा किल्ल्यात आणणार आहे ?

श्लोक ( पृथ्वी छंद. )

॥ सुधीर नृप मावळ्या निजजनां तदा बोलला ॥
॥ लढा झटुन वीरहो अरि जरी असे थोरला ॥
॥ गडांत झट जाउनी करिन बार ते आयका ॥
॥ महीतळ न आतळूं तंवर द्या कदा बंदुकां ॥३५॥

दिंडी.

॥ असे बाजी सरदार मावळ्यांचा ॥
॥ वीर धीरचि तो शूर बहू साचा ॥
॥ कार्य दुर्धर त्यावरी सोंपवीलें ॥
॥ तयानेंही तें वचन पुरें केलें ॥ ३६ ॥

श्लोक ( कामदा. )

॥ युद्ध तें महा घोर मातलें ॥
॥ वीर रोखुनी बार काढिले ॥
॥ मावळे बहू शूर भासले ॥
॥ यवन भीउनी पृष्ठि हाटले ॥ ३७ ॥

दिंडी.

॥ टिके बाजी सेनेश लढायाशी ॥
॥ दोन यामांपर्यंत आविंधांशीं ॥
॥ अर्ध जेव्हां निज लोक ठार झाले ॥
॥ थरारोनी रोमांच तया आले ॥ ३८ ॥

श्लोक ( कामदा. )

॥ शक्ति त्या नसे बार काढण्या॥लाविले परी. शत्रु कांपण्या॥
॥कुमक शत्रुला थोर पोंचली॥यवन वारणीं धूम मांडिली॥३९॥

**श्लोक** ( मालिनी.)

॥ लटलटलट कांपे शक्ति नाहीं लढाया ॥
॥ सुभट समरिं ठेला चित्रसा शांत व्हाया ॥
॥ त्यजि तनु निज आत्मा सांडुनी तो पसारा ॥
॥ धडधडधड तेव्हां ऐकिले बार वारा ॥ ४० ॥

**दिंडी.**

॥ सुखी झालों मी वचन तदा बोले ॥
॥ महानंदीं तत्काळ वीर डोले ॥
॥ तदा शिद्दी सोडोनि रणा गेला ॥
॥ बादशाहा वृत्तांत कथीयेला ॥ ४१ ॥

**साक्या.**

॥ विश्वास न पटला कोणाचा मग तो बादशहाला ॥
॥ परि नृपतीच्या त्रासुन गेला फारचि नित्य शहाला ॥ ४२ ॥
॥ स्वतांचि कंबर बांधियली मग त्याणें युद्ध कराया ॥
॥ अनुकुल दिसलें सर्वहि कांहीं नाहीं बद्धक राया ॥ ४३ ॥
॥ बादशहा तो नृपतीचा गड मोठा घेइ पन्हाळा ॥
॥ प्रावृट्कालारंभ होय तैं तापद जाइ उन्हाळा ॥ ४४ ॥

**श्लोक** ( इंद्रवज्रा. )

॥ आच्छादिलें व्योम घनांबुदानें ॥
॥ संतोषले याचक अंबुदानें ॥
॥ झाला पहा एक नदी व नाला ॥
॥ शोभाहि दे फार नदी वनाला ॥ ४५ ॥
॥ पंकांकिता भू अमुपा वनांहीं ॥
॥ पंथा क्रमायास उपाव नाहीं ॥

॥ शोभे तृणारूढ सरित् तटाकें ॥
॥ तोयें भरे पूर्ण गिरींत टाकें ॥ ४६ ॥
॥ तुडुंबले बंब तडाग रानीं ॥
॥ केलीं मुखें म्लानचि सागरांनीं ॥
॥ मृण्मिश्र वाहे विपिनांत वारि ॥
॥ भूक्लेश भास्वत्करभूत वारी ॥ ४७ ॥
॥ सदैव चाले घन गर्जना ते ॥
॥ दावी भया थोर पहा जनांतें ॥
॥ सौदामिनीतेज नभीं लकाके ॥
॥ जाणो घनाचा ध्वज तो झकाके ॥ ४८ ॥

**श्लोक** (स्वागता)

॥ श्याम मेघ गगनीं फिरताती ॥
॥ व्योमभा सुरुचिरा हरिताती ॥
॥ व्यापिलें घनतमें गगनास ॥
॥ दिग्वधू असित घे वसनास ॥ ४९ ॥

**श्लोक** (वसंततिलका.)

॥ दिग्सुंदरी तव नगांस हिरोनि नेलें ॥
॥ अब्दें कसें त्हदय निर्दय थोर केलें ॥
॥ कृष्णांबरें कसुन कांस तुझी मराळे ॥
॥ देखें कसा असुर मत्त नभांत खेळे ॥५०॥

**श्लोक** (इंद्रवज्रा.)

॥ दिसावया केवळ भिल्ल पाहीं ॥
॥ वरी प्रमोदें नवरी क्षपा ही ॥
॥ त्वदीय ने कांत शशांक गेहा ॥

॥ झाला किती अंबुद दुष्ट गे हा! ॥ ५१ ॥

**आर्या.**

॥ त्वद्रिपुचि हा कसा गे अन्नोदक दे समस्त जिवांस ॥
॥ नरपतिसदृश शोभे प्रेमें नभमंदिरीं करी वास ॥५२॥
॥ सदय असाहि असोनी गमतो कैसा त्वदीय नगहर हा ॥
॥ कांत तुझा नग सर्वहि देइल तूतें मनांत शांत रहा॥५३॥
॥ उष्मासुरवधसमर्यीं त्वत्पति गमला समर्थ न वधा त्या ॥
॥ धाडावें घनराजा ससैन्य वाटे प्रशस्त तंव धात्या ॥५४ ॥
॥ आला सुहास्यवदने क्रोधें यास्तव करावया कदना ॥
॥ येथें बसूं नको गे वेगें घे धांव जावया सदना ॥ ५५ ॥

**श्लोक** (भुजंगप्रयात.)

॥ स्त्रियांनीं कसें युद्धभूमीस यावें ॥
॥ पतींनीं तयां युद्धरंगा कथावें ॥
॥ बहू होउनी धीट आलीस बाले ॥
॥ ह्मणोनी तुला कष्ट ऐसे जहाले ॥ ५६ ॥

# भाग साहावा.

श्लोक ( इंद्रवज्रा. )

|| राकेश घे भास्कर वा निधान ||
|| अंकोष्णता त्यां विषता विधान ||
|| क्षारत्व सिंधु क्षय दीपकास ||
|| न साम्य हो त्या कुलदीपकास || १ ||
|| भूपाल तो धन्य जगांत पाहीं ||
|| अप्राप्त सत्कीर्ति सुराधिपा ही ||
|| दीनांस पोशी जनकासमान ||
|| शौर्यप्रभावें बहु कीर्तिमान || २ ||
|| त्याचा यशानेंच विकास मान ||
|| देती न हो कोण अशास मान ||
|| त्याच्या स्पृहा चंचल नित्य मा न ||
|| निदान देणें सदनाधमा न || ३ ||

दिंडया.

|| चंद्रशेखर भूपास सहाकारी ||
|| बंड झालें कर्नाटकांत भारी ||
|| धूम केली देशांत बंडभारीं ||
|| निपट शत्रूही थोर वीर मारी || ४ ||
|| कोण धाडूं रणधीर कारभारी ||
|| कोण माझें हें विघ्न थोर वारी ||

॥ अशा व्यसनीं तो यवन दंडधारी ॥
॥ पडे जैसा धनहीन दुराचारी ॥ ५ ॥
॥ गमे शिरल्या वृकतति व्रजामाजी ॥
॥ बद्ध केले सरदार वीर काजी ॥
॥ बुडे वाटे त्या यवनराज्य आजी ॥
॥ बादशाहा जाण्यास होय राजी ॥ ६ ॥

**आर्या.**

॥ कर्नाटकांत तेव्हां जावें लागेचि बादशाहाला ॥
॥ वाडीचा सांवत मग अविंधपक्षी नृपावरी आला ॥ ७ ॥
॥ त्याच्या कुमके होता मुधोळिंचा तो पतंग घोरपडे ॥
॥ झेंप दिव्यावर घाली ह्मणोनि त्याला प्रसंग घोर पडे ॥ ८ ॥
॥ शाहजिला कैद बळें केलें यानेच जेमनीं होतें ॥
॥ आतांचि सूड घ्यावा आलें त्या नृपतिचे मनीं हो तें ॥ ९ ॥
॥ युद्धतयारीमध्यें गेला होता मुधोळकर गांवा ॥
॥ रात्रीं छापा घालुन मारी बोका क्षणांत तो रावा ॥ १० ॥

**साकी.**

॥ सांवत साव तसा तो सावध धांवत येइ रणाला ॥
॥ गांव सुनांवचि हाव न त्याच्या घाव न डाव मनाला ॥ ११ ॥

**श्लोक** (अमृतध्वनि.)

॥ आऊत ज्या सुधन राऊत तो भट न ठाऊक हे नृपवरा ॥
॥ भाऊ जया स्वरिपु वाऊ गमे समर खाऊ नृपास दुसरा ॥
॥ जाऊं रिपूस बळ दावूंच काय जय पावूं स्त्रियांस पुसतो ॥
॥ हाऊस फार वर पाऊस त्यास नृपबाहुप्रताप दिसतो ॥ १२ ॥

श्लोक. ( पृथ्वी छंद. )

॥ सकोप नृप गांठितो हरि जसा गजेंद्रांतती ॥
॥ वसेच चपला जणूं चपलता नरेंद्रांत ती ॥
॥ लढोनि अवघाचि घे मुलुख सांवताचा पहा ॥
॥ तया सहन होइना प्रखर शत्रुचा ताप हा ॥ १३ ॥

श्लोक ( इंद्रवज्रा. )

॥ प्रार्थीतसे तो मग पोर्तुगीजा ॥
॥ द्या हो मला साह्य वदे स्वतेजा ॥
॥ अमानिशा कज्जलपर्वताला ॥
॥ प्रार्थी सख्या दे लव तेज माला! ॥ १४ ॥
॥ चंडांशु जिंकी रिपु अंधकारा ॥
॥ तो प्रार्थितो तैं लघुतेजकारा ॥
॥ जिंकीं वदे मद्रिपु हा महा रे ॥
॥ तैसाचि तो आश्रय त्या पहा रे ॥ १५ ॥

श्लोक (शिखरिणी. )

॥ फिरंग्यांनीं जेव्हां प्रबल बलभारा निरखिलें ॥
॥ तदा वाडीपाला क्षणि पिटुन त्यांनींहि दिधलें ॥
॥ फिरे येथें तेथें तिडतिड जणूं अर्भककरी ॥
॥ परी वाजी आजी कधिं न फिरवी शस्त्र न धरी ॥ १६ ॥

दिंड्या.

॥ मार खाई तो वन्यकरीवाणी ॥
॥ तदा जोडी नृपतीस पादपाणी ॥
॥ वदे पोटीं अपराध सर्व घाला ॥

---

१. काजव्यास.

॥ चरणसेवा सांगोनि सेवकाला ॥ १७ ॥
॥ लीन झाला उन्माद सर्व गेला ॥
॥ पुन्हा स्थापन तो राजपदीं केला ॥
॥ मित्र भूपा यवनास शत्रु झाला ॥
॥ स्वधर्माचा अभिमान त्यास आला ॥ १८ ॥

**श्लोक** ( पृथ्वीछंद. )

॥ समुद्र लुटण्या पुढें गलबतें लढाऊ करी ॥
॥ भयें नजर देति त्या बहु युरोपवासी बरी ॥
॥ ठिकाण निज जाहजा नृप दुरी कुलाबा वरी ॥
॥ बहू निपुण वारिधीअटनवृत्ति त्यां बावरी ॥१९॥

**दिंडी.**

॥ बंड मोडुन कर्नाटकांतुनी तो ॥
॥ विजापुरचा मग बादशहा येतो ॥
॥ व्यर्थ लढणें वाटोनि शिवाजीशीं ॥
॥ तहालागीं तो बोलवी तयाशी ॥ २० ॥

**आर्या.**

॥ घटक शहाजी होता निजसुतहितकार्यहेतुसामाचा ॥
॥ राज्यपदीं जो चढवी लढवी यवनाशिं वृद्ध कामाचा॥२१॥

**श्लोक** ( इंद्रवज्रा. )

॥ प्रताप वाढे बहु त्या नराचा ॥
॥ प्रकाश लोकीं जणुं भास्कराचा ॥
॥ युद्धें करोनी अति तेज दावी ॥
॥ छंदांत ते कीर्ति किती वदावी ॥ २२ ॥
॥ ठेवी बहु स्वारहि वारणांतें ॥

॥ सेनापती उत्सुक जे रणातें ॥
॥ स्थापी नवें राज्यचि तो लघूसें ॥
॥ अदीलशाही मुलखांत घूसे ॥ २३ ॥

**आर्या.**

॥ बादशहाशीं स्नेहें झाला भूनाथ तो रिकामा जी ॥
॥ शोभे योद्ध्यांमध्यें रजनीपति जेवि तारकांमाजी ॥ २४ ॥

**साक्या.**

॥ महान भूपति लहान मग तो सोडी राजगडास ॥
॥ लहान गादी महान आणी सुदृढ रायगडास ॥ २५ ॥
॥ कड दगडांची विजडा सर्पिण वेष्टी जणुं सुगडा या ॥
॥ नभचुंबी तो दुर्ग खरोखर दुर्ग रिपू झगडाया ॥ २६ ॥
॥ उभारिलीं बहु रम्य मंदिरें केली इंद्रसभाची ॥
॥ नांदे तेथें अत्यानंदें नगतनयेची भाची[1] ॥ २७ ॥
॥ दारू गोळा जेजालाही तोफा बहूत ठेवी ॥
॥ दुर्गम तो गड फार करोनी राजसुखातें सेवी ॥ २८ ॥
॥ रायगडीं ही गादी स्थापुन मानी मनीं शिवाजी ॥
॥ सुखकर ऐशी क्षितींत दुर्लभ कैलासींहि शिवा जी ॥ २९ ॥

**दिंड्या.**

॥ भूपमंदिर तें स्थान इंदिरेचें ॥
॥ बहु प्रीतीचें क्षीरसागरींचें ॥
॥ कनकरंगें सर्वत्र पीत भासे ॥

---

१. नगतनयेची भाची=लक्ष्मी. कारण पार्वती आणि नदी ह्या दोन्ही पर्वताच्या कन्या ह्मणून सख्या बहिणी. आणि नदीचा पति समुद्र व समुद्राची कन्या लक्ष्मी ह्म० पार्वतीच्या बहिणीची मुलगी.

॥ जणूं निशिदिन देदीप्य सूर्य भासे ॥ ३० ॥
॥ छता किनखाबी लावि मौक्तिकांतें ॥
॥ रेखिलें हो वरि हंसमयूरांतें ॥
॥ फार जरतारी शोभती कनाती ॥
॥ दर्पणें तीं बहु जडितरत्न भाती ॥ ३१ ॥
॥ हेमरंगी चौफेर भिंत देखीं ॥
॥ वरी चित्रें अनुपम्य रम्य रेखीं ॥
॥ विल्लोरी नग भा देति मंदिरातें ॥
॥ जणूं वाटे स्थित सदा इंदिरा ते ॥ ३२ ॥
॥ सभोंताली उद्यान दिव्य दाटे ॥
॥ ज्यास देखुन संतोष मना वाटे ॥
॥ जाइ चापा मालती मदनबाण ॥
॥ उरीं टोंचीतो मदन पहा बाण ॥ ३३ ॥
॥ देइ दवणा मरवाहि गंध पाच ॥
॥ प्रकट करितो शर असति ज्यास पांच ॥
॥ लूट करिती ते भ्रमर मरंदाची ॥
॥ परागाची नच चित्र अंबरांची ॥ ३४ ॥
॥ गुलाबाचा तो गुच्छ मना मोही ॥
॥ केतकी ही शेवती करी घाई ॥
॥ बकुळ करिती चढ जुई पाहि रागें ॥
॥ मोतिया तो सर्वांस टाकि मागें ॥ ३५ ॥
॥ मोगरा तो मातंग चमेलीला ॥
॥ देइ धक्का शूरसा पुढें ठेला ॥
॥ तया लोटुन त्या भ्रमरवेष्टितांना ॥

॥ तटाकानें दाविलें पंकजांना ॥ ३६ ॥
॥ कळा नोहे कुचकुंभ कामिनीचा ॥
॥ भृंग नोहे तो नील वर्ण साचा ॥
॥ पत्र नोहे तें नेत्र कुरंगीचें ॥
॥ फोंक नसती ते झोंक नागिणीचे ॥ ३७ ॥
॥ तयां सारोनी नीर दावि रंगा ॥
॥ गंधवायू येवोनि करी दंगा ॥
॥ अशी स्पर्धा ते करित साभिमानी ॥
॥ असे गाऊं ऐश्वर्य किती गानीं ! ॥ ३८ ॥

**श्लोक** ( इंद्रवज्रा. )

॥ कटाववृत्तीं अवधार स्वारी ॥
॥ प्रेमें बहू जी भवदुःख वारी ॥
॥ सेना सभा सेवक सैन्य साचें ॥
॥ शृंगार कैसे तुरगादिकांचे ॥ ३९ ॥
॥ कळेल हें ऐकचि सावधानें ॥
॥ प्रधान मंत्री बरवीं निधानें ॥
॥ वाजी करी श्वापदसंघ जाती ॥
॥ वाद्यध्वनी अंबर फोडिताती ॥ ४० ॥

**कटाव.**

॥ राजाधिराज शिव राजा ॥ भूमंडळ व्यापुन ठेला ॥ ध्रु० ॥ विजया दशमीचा सण भारी, नव दिन ठेवी बंद कचेरी, शक्तिउपासक तो गुणधारी, कोणी येती अतिथी दारीं, देई दानें बहु यवनारी, तोषवुनी त्यां मग निर्धारी, शिरीं हस्त घेउनी बोळवी, प्रतापगडची प्रसन्न देवी, नऊ दिव-

स तो तिथें राहुनी, यथासांग ते नेम सारुनी, शेवटच्या दि-
नि उल्हासानें, कडाकोटशी स्वारी काढी, प्रधान अष्टहि
मुख्य पेशवा, पंत सचिव उपपंत बोलवी, मंत्री सेनापती
आणवी, अमात्य न्यायाधीश सुमंतहि, कारभारि ते दिवाण
फडणिस, मुतालीक, सबनीस, वाकनिस, जामदार, चिटणी-
स, पोतनिस, कारखाननिस, फारसनिस, सुरणीस, नीस
दश, शहानविस, रूपकारनीस हे. दुसेर येती, सुभेदार, स-
रदार बडे ते, शिलेदार, सत्र मुजुमदारसे, जुमलेदारहि, हवल-
दार बहु, जमादारसे, प्रेमें अपुले सजवुन घोडे, कलगी तोडे,
कानि चौकडे, गंदिल ते शिरिं रंगित भरजरि, डावे कानावरि
घालुनियां; अंगीं चढवुन छडीदार जरतारी, रूमरि अंगरखे
भरदार दुहेरी, कटीबंध त्यावरी कूसरी, बांधुन मग त्या
मधिं तरवारी, भाला बिचवा आणि तमंचा, कटयार गुप्ती
बर्चि खंजिरी, जंबिया खांडा खोवुन चतुरी, दाविति अक्कड
दिसती फक्कड, ठुमकत दाविति तेजा ॥ राजाधिराज
शिवराजा ॥ १ ॥

॥ दुसरे निघती चौकिदार ही, दफेदार बहु स्वार शिपाई,
एकाहूनी एक सवाई, पायजम्यांतें घालुन पायीं, डोईव-
रती पीळदार ती पगडी, त्यांची नजर फारचि करडी होती,
दाढी लांबे बडी, मिशांनीं लोपुन नासिक पुडी जाय ती, दिसे
फारची सुरत कावरी, बहुत बावरी, सावरिती ते मिशा वरीं
वरि, पायदळाची गंमत भारी, करांत भाला चक तरवारी,
पागोळ्याचा वेढा बांधुन, दाढांखालुन वरी खोंविती, तोडा
बंदूकिचा पेटवुन काढायाचा बार ठेविती; वेढाआपण कधीं

घालुनी, धडाधडा त्या कडाबिनी मग सोडिति, गिरका मारून ह्मणती सोडा सोडा, गाढा ऐसा कल्ला करूनी, हल्ला जणुं कां किल्ला दुर्गम घेण्या करिती. नाइक बहु सरनाइक आइक, बारिकही बहु लठ्ठ दांडगे; गलेलठ्ठ ते करीं सोडगें घेउन मागें करिति कोडगे, रस्ता छोडो शब्द ओरडे, घसे कोरडे पडति तयांचे. तयांपुढें ते नाचत चालति, हेटकरी, गडकरी, करामधिं तिरकमटा तो घेउन भाला, खोंविति वरती निशाण त्याला, अक्कड दाविति थोर जनांला, माहंच ह्मणती दाढीवाला. संगें चालति बुणगे, करिती कुणगे फारचि, नलगे त्यांना वहन कदाहि, मौजेखातर फौजेसह ते, चालति अपुल्या सोडुन काजा ॥ राजाधिराजशिव० ॥ २ ॥

॥ बरोबरीनें अश्व चालती, छाती वरती करून नाचती, छुमक छुमक पदिं वाळे वाजती, गळां घातल्या माळा त्या खुळखुळां वाजती, फार शोभती जीन जरीचे किनखाबीवरि मीन काढिले, घट्ट भीडले छातिभोंवतीं, गाशा भरगची वर साजे; कलाबतूचा लगाम, तेजें चमके पिंपळपान शिरावरि, अशापरीचे हय नृपतीचे, वीस सहस्रहि एक तोडिचे, निवडक साचे. अंबारीचे हत्ति तसेही, एकाहूनी एक फांकडे, पदीं चांदिचे जब्बर तोडे, दंताभोंवति सुवर्णवेढे, शिरीं झालरी भरगच्चीच्या, जाळ्या झिळमिळती मोत्यांच्या, झूली मशरूच्या त्या हालति, नितंबिनीपरि मंद चालती, झणकू झल्लरी ताले डोलति, चहूं दिशांतें शुंडा फेकिति, घंटा दो बाजुंनीं लोंबती, खंडं खंडं मंद वाजती.

गेंडा तो तर झेंडा साजे,त्याच्या योगें स्वारि विराजे;उंटा-च्या त्या उंचचि माना, नृपसन्माना, उभारिल्या जणुं गुढया च काना,नयनासह त्यां पटें बांधुनी विचित्र नाना. शिकारिचे बहु कुत्रे निवडक, तडक फडक ते सडक शहांगी. तयापुढें ते वन्य पशू वृक व्याघ्र वीबटे;अती गोमटे कोल्हे त्यामधिं, दिसति चोरटे, सहित कारटे, बंदीं घातियले बहु खोटे. चित्ते, रोही, हरण, सांबरें; जिराफ नव रे, फौज पाहुनी बहुत बावरे. ससे, तरस, वनगाइ, घाइनें बावरुनी त्या फिरविति डोई;अस्वल तें दो पायीं,डोलेडोडो बोले घालुन साजा ॥ राजाधि० ॥ ३ ॥

॥ अंबारी त्या बहु कनकाच्या रत्नखचितशा पृष्ठिं गजां-च्या, गाद्या त्यामधिं नरम पराच्या, चांदीच्या शोभती पालख्या, दोदांडीच्या तशा नालख्या; म्याने भोई गाणें गातचि नेती मानें, रथ नानाविध, दोचाकी चौचाकी हि बहु. गाडया बैली बुरख्याच्या, त्या मराठमोळी, बहू तऱ्हांच्या, रंगित सुंदर; छत्रें अब्दागीर साजरे, अमोल झळकती बहू चामरें, चौऱ्या वारिति अनुग आदरें; गुढया पताका जरिपटका तो; फार शोभतो भगवा झेंडा, झेंडा त्याचा गगनचुंबुनि राम दावितो, गोंडा लोंबे भुई-वरी जरतारी विलसे भारि. निशाणें दुसरीं तीं नृपस्वा-रिबरोबर, सारीं दिपविति नयन जनांचे, वायु जयांमधिं बहुविध नाचे. चोबदार ते ऐटदार बहु, भालदारही, करांत काठ्या, कनकाच्या चक घेउन सुंदर, उच्च स्वरानें ललकारति ते,बडेजाव नृप मेहर्बान हो,निगारखो जी नजर

रखो, हे महाराज राजाधिराज प्रभु. ऐसा त्यांचा कल्ला इकडे वाद्यांचा तो गजर अंबरीं, दाटुन गेलासे बहु दूरी, नौबदिचा तो दणाण भारी, झंझंझंझं तकडूधुं तकडूधुं, डंका उंटावरती साजे, झनन झनन झनझनान गाजे, झणक् झल्लरी मिश्रित वाजे, धडधडधडधड थोर नगारे, टांटुं टांटुं रम्य चौघडे, संबळ तो बहु तुंबळ सूरहि, सनईचे ते सूर मनोहर, सरिगमपधनी सप्तसुरावर, ध्रुपद तराणे वाजति. धुत्तुक धुत्तुक शिंगें, भोवा भोवा कर्णा दंगे, ताशाचे बहु जोड रागिण्या, उग्र काढिती कडकडकड कडडड करिती, ढोलहि ढोंढों तालें वाजति; अशा परीनें भुवन गाजवुनी, जगा मोहुनी, चाले स्वारी गाजा ॥ राजाधिराज शिवराजा ॥ ध्रु० ॥ ४ ॥

# भाग सातवा.

श्लोक ( द्रुतविलंबित. )

॥ सम असे नृप त्या न महीवरी ॥
॥ तनु गमे पुरुषोत्तमही वरी ॥
॥ यवनदैत्यवधा अवतार तो ॥
॥ कलियुगीं जग ईश्वर तारतो ॥ १ ॥

श्लोक ( इंद्रवज्रा. )

॥ क्षरावरी प्रीति न सार साची ॥
॥ गोडी न त्या राजस तामसाची ॥
॥ सत्वस्थ तो सत्वगुणां वरीतो ॥
॥ राहे न जें सार न त्यांवरी तो ॥ २ ॥
॥ भाषा जया येत बहू जनाच्यां ॥
॥ ठाव्या कळा सर्वहि त्या रणाच्या ॥
॥ औदार्य कीर्ति प्रतिभा रवीची ॥
॥ ख्याति त्रिलोकीं जणुं जान्हवीची ॥ ३ ॥
॥ विजापुराच्या मुलखांत थोर ॥
॥ झाला जया मानित बंडखोर ॥
॥ जिंकी प्रभू मोंगल तो कसे ते ॥
॥ अपूर्व चातुर्य पहा दिसे तें ॥ ४ ॥
॥ सत्ताबळें मोंगलराज गाजे ॥

॥ जो सार्वभौमासम भूप साजे ॥
॥ भूमंडळीं साम्य नसे जयाला ॥
॥ त्या जिंकि तो धन्य महायशाला ॥ ५ ॥
॥ राजा जरी जिंकिल भूधराला ॥
॥ आश्चर्य तें काय सुरा नराला ॥
॥ आश्चर्य हें कीं शिव हा लहान ॥
॥ जिंकी परी मोंगल ते महान ॥ ६ ॥
॥ शक्ती नसे हे शिवभूधराची ॥
॥ कृपा परी ते जगदीश्वराची ॥
॥ कवित्व जें यास्तव या नृपाला ॥
॥ तें होतसे स्तोत्रचि विश्वपाला ॥ ७ ॥

**आर्या.**

॥ अन्यपराजयधी दे वार्ता यवनेश एक लवला ही ॥
॥ नृपराज शस्त्रअस्त्रां सज्ज करी मग रणास लवलाही ॥८॥
॥ जयचंद्रदर्शनानें नृपतीच्या धैर्यसागरा भरती ॥
॥ आली तदा तदाच्या मोंगल राज्यांत जातसे भर ती॥९॥
॥ गांवें लुटिलीं त्यांचीं, क्षोभविले थोर यातुपालाही ॥
॥ दिल्लिस्थ राजयाच्या आंगाची होतसे पहा लाही ॥ १० ॥

**श्लोक (स्रग्धरा.)**

॥ षाइस्तेखान त्याणें प्रमुख निजचमू योजुनी धाडियेला ॥
॥ बोले जिंकीं शिवाजी झडकरि यवना शत्रु हा थोर झाला ॥
॥ त्याणें तत्काल मोठें कटक जमवुनी दाविण्या आत्मधामा ॥
॥ एकाएकीं स्वसेनेसहित उतरुनी घेतलें पुण्यधामा[1] ॥ ११ ॥

---

१. पुणें शहर.

## दिंड्या.

॥ सुखें नाचे तें श्वान हंसे गालीं ॥
॥ उडी मारून तो वाजवितो टाळी ॥
॥ भलें आलें हें स्थान करीं थोर ॥
॥ भला झाला मद्यशा एक थार ॥ १२ ॥
॥ जगामाजी अत्यंत माजलेला ॥
॥ मराठ्यांचा उत्कर्ष कळों आला ॥
॥ गमे नाहीं कांहींच यांत पाणी ॥
॥ मोंगलांचा त्यां धाक यमावाणी ॥ १३ ॥
॥ करावें हें जगराज्य मोंगलांनीं ॥
॥ धन्य कीर्ती गातात लोक गानीं ॥
॥ काय सत्ता अत्युग्र धाक काय ! ॥
॥ गर्भ गार्भिण टाकून वदे हाय ! ॥ १४ ॥
॥ काय त्यांना हे शत्रु हिंदु दीन ॥
॥ मुळापासुन हे होत दैवहीन ॥
॥ यांस यांचा हा धर्म फार नाडी ॥
॥ मास मच्छर खाण्यास यांस बेडी ॥ १५ ॥
॥ बाटवावे यां स्वार्थ यांत यांचा ॥
॥ कालगत्या सुखलाभ मिळे साचा ॥
॥ असें बोले तो हिंदुच्या समाजीं ॥
॥ भ्रष्ट करितो नृपसदन पुण्यामाजी ॥ १६ ॥
॥ बलात्कारें जाऊन त्यांत राहे ॥
॥ बाटवोनी विप्रांस मजा पाहे ॥
॥ मंडुकानें सर्पास डागलें हो ॥

॥ कुरंगानें सिंहास टोंचलें हो ॥ १७ ॥

श्लोक ( इंद्रवज्रा. )

॥ ऐके असें हें नृप वर्तमान ॥
॥ सक्रोध झाला स्वमनीं महान ॥
॥ धांवे सुवेगें नव शस्त्रधारी ॥
॥ दावी तया ओजस अंधकारीं ॥ १८ ॥
॥ त्याला मराठी सुबलांश दावी ॥
॥ ज्या तो नसे स्वप्नगतानुभावी ॥
॥ जी बेडकी बैल कधीं न देखी ॥
॥ प्राणी न मोठा जगतांत लेखी ॥ १९ ॥

श्लोक ( वसंततिलका. )

॥ धाया मनांत यवनास तमीं वधाया ॥
॥ जायास फोडुन गृहा करि शत्रु जायां ॥
॥ छापें अशा अबल खान थरार कांपे ॥
॥ तापें पळे परि करांगुलि एक कापे ॥ २० ॥

दिंड्या.

॥ पुढें जाई शिवनेर घ्यावयाला ॥
॥ अमित ओजस हिंदूस दावण्याला ॥
॥ पथीं पाही भुइकोट लघू किल्ला ॥
॥ तरी बोले यावरी करा हल्ला ॥ २१ ॥
॥ व्याघ्रपारध करण्यास जो निघाला ॥
॥ त्यास घाली मार्जार पथीं घाला ॥
॥ पारधीचें सामर्थ्य तदा गेलें ॥
॥ कृत्य तैसें अनुपम्य येथ झालें ॥ २२ ॥

॥ फिरंगोजी सरदार त्या नृपाचा ॥
॥ रानबोका दुर्गांत होय साचा ॥
॥ यवनमूषक हटवोनि करी पार ॥
॥ खान तेव्हां स्वमनांत थिरे फार ॥ २३ ॥
॥ ह्मणे लघु या किल्ल्यास कष्ट ऐसे ॥
॥ महा दुर्गीं आयुष्य उरे कैसें ॥
॥ नजर फाटे त्या देखतां पहाडीं ॥
॥ बादशाहा ती लिहुन कथा धाडी ॥ २४ ॥

**श्लोक ( इंद्रवज्रा. )**

॥ ऐकोनि ती बादशहा ठणाणी ॥
॥ विनंति त्याची न मनास आणी ॥
॥ परी सहाया जयवंत शिंगा ॥
॥ धाडी चमू देउन त्या प्रसंगा ॥ २५ ॥

**दिंडचा.**

॥ खान बोले शिंगास महा वीरा ॥
॥ काय बघशी उत्कृष्ट मार तीरा ॥
॥ खोड मोडीं युद्धांत मराठ्यांची ॥
॥ आपणातें कर जोड सद्यशाची ॥ २६ ॥
॥ शिंग त्याच्या सेनेस सैन्य जोडी ॥
॥ खान गर्वे तें भ्रुकुटि महा मोडी ॥
॥ शस्त्र फिरवुन जयघोष करी फार ॥
॥ झनन डंकाही करी सुखा थार ॥ २७ ॥

**श्लोक (शिखरिणी. )**

तदा भूपें हूपें बहु कटक युद्धा जमविलें ॥

॥ ह्मणे मोरोपंता निजसुमति वीरा गवसिलें ॥
॥ अविंधांनीं आतां प्रकटपर तेजोद्भव करीं ॥
॥ विपक्षांच्या सैन्यीं यश अधिक जोडीं निजकरीं ॥२८॥

श्लोक ( इंद्रवज्रा. )

॥ आंगावरी घेइ रिपू शिवाजी ॥
॥ प्रताप दावी मग मोंगला जी ॥
॥ सोडोनि तोफा बहु एककाळीं ॥
॥ शत्रूचमूमाजि करी धुमाळी ॥ २९ ॥

श्लोक ( स्वागता. )

॥ घाबरे रिपु तया भडिमारें ॥
॥ हाटला त्यजुन लाज तदा रे ॥
॥ खान फार विरला स्वमनांत ॥
॥ कृष्ण आनन न दावि जनांत ॥ ३० ॥

श्लोक ( मालिनी. )

॥ जलदपटल हाकी स्वप्रतापें समीर ॥
॥ जवन सुभट तैसा तो अविंधेश मीरें ॥
॥ विगलित तनुभाना जोडितो शत्रु पाणी ॥
॥ निरखुन नृपतीच्या येइ नेत्रांस पाणी ॥ ३१ ॥

श्लोक ( भुजंगप्रयात. )

॥ बहू खिन्न झाला वदे तो न वाचे ॥
॥ लिही बादशाहा पुढें मी न वांचें ॥
॥ विपक्षीं गमे शिंग; सेना न मोजी ॥
॥ मराठ्यांस या दांडलोकां नमोजी[2] ॥ ३२ ॥

---

१. यवनपदवी वि० २. नमस्कार असो.

श्लोक (इंद्रवज्रा.)

॥ औरंगजेबा नृपती मराठा ॥
॥ वाटे खगेंद्रा न भुजंग मोठा ॥
॥ ऐकून. तें वृत्त कमीपणाचें ॥
॥ उद्गार आले मनिं मीपणाचे ॥ ३३ ॥

श्लोक ( शार्दूलविक्रीडित. )

॥ खानाचा अपमान फार करुनी बंगालदेशीं तदां ॥
॥ धाडी तो सुलतान माजुम दुजा देऊन त्याच्या पदा ॥
॥ वेगें मोंगल तो चमू जमवुनी टोळ्या करूं लागला ॥
॥ तेव्हां तो नृप धीर वीर कटकाथाटी रणा ठाकला॥ ३४ ॥

श्लोक ( इंद्रवज्रा. )

॥ शत्रूभटा भूप शरप्रदानें ॥
॥ करी द्विजा तो जणुं गोप्रदानें ॥
॥ वांके रिपू त्या नरपुंगवातें ॥
॥ वनीं जसा पादप चंडवातें ॥ ३५ ॥
॥ लुटीयले गांव उदंड त्याणें ॥
॥ उच्छेदिले मोंगल ते कृपाणें ॥
॥ स्वारी नृपाची सुरतेस आली ॥
॥ तेव्हां महा कांचनवृष्टि झाली ॥ ३६ ॥

आर्या.

॥ श्रम त्या बहू न पडतां सुरतनग रमालयास पावे तो ॥
॥ लुटिलें धन प्रमोदें सुरतनगरमा लयास पावेतो ॥ ३७ ॥
॥ इसवी सन सोळाशें पहिला चौसष्ट सालचा मास ॥
॥ तेव्हां सुरतजनाचें यवनक्षोभार्थ तो हरी मास ॥ ३८ ॥

## दिंडया.

॥ भूप गुंते सुरतेंत अशा मानें ॥
॥ साधिली ती तें वेळ माजुमानें ॥
॥ स्थळें केलीं काबीज मोंगलांनीं ॥
॥ बैसवीला तो अमल मुसल्मानी ॥ ३९ ॥
॥ प्रजा सांपडली बहुत त्या लगामीं ॥
॥ नम्र केले द्विज थोरही सलामीं ॥
॥ लूटियेले धनवान लोक सारे ॥
॥ बाटवीलें विप्रांस हाणमारें ॥ ४० ॥
॥ स्पर्श केला तीर्थांस पवित्रांस ॥
॥ फोडियेलें देवळां देवतांस ॥
॥ द्वेष करिती ते बहु ब्राह्मणांचा ॥
॥ सूड घेती सक्रोध वेदपांचा ॥ ४१ ॥
॥ पाठ केला सत्राण शस्त्रधारीं ॥
॥ नृपा आले द्विज शरण अर्विधारि ॥
॥ तयां पाहोनी सुखें भूप डोले ॥
॥ बहू आशिर्वादासि तिहीं केलें ॥ ४२ ॥
॥ महाराजा हे होय तूं शतायु ॥
॥ शत्रुअब्दा तूं होय चंडवायु ॥
॥ गावुलीची तूं होय माउली रे ॥
॥ कृपेची हो विप्रांस साउली रे ॥ ४३ ॥

### श्लोक (वसंततिलका.)

॥ वाजी वसोत सदनीं गजही समाजीं ॥
॥ राजीवचक्षु ललनाच करोत राजी ॥

॥ हाजी करीत रिपु या सुभटा महा जी ॥
॥ आजी महाभयद हो यवनासुरा जी ॥ ४४ ॥
॥ गाजो तुझें यश महीवर लोकपाळा ॥
॥ देवोत विप्र बहुताप तुला कृपाळा ॥
॥ हस्तें पराभव तुझ्या अति अंत्यजांचे ॥
॥ होवोत; लेखपथ ते अपसव्य ज्यांचे ॥ ४५ ॥
॥ होवोत पुत्र जणुं अश्विनिचे कुमार ॥
॥ खावोत शत्रु अवघे समरांत मार ॥
॥ होवो तुझा जय सदाच रणीं नृपा रे ॥
॥ पावोत हे अखिल ब्राह्मण त्वत्कृपा रे ॥ ४६ ॥

श्लोक ( इंद्रवज्रा. )

॥ जो श्रीश त्याच्या पदसारसाचें ॥
॥ चित्तीं जडो चिंतन सार साचें ॥
॥ अगम्य ही द्वैत महान माया ॥
॥ लागो नृपा तूज सदा नमाया ॥ ४७ ॥

दिंड्या.

॥ अशा आशिर्वादाशि तिहीं केलें ॥
॥ वर्तमाना अवघ्याहि कथीयेलें ॥
॥ शिवाजीनें द्विज फार गौरवीले ॥
॥ धनावसनान्वित अग्रहार दीले ॥ ४८ ॥
॥ पाद वंदुन तो मधुर वदे वाणी ॥
॥ तुह्मां नाहीं गांजिलें अविंधांनीं ॥
॥ त्रास माझ्या पितरांस होय मानीं ॥
॥ असें बोलुन घे खड्ग चापपाणी ॥ ४९ ॥

**साक्या.**

॥ धडा धडा त्या तोफा सोडी फिरवी चक्र तरवार ॥
॥ थरार कांपे माजुम सर्वहि काढी पळ दळभार ॥५०॥

**दिंड्या.**

॥ जळीं काष्ठीं सर्वत्र अविंधांला ॥
॥ दिसे धाके ही वदति तोचि आला ॥
॥ महावीरा पाहोनि धांवताती ॥
॥ धूम जैशी मृग सिंहभयें घेती ॥ ५१ ॥
॥ मुख न दाविति ते दडुन बैसताती ॥
॥ जणूं सूर्यातें दिवाभीत भीती ॥
॥ यवन दिसला कीं धरी भूप झेंपें ॥
॥ दीन वदनीं ते वदाति तयीं फेंफें ॥५२ ॥

**साक्या.**

॥ फकीर मै तो मै तो काजी हम नहि नहि दुसमान ॥
॥ जान हमारी राखो राजा हमकू तुम जजमान ॥ ५३ ॥
॥ बहु जस तुमको खुदा दिलावे सब दुनियाका राज ॥
॥ जय जय होवे तेरा राजा हमकू तुम शिरताज ॥५४॥

**श्लोक** ( शार्दूलविक्रीडित. )

॥ सेना तुंबळ घेउनी मग सवें वेगें निघाला पहा ॥
॥ गेला बारशिलोर तो सुनगरीं राजा शिवाजी महा ॥
॥ होतें कांचनयुक्त पूर यवनी ठाणें प्रमोदें लुटी ॥
॥ संग्रामीं विजयी सदाच गमला पाडी रिपू संकटीं॥५५॥

**दिंडी.**

॥ यवनधर्मा बुडवून दंडधारी ॥

॥ वाट मक्केची धीटपणें मारी ॥
॥ अर्विधातें चढवोनि सदा क्षोभा ॥
॥ स्वदेशाला आणितो भूप शोभा ॥ ५६ ॥

श्लोक ( इंद्रवज्रा. )

॥ ठाणीं लुटोनी धनकोश नेले ॥
॥ अर्विध यात्रिकरू पीडियेले ॥
॥ हें मोंगला संकट थोर पाहा ॥
॥ लिही असें माजुम बादशाहा ॥ ५७ ॥
॥ ऐके असें यातुप वर्तमान ॥
॥ सावेश गर्जे जलदासमान ॥
॥ कोपा चढे तो जणुं चंडवायु ॥
॥ करा शिवाजी वदला क्षणायु ॥ ५८ ॥
॥ बोले कसा माजुम तेजहीन ॥
॥ हिंदू जया होय अजेय दीन ॥
॥ देऊन सेना मग भूप गादी ॥
॥ त्याच्या पदीं तो जयसिंग धाडी ॥ ५९ ॥
॥ शौर्यप्रतापें बहु राजमान ॥
॥ अनीति ते त्यास विषासमान ॥
॥ त्याच्या सवें पुष्कळ आदरानें ॥
॥ दिलीरखानासि दिलें नृपानें ॥ ६० ॥

# शिवराज लीला.

## भाग आठवा.

---

श्लोक ( इंद्रवज्रा. )

॥ असे लढाया भट पाठवीले ॥
॥ एकाहुनी एक हुशार ठेले ॥
॥ जेव्हां नृपाच्या मुलखांत येती ॥
॥ सारे मराठे भय पावताती ॥ १ ॥
॥ पुरंदरा सिंहगडास घेरा ॥
॥ देती पहा राजगडास डेरा ॥
॥ ते पाहुनी थोर पडे दरारा ॥
॥ कांपे शिवाजी नृपही थरारां ॥ २ ॥
॥ पुरंदरीं युद्ध महान झालें ॥
॥ परंतु किल्लेकरि ते न भ्याले ॥
॥ सोसून तो दुर्धर शत्रुदंगा ॥
॥ गडास संरक्षिति त्या प्रसंगा ॥ ३ ॥
॥ फोडी गडाची रिपु मत्त माची ॥
॥ तरी पहा शक्ति नरोत्तमाची ॥
॥ सोडून तोफा रिपु हाटवीला ॥
॥ छाटून त्या सैन्यमहाटवीला ॥ ४ ॥
॥ धूमें नभोमंडळ व्यापियेलें ॥

॥ कोलाहलें अंबर भग्न झालें ॥
॥ शत्रू लढायास पुन:पुन्हा तो ॥
॥ जातो अशुद्धे परि देख न्हातो ॥ ५ ॥
॥ जोडांत तो शत्रु; नसेचि जोडा ॥
॥ जोडा तया देउन तेज जोडा ॥
॥ मोडा दिसे तो, तरि शब्द मोडा ॥
॥ खोडा गमे त्यांस; कलंक खोडा ॥ ६ ॥
॥ शेळ्या बहू कोंडिति वाघ चार ॥
॥ तेथें गणाला महती विचार ॥
॥ पुरंदरीं युद्ध तसेंचि माम ॥
॥ मानूं नको त्यां यवनासमान ॥ ७ ॥
॥ मानी' जरी' मान स'मान' मानीं ॥
॥ मानापमाना' वर' मा'न'मानी ॥
॥ मानाव'या मा'न' न 'मा न' माया ॥
॥ माया न'मी' मानव'त्या'नमा'यों ॥ ८ ॥

**श्लोक** ( भुजंगप्रयात.)

॥ असें चाललें युद्ध तें फार दीन ॥
॥ तदा जाहले मावळे वीर दीन ॥
॥ शिवाजीस ते धाडिती लीन वाणी ॥
॥ गडा सोडितों बोलले दीनवाणी ॥ ९॥

---

१. या श्लोकाचीं वर रेषा मारल्या आहेत तशीं पदें पाडलीं असतां दुसराही चमत्कारिक अर्थ होतो. त्याप्रमाणें आणखी वेगळ्या रीतांनेंही पदें तोडून अर्थ अनेक करितां येतात. यांत अर्थ वेदांती घ्यावा लागतो.

॥ दैत्येंद्र ते शुंभ निशुंभ पाही ॥
॥ वाटे तदा धाक सुराधिपाही ॥
॥ त्यांच्या तसा भूप रणप्रतापा ॥
॥ भ्याला सही[1] दुःसह शत्रुतापा ॥ १० ॥
॥ विरे मानसीं भूप योद्धा तसाही ॥
॥ तयांचा पहा जोर देशांत साही ॥
॥ स्वजाती ह्मणे हा करूं काय शिंग! ॥
॥ मला फोडणें काय वज्रास भिंग? ॥ ११ ॥
॥ मुसल्मान होता जरी हा कुजाती ॥
॥ तरी दावितों यास मी तेज हातीं ॥
॥ स्वजातीवरी काय सोडून बाण? ॥
॥ स्वलोकाद्विषा ह्या अविंधासमान ॥ १२ ॥

श्लोक (इंद्रवज्रा.)

॥ द्विजद्विषाकारण जन्मला जो ॥
॥ त्याची स्वलोकां तरवार लाजो ॥
॥ स्वलोक तो वल्लभ; लोभ वानीं ॥
॥ तूं माउली हिंदुजना भवानी[2] ॥ १३ ॥
॥ मानीं महास्थान रणांगणाला ॥
॥ अविंध नैवेद्य सुभोजनाला ॥
॥ गादी तुला ते रिपुमान नामी ॥
॥ पुरीं तुझ्या अक्षय आनना मी ॥ १४ ॥

साक्या.

॥ तह मग करण्या जाय भूप तो रिपुला जोडुन पाणी ॥

---

१ सहन करितो. २ तरवारीचें नांव.

॥ म्लान मुखें अपराधा बोले वीरा मना न आणीं ॥१५॥

श्लोक ( पृथ्वी)

॥ प्रसन्न अरि जाहला तंव गडां वदे आवघ्या ॥
॥ करा परत आमुच्या मग तुह्मी दुजें नांव घ्या ॥
॥ कबूल ह्मणि जाहला नृप सुधीर त्या उक्तिला ॥
॥ अनर्थ बहु तो तसा कठिण पावला शांतिला॥१६॥

साक्या.

॥ नृपतीचा त्या मुलुख तहामधिं उत्तम बहुतचि जाय ॥
॥ परंतु तैसा प्रसंग दुर्धर पाहुन बोले हाय ॥ १७ ॥
॥ सिंह पुरंदर इत्यादिक गड दुर्गम मोंगल घेती ॥
॥ बाकी लघुगड बारा वेतन चाकर ह्मणोनि देती ॥१८॥

श्लोक (कामदा)

॥ मुलुख देउनी मोंगला स्वयें ॥
॥ दास जाहला जाण निश्चयें ॥
॥ काळ नष्ट तो त्या नृपा महा ॥
॥ दीन जाहला वांकला पहा ॥ १९ ॥

श्लोक ( द्रुतविलंबित. )

॥ परम दुर्मद मोंगल चाकरीं ॥
॥ बहुत गौरव त्या रिपुचा करी ॥
॥ रवि घनांकितसा जरि भासतो ॥
॥ परि नभीं कधि थंड न भास तो ॥ २० ॥

श्लोक ( इंद्रवज्रा. )

॥ चौथाइसत्ता यवनप्रदेशीं ॥
॥ दे बादशाहा पदवी विशेषी ॥

॥ मृगाधिराजा तृण खावयाला ॥
॥ तैसें दिसे हें नृपराजयाला ॥ २१ ॥

**आर्या.**

॥ अपुली सेना घेउन गेला मग त्या रिपूसहायाला ॥
॥ बादशहा संतोषें देई अधिकारही महा याला ॥ २२ ॥
॥ दास्यत्व एकनिष्ठें करूनी यवनास फार तोषाविलें ॥
॥ प्रसन्न होउन भूपें वस्त्रांसह मानपत्र पाठविलें ॥२३॥
॥ स्वबळें सुवीर मग तो झाला विख्यात मोंगलांमाजी ॥
॥ तेंव्हां बादशहानें पत्रीं बोलाविलें सलामा जी ॥ २४ ॥
॥ जयशिंगास पुसे तो घेऊं कीं भेट सांग राजाची ॥
॥ तोही होइल बोले मान तुझा शौर्यसागरा जा ची ॥२५॥

**दिंड्या.**

॥ अविंधाच्या भेटीस अविंधारी ॥
॥ एक नेमुन राज्यांत कारभारी ॥
॥ सवें घेउन मग अल्प लोक जाई ॥
॥ प्रभातींच्या शशितुल्य रूप घेई ॥ २६ ॥
॥ शहर दिल्ली प्रख्यात अविंधाचें ॥
॥ स्थान जगतीं अनुपम्य होय साचें ॥
॥ भव्य ज्याचीं गोपुरें प्रवेशाचीं ॥
॥ ज्यांस शोभा बहु जाडित सोनियाची॥२७॥
॥ तयांवरती तो वाजतसे डंका ॥
॥ भीतिदायक सर्वांहि राजरंकां ॥
॥ वरी झेंडा झगझगे हेमरंगी ॥
॥ शत्रु पाहोनी चकित अंतरंगीं ॥ २८ ॥

॥ आंत रस्ते विस्तीर्ण लंबमान ॥
॥ दुतर्फाही मंदिरें दिव्य मान ॥
॥ दिसे शोभा ते रम्य दुकानांची ॥
॥ ज्यांत विक्री बहु रजतकांचनाची ॥ २९ ॥
॥ बादशाहाचा मधें राजवाडा ॥
॥ शिबंदीचा चौगर्द ज्यास वेढा ॥
॥ सज्ज शस्त्रें तोडेहि बंदुकांस ॥
॥ सर्व काळा पोशाख शिपायांस ॥ ३० ॥
॥ भव्य वाडा तो आंत विलासाचा ॥
॥ रंग अनुपम भिंतीस रम्य साचा ॥
॥ पिंजरे ते खगयुक्त टांगलेले ॥
॥ मोर नाचे स्वच्छंद हंस डोले ॥ ३१ ॥
॥ उडे कारंजें उंच अंबुधारा ॥
॥ स्वच्छ शीतल चालतो मंद वारा ॥
॥ धातुकुंड्या बहु दिव्यलता त्यांत ॥
॥ पुष्पयुक्ता स्तंभांस वेढितात ॥ ३२ ॥
॥ पुढें शोभे दरबार यवनशाली ॥
॥ घेर जरतारी लक्क सभोंताली ॥
॥ रौप्यमंचक सरदार बसायाचे ॥
॥ लोड गाद्या किनखाब भरजरीचे ॥ ३३ ॥
॥ फेर त्यांचे चौफेर ठेल ठेले ॥
॥ अग्रभागीं नृपतक्त दिव्य ठेलें ॥
॥ रम्य फारच तें तक्त कांचनाचें ॥
॥ हिरे रत्नें बहुमोल कोंदनाचें ॥ ३४ ॥

॥ मयूराकृति तें फार चकूचकाके ॥
॥ ज्यास पाहुन गपगपां नेत्र झांके ॥
॥ दैवमेघा पाहून अविंधाचे ॥
॥ गमे मोदें थैथय्य मोर नाचे ॥ ३५ ॥

**श्लोक** (शार्दूलविक्रीडित.)

॥ ऐसें स्थान महा प्रकाम नगरी लंका जगीं अन्यका ॥
॥ जेथें कांतविना सुखा उदधिची धांवे गमे कन्यका ॥
॥ तेथें तो अधिकार थोर विशिखा औरंगजेबा वका ॥
॥काका कांचन काय काय? शशका का काननीं कालिका[१]॥३६ ॥

**श्लोक** ( इंद्रवज्रा. )

॥ माजी नृपाचा सुत तो समाजीं ॥
॥ काजी सवें तत्पर राजकाजीं ॥
॥ हां,जी, अजी, ते करितात हाजी ॥
॥ राजी तशा यातुप[२]शब्दराजी ॥ ३७ ॥

**श्लोक** (वसंततिलका.)

॥ याजी वदे यवन बादशहा तयां जी ॥
॥ गाजी ह्मणे मम यशास बहूत गा जी ॥
॥ पाजी महा असुख दे मज यातुपा जी ॥
॥ वाजीवरून उतरे तंव तो शिवाजी ॥ ३८ ॥
॥ आला सभेंत मुजरा करि तो नृपाला ॥
॥ हाला पिऊन मद तैं चढला शहाला[३] ॥

---

१. काका (कावळ्यास). कांचन काय काय (उपयोगीं); का (किंवा) शशका काननीं कालिका (देवी) काय? (काय कामाची) त्या प्रमाणें. २ बादशहा. ३ बादशहाला.

॥ काळा मनांत वदला फुगवून गाला ॥
॥ काळासमान बघतो द्विजपालकाला ॥ ३९ ॥
॥ याला सुदूर बसवा यवनद्विषाला ॥
॥ हा लावितो कटितटीं विंचव्या नखाला ॥
॥ भालाहि गुप्त कवचास असेल त्याला ॥
॥ माला धराधिपति घालिल गुप्त घाला ॥ ४० ॥
॥ दानें करून मिरवे नृप या पदानें ॥
॥ यानें अविंध वधिले बहु तोतयानें ॥
॥ ठाणें लुटून मम हा धन चोरटा नें ॥
॥ हा नेणता मम बलास असे तहानें ॥ ४१ ॥
॥ हालाहलापरिस दुःसह शब्दजाला ॥
॥ झाला सुवृष्टि करिता दुखवी तयाला ॥
॥ कालावला बघुन त्या अतिनष्ट काला ॥
॥ भ्याला मनीं द्विजसखा वदतो नृपाला ॥४२॥
॥ कां लालना करून हें वदसी दयाला ॥
॥ या लाज थोर अपमानचि सेवकाला
॥ कां लावुनी नरपते वदसी तशाला ॥
॥ ज्याला त्वदीयसुखशब्दचि भूषणाला ॥ ४३ ॥
॥ म्यां सेविलें नृपवरा तुज देख खासें ॥
॥ कासे तुझ्या धरून दुर्मद सोडिलासे ॥
॥ हा सेवक प्रिय तुझा जन यास हासे ॥
॥ या गोनिकें निवटिले त्वदरि प्रयासें ॥ ४४ ॥
॥ मानी न तो स्वजनशत्रु महान मानी ॥
॥ पाणी स्वतेजयश दावुन चापपाणी ॥

॥ कानीं वदे हळुच तो यवनां ठिकाणीं ॥
॥ हा नीच नित्य करितो यवनांस हानी ॥४५॥
॥ आणीं अशा कपटदुर्मतिराजधानी ॥
॥ खाणीन यास निरखा बहु पापखाणी ॥
॥ कानीं धरोनि मग आणिन या ठिकाणीं ॥
॥ वाणी प्रचंड वदला यवनाभिमानी ॥ ४६ ॥

**साक्या.**

॥ सुन बे मनसबदारा तेरे हितकी बात हमारी ॥
॥ राजा नहि तूं सरदार न तूं मनसबदार हजारी ॥४७॥
॥ अमीर नहि तूं मीर नही बे नहि तूं राजकुमार ॥
॥ बडा नही तूं लढवय्या बे तेरेकू न सुमार ॥ ४८ ॥
॥ बीसों मनसबदार हमारे ह्यां तो बडे पडे बे ॥
॥ मनसबदारोंमें बैठेसें तेरे क्या बिघडे बे ॥ ४९ ॥
॥ पटेल था तूं दगलबाजिसें तूंनें मुलुख कमाया ॥
॥ मीर अजब सरदार उनोंके आगे ढोंग मचाया ॥५०॥
॥ निजामशाही राज डुबाया तब तो बादशहा जी ॥
॥ नोकर हूवा देख यहांका तेरा बाप शहाजी ॥ ५१ ॥
॥ ओबी माना लढे निकम्मा ऐसा गव्हार था बे ॥
॥ इसी अदतसें हुजूरनें तो ह्यांसे हकालू दिया बे ॥५२॥
॥ उस्का बेटा तूं बि निकम्मा हमको तूं दिखता है ॥
॥ मनसबदारोंमें बैठे बे नहि तो जाय खुदा है ॥ ५३ ॥

**श्लोक ( भुजंगप्रयात. )**

॥ असें बोलिला हांसले एकदांचि ॥
॥ नृपें सोडिली आस मोठ्या पदाची ॥.

॥ फिरे मागुता खिन्न झाला मनांत ॥
॥ जणूं केसरी विद्धिला काननांत ॥ ५४ ॥
॥ तयारी करी जावया तो स्वदेशा ॥
॥ हृदीं लागला बाण मोठा नरेशा ॥
॥ नृपें सोडिला मान सन्मान सारा ॥
॥ उदासीपणें त्यागिला तो पसारा ॥ ५५ ॥
॥ स्वतांचे पथीं लाविले संमताचे ॥
॥ हिताचे जयां डाग शत्रुक्षताचे ॥
॥ जिवाचे खरे सोबती आहवाचे ॥
॥ न वाचे वदे मी हृदीं या भवाचे ॥ ५६ ॥
॥ निघाले पुढें भूपही तो निघाला ॥
॥ परी गांठिलें त्यास घालोनि घाला ॥
॥ महायां[१]तु साधोनि कापट्यमाया ॥
॥ स्वतंत्रें[२]च त्या लावि काल क्रमाया ॥ ५७ ॥

दिंड्या.

॥ मोह दावुन टाकून असा फांसा ॥
॥ गांठियेला जाळ्यांत पहा मासा ॥
॥ लोभ लावुन फांशांत लोक घ्यावे ॥
॥ बादशाहा तो पूर्ण या स्वभावें ॥ ५८ ॥
॥ तिघां भावां आपास सूदियेलें ॥
॥ पुढें कारेमाझारिं ठार केलें ॥
॥ नृपा वधण्या तैशीच युक्ति योजी ॥
॥ युक्ति भूपाची त्या न परी मोजी ॥ ५९ ॥

---

१. बादशहा. २. आपल्या तंत्रानें.

॥ श्वान अंतर धांवोनि वळें काढी ॥
॥ त्यास जंबुक डोहांत परी पाडी ॥
॥ गुप्त संजीवन मंत्र शुक्र साधी ॥
॥ त्यास ठकवी कच धरुन वृत्ति साधी ॥ ६० ॥

श्लोक ( इंद्रवज्रा. )

॥ संसारआसक्तहि मानवाचें ॥
॥ ज्ञानें जसें मोचन होय साचें ॥
॥ तसा प्रजानाथ पहा निघे तो ॥
॥ त्या संकटीं लाघव रूप घेतो ॥ ६१ ॥

श्लोक ( शार्दूलविक्रीडित. )

॥ युक्ती भूप घडी मनीं बहु नडी आणोनि तेंव्हां बडी ॥
॥ साधोनी सुघडी करी नव गडी भोगून तो सांकडीं ॥
॥ झांकी तो परडी बसोनि बुरडी पेटींत जाई थडी ॥
॥ येई राजगडीं नगास जवडी पंथीं नटे कापडी ॥६२॥
॥ दिल्लीचा नृप कोपुनी मग वदे गेला शिवाजी कसा? ॥
॥ भृत्या त्वां अपहार खास गमतें केला शिवाजी कसा ॥
॥ लागाया खलपाठिशी जिन तरी बांधीशि वाजी कसा ॥
॥आणीं त्या परतोन दाविन कसा आहेशि वा जी कसा!॥ ६३ ॥

आर्या.

॥ गेला पुन्हा न मिळला ऐकुन तें भूप खिन्नसा पडतो ॥
॥ व्याघ्रमुखांतुन मृग तो गेल्यावर केंवि त्यास सांपडतो॥ ६४ ॥

# शिवराजलीला.

## भाग नववा.

### दिंड्या.

॥ भूप देहीं अपमान या विषाचा ॥
॥ उठे मोठा संताप भडाक्याचा ॥
॥ तप्त झाला सर्वांग होय लाही ॥
॥ अधर चावी सक्रोध दांत खाई ॥ १ ॥
॥ क्रुद्धमन्यु प्रसिताजि चापपाणी ॥
॥ वदे, बोले यवनेश कशी वाणी! ॥
॥ पापखाणी गर्विष्ट फार झाला ॥
॥ महैश्वर्यैं उन्माद तया आला ॥ २ ॥

### श्लोक ( इंद्रवज्रा. )

॥ मानीं न आतां भट मीं तहातें ॥
॥ जिंकीन हे मोंगलही पहातें ॥
॥ थाटीन मी तुंबळ थोर सेना ॥
॥ युक्त्यन्य मत्क्रोधशमा दिसेना ॥ ३ ॥
॥ उत्पन्न मी या जगतांत झालों ॥
॥ मारावया या यवनांस आलों ॥
॥ शिवांश मी हा दृढभाव वाणे ॥
॥ फोडीन भूमंडळ एकत्राणें ॥ ४ ॥
॥ फाडीन मी व्योमवितान याला ॥

॥ पाडीन नक्षत्रसवितृमाला ॥
॥ विपक्ष हे मोंगल काय माला ॥
॥ युद्धास ते भेक भुजंगमाला ॥ ५ ॥
॥ देहांत या शक्ति महासुरा जा ॥
॥ दावीन त्या सर्व अविंधराजा ॥
॥ मदापमानोक्ति वदे कुजाती ॥
॥ मारीन तैं होय मनोपशांती ॥ ६ ॥
॥ तहांत गेले मम दुर्ग भारी ॥
॥ घेऊन ते आणिन शत्रु हारीं ॥
॥ वागे स्वतंत्रें मग भूप त्राका ॥
॥ वीरां वदे सैन्य रणास हाका ॥ ७ ॥
॥ आधीं गमे त्यास ससैन्य जावें ॥
॥ पुरंदरा सिंहगडास घ्यावें ॥
॥ होते महा ते गड कार्यकारी ॥
॥ परंतु ते दुर्गम दुर्ग भारी ॥ ८ ॥

## दिंड्या.

॥ सिंहगड तो किल्ल्यांत सिंह साजे ॥
॥ पुणेप्रांतीं बहु तुंग दुर्ग गाजे ॥
॥ पश्चिमांगीं सह्याद्रिपर्वताची ॥
॥ ओळ आहे अत्यंत लांब साची ॥ ९ ॥
॥ गगनभेदी तो दुर्ग नभीं गेला ॥
॥ कडे तुटलेले याम्यउत्तरेला ॥
॥ अर्ध कोशाचे उंच फार मोठे ॥
॥ नजर जातां त्यांवरी दृष्टि फाटे ॥ १० ॥

॥ सभोंतालीं या तीस हात काळा ॥
॥ दगड आहे चौफेर कापलेला ॥
॥ तयावरती दृढ भिंत चिरेबंदी ॥
॥ आंत यवनांची शूर हो शिबंदी ॥ ११ ॥
॥ त्रिकोणाकृति किल्लयांत असे भूमी ॥
॥ मोगलांचा सरदार तया स्वामी ॥
॥ सभोंतालीं तट उंच कोस सव्वा ॥
॥ तयामध्यें शिरकाव कसा व्हावा! ॥ १२ ॥
॥ तया वरूनी पश्चिमे दिसे शोभा ॥
॥ गगनचुंबी नगपंक्तिची विशोभा ॥
॥ लवण पूर्वे झुळझुळे स्वच्छ नीर ॥
॥ निरा वाहे शोभतें रम्य तीर ॥ १३ ॥
॥ उत्तरेला कर दृष्टि दूर जाया ॥
॥ पेशव्याचें पुर दिव्य विलोकाया ॥
॥ महावनहीं तरुसलिलयुक्त ठेलें ॥
॥ नगीं व्योमा याम्येस गांठियेलें ॥ १४ ॥

**श्लोक** ( पृथ्वीछंद. )

॥ असाचि गड तो जरी तरि सुधीर घेण्यास रे ॥
॥ धरी नृप करीं महा प्रबळ वीर मालूसरे[1] ॥
॥ ह्मणे पुरुषपुंगवा मम विनाशिं दुःखाकरा ॥
॥ सुदुर्गमणि घेऊनी सुयश जोड धीसागरा ॥ १५ ॥

**श्लोक** ( इंद्रवज्रा. )

॥ तो काळ होता बहु थंडकाळ ॥

---

१. तानाजी मालुसरे.

॥ गमे स्त्रियां कांतवियोग काळ ॥
॥ विलासिनी सुंदर चारुगात्री ॥
॥ त्या वांच्छिती थोर विशाल रात्री ॥ १६ ॥
॥ रक्तोत्पलांसदृश पादपाणी ॥
॥ त्यां शत्रु तें दारुण थंड पाणी ॥
॥ भंगी तयां शीत शरप्रभावें ॥
॥ तैं कोमलांगी आति कष्ट पावे ॥ १७ ॥
॥ करद्वयें प्रार्थितसे हुताशा ॥
॥ धांवें शिखी सत्वर शत्रुनाशा ॥
॥ प्रकाम तेजोमय बाण मारीं ॥
॥ संतोष दे शीतजवोत्तमारी ॥ १८ ॥

**श्लोक** ( स्वागता. )

॥ माघकृष्ण सुटला नवमीस ॥
॥ भांडण्या करुन तो नव मीस ॥
॥ घे सहस्रजनयुक्त निशींत ॥
॥ दुर्गभेट बहु सोसुनि शीत ॥ १९ ॥

**श्लोक** ( इंद्रवज्रा. )

॥ तानूसवें सोदर शूर त्याचा ॥
॥ सूर्याख्य होता रणधीर साचा ॥
॥ द्विभाग तो सर्व चमू करून ॥
॥ तानू त्वरें जाइ पुढें निघून- ॥ २० ॥

**श्लोक** ( वसंततिलका. )

॥ तारा सहस्र नयनीं रजनी भयान ॥
॥ प्राची दिशा वदन जीस, धरा सुयान ॥

॥ भालीं जिच्या तिलक मंगल दिव्य फार ॥
॥ नेसे कटीं असित वस्त्र घनांधकार ॥ २१ ॥
॥ कांतार घोर पथहीन जयांत कांटे ॥
॥ शार्दूलयुक्त घनकुंजसमाज दाटे ॥
॥ कल्लोळ भेक करिती वनपल्वलांत ॥
॥ हूंहूरवें रटति जंबुक जंगलांत ॥ २२ ॥
॥ ग्रामांतरीं शुनकरोदन लक्ष्य फाडी ॥
॥ व्याघ्रादि हिंस्त्र पशु गर्जति भीति गाढी ॥
॥ घूत्कार घोर घुबडें करिती कठोर ॥
॥ तें लोटलें नगपदाप्रति सैन्य थोर ॥ २३ ॥
॥ निद्रिस्त सर्व परि ते भट सावधान ॥
॥ युक्त्यंतरा करिति निश्चल ते निदान ॥
॥ दुर्गांत या वदति भेसुर यातुधान ॥
॥ छापें वधा यवन घातुक हे महान ॥ २४ ॥

श्लोक (इंद्रवज्रा.)

॥ विशाल ही गोम महान काळी ॥
॥ तमीं अशा येथ कशास आली ॥
॥ सहस्त्रहस्ता तितक्या पदांची ॥
॥ हळू हळू चालतसे मघांची ॥ २५ ॥
॥ हस्तांत घे चर्मसुदीपमाला ॥
॥ वाती करी कृष्ण भुजंगमाला ॥
॥ शोधी प्रयत्नें सर अंधकारीं ॥
॥ नीलोत्पलातें करिं ते विदारी ॥ २६ ॥
॥ घालावया भूषण कंठमाला ॥

॥ वेचीतसे भृंग न भी तमाला ॥
॥ पायीं चढोनी कमळांत जाई ॥
॥ पाहीं तदा पावशि भृंग बाई ॥ २७ ॥

दिंड्या.

॥ आगगाडीची ट्रेन चमू मानू ॥
॥ अग्रभागीं तें यंत्र तिचें तानू ॥
॥ शत्रु किल्ला पाहतां स्टेशनाला ॥
॥ उभी राहे, घे विजय सज्जनाला ॥ २८ ॥
॥ चमू मुंग्यांची ओळ जणू काळी ॥
॥ चढे तिमिरीं गडरूप दीपमाळीं ॥
॥ गाढनिद्राशीतेंच थंड झाले ॥
॥ यवनघृतकण ते खावयास चाले ॥ २९ ॥

श्लोक (वसंततिलका.)

॥ आले पहाड दगडी वर भिंत काळी ॥
॥ दोरावरोनि चढले वर अल्पकाळीं ॥

---

१ यावरील तीन श्लोकांचा अर्थ अन्योक्तीनें घ्यावयाचा तो असा.

काळीं वस्त्रें परिधान केलेल्या त्या लोकांची जी ओळ हीं कोणी गोम व त्यांनीं हातांत ढाला घेउन त्यांवर ठेवलेल्या ज्या तरवारी तीच तिच्या हातांत वाती घातलेल्या पंत्यांची माळ. तानाजी बरोबर निमे म्हणजे पांचशें लोक होते याकरितां तिला हजार हात व पाय आहेत असें वर्णिलें आहे. आतां तें अरण्य हाच कोणी तलाव व त्यामध्यें सिंहगडकिल्ला हें काळें कमळ मानिलें आहे. त्या कमळामध्यें यवनरूप भृंग होते ते वेचून (मारून) आपले गळ्यांत विजयरूप भूषण घालण्याकरितां ती सैन्यपंक्ति अंधकारास न भितां पाहत होती. तीस कवि म्हणतो बाई गड चढून वर जा म्हणजे तुला शत्रु सांपडतील.

॥ आले चढोनि दळ ही अवघे तयांचें ॥

॥ किल्लेकरीहि उठले रण होय साचें ॥ ३० ॥

**दिंड्या.**

॥ फार होई तें युद्ध नीकराचें ॥

॥ लोक होते जरि बहुतही पराचे ॥

॥ मावळे ते जय पावणार गाजी ॥

॥ परी तानाजी पडे रणामाजी ॥ ३१ ॥

॥ अहा ! तेव्हां दुर्दशा काय झाली ॥

॥ मावळ्यांवर संक्रांत जणूं आली ॥

॥ धीर सोडोनी पळति त्याच वाटे ॥

॥ तदा सूर्याजी सबळ त्यांस भेटे ॥ ३२ ॥

**साक्या**

॥ सोदरदुःखें आक्रंदोनी सूर्याजी कथि त्यांला ॥

॥ तानाजीला येथें ठेवुन कोठें तुह्मी निघालां ॥ ३३ ॥

॥ ज्याच्या संगें आलां त्याला टाकुन जाणें खोटें ॥

॥ अंत्यज त्याच्या प्रेता शिवतिल पातक तुह्मांस मोठें ॥ ३४ ॥

॥ यास्तव नरहो धैर्य धरोनी मराच कीं रिपु मारा ॥

॥ यशःशरीरा वांचवुनी हो त्यागा पिंडपसारा ॥ ३५ ॥

॥ दोरीची ती शिडी तोडिली उडणें कड्यावरोनी ॥

॥ मरण कसेंही लढाच तर मग हिम्मतवग्रू वरोनी ॥ ३६ ॥

**श्लोक** ( मालिनी. )

॥ सुभटसुनयवाणी ऐकुनी मावळ्यांनीं ॥

॥ पुनरपि धरियेला धीर वीरा बुल्यांनीं ॥

॥ हर हर हर शंभो बोलुनी एकदां हो ॥

॥ रिपुवरि पडियेले पाडिलें तद्वदां हो ॥

दिंड्या.

॥ यवन अवघे पाहून त्यां पळाले ॥
॥ हात पायांतिल वीर्यही गळाले ॥
॥ कुदोनी तो तट उंच किती मेले ॥
॥ मावळ्यांनीं बाकीस ठार केलें ॥ ३८ ॥
॥ असें विजयाचें वृत्त शिवाजीला ॥
॥ कळे तेव्हां दुःखेंचि बोलियेला ॥
॥ सिंहगड हा मज दुर्गलाभ झाला ॥
॥ परी माझा तानाजि सिंह गेला ॥ ३९ ॥

श्लोक (स्वागता.)

॥ सिंहराज नव्हता मृगराज ॥
॥ वीरराज न जगीं सुरराज ॥
॥ जाय हो नर गडास्तव साचा ॥
॥ आगळा सुभट तो नवसाचा ॥ ४० ॥
॥ गाजवी स्वकुलवीर्य नरांत ॥
॥ शोभला हरि जसा समरांत ॥
॥ भासला अतुल वीर जवान ॥
॥ अंजनीतनयसा बलवान ॥ ४१ ॥
॥ वीर तो किति सुधीर अहाहा! ॥
॥ वारणां प्रबळ होय दहा हा ॥
॥ ठोकिले रिपु करी न तहा हो ॥
॥ ज्यास हिंदुजयसौख्य महा हो ॥ ४२ ॥
॥ मी करूं अचल काय गडा या ॥

॥ शत्रुशीं पुनरपी झगडाया ॥
॥ खोंविला चपल योध बळी तो ॥
॥ देउनी रिपुरणास बळी तो ॥ ४३ ॥

श्लोक ( इंद्रवज्रा. )

॥ पुरंदरा घेइ झणी पुढें तो ॥
॥ छापें शिवाजी समरीं लढे तो ॥
॥ माहूलिही घेइ मयूरपंत ॥
॥ कल्याणिचा प्रांत अती पसंत ॥ ४४ ॥

श्लोक ( स्वागता )

॥ शर्तिनेंच मग लोहगडाला ॥
॥ घेऊनी नृप सुधीर उडाला ॥
॥ जंजिऱ्यावर पुढें सर केली ॥
॥ लूटिली सुरत ते लुटिलेली ॥ ४५ ॥

दिंडी.

॥ घेइ करनाळा दुर्ग भूप धैर्यें ॥
॥ जेर केलें मोंगला महा शौर्यें ॥
॥ पन्नगाचे समुदाय खगेंद्राला ॥
॥ तेंवि वाटति त्या यवन नरेंद्राला ॥ ४६ ॥

साक्या.

॥ बादशहाचा सुत जो रक्षक होता तैं मुलखांत ॥
॥ माजुम तो जणुं माजुम खाई झाला गुंग जनांत ॥४७॥
॥ मराठकावा त्यास कळेना भ्याला फार मनांत ॥
॥ शरणागत तो झाला लवला जोडी नृपास हात ॥४८॥

**श्लोक** ( इंद्रवज्रा. )

॥ घायाळ सारा बलभार केला ॥
॥ चालूं न दे हा मम. शारदेला ॥
॥ हा मोगला भूप अजेय पाहा ॥
॥ लिही असें माजुम बादशाहा ॥ ४९ ॥

**श्लोक** ( मालिनी. )

॥ गजनगरपदींचा थोरला राक्षसेंद्र ॥
॥ अहितरहित गाजे जेंवि रानीं मृगेंद्र ॥
॥ परिसुनि वच ऐसें शोकडोहीं बुडाला ॥
॥ बलहत खग झाला अंतरिक्षीं उडाला ॥ ५० ॥

**श्लोक** ( वसंततिलका.)

॥ राही उगाच मग बादशहा तसाही ॥
॥ पाही अचाट बल तें तंव तेज साही ॥
॥ कांहीं वदे सफल होत इलाज नाहीं ॥
॥ हा ईशअंश वदती गमतो मलाही ॥ ५१ ॥
॥ या शील थोर यवनास वधावयाशी ॥
॥ नाशील हा सबल कोपुन मज्जनाशी ॥
॥ राशीं बसून कलि बोलविला गृहाशी ॥
॥ याशीं सुसख्य करणें कृति हेचि खाशी ॥५२॥
॥ भ्याला महान यवनाधिप त्या नृपाला ॥
॥ भ्याला गमे असुरवृत्र सुराधिपाला ॥
॥ भ्याला जणूं अहि महा खगराजयाला ॥
॥ झाला सुलीन बहु दीन करी तहाला ॥ ५३ ॥

## दिंडया.

॥ शांत करण्या भूपास युक्ति काढी ॥
॥ तया मानें यवनेश पत्र धाडी ॥
॥ वदे आह्मावर लोभ सदा राहो ॥
॥ करीं माफी अपराध महाबाहो ॥ ९४ ॥
॥ देइ राजा हें नांव त्यास मानें ॥
॥ भूपतनया अधिकार गौरवानें ॥
॥ मुलुख दिधला त्या वऱ्हाडांत कांहीं ॥
॥ पुणें चाकण परगणा सुप्याचाही ॥ ९५ ॥
॥ करी ऐशा यवनेश गौरवाला ॥
॥ परी आला अपमानताप त्याला ॥
॥ निवेना ते नृपदेहिंची कहाली ॥
॥ परी झाला लव शांत त्या सुकालीं ॥९६॥

### श्लोक (इंद्रवज्रा.)

॥ बलाढ्य ते अद्भुत शक्ति ज्यांला ॥
॥ जिंकी अशा भूपति मोंगलांला ॥
॥ प्रतापशौर्यान्वितसद्यशाला ॥
॥ भूमंडळीं साम्य नसे कशाला ॥ ९७ ॥
॥ पिता विराजे जगतीं प्रजांचा ॥
॥ दाता स्वधर्मीं रत सुद्विजांचा ॥
॥ राकेश शोभे जणु पूर्णिमेचा ॥
॥ कीं कांत तो शांत सुधा रमेचा ॥ ९८ ॥
॥ दे औषधीनाथ सुचंद्रिका ही ॥
॥ भूपाळ हा न्यून न त्यांत कांहीं ॥

॥ तापा हरी हाच शशिप्रताप ॥
॥ राजा हरी थोर दरिद्रताप ॥ ५९ ॥
॥ भूपा करी साम्य न चंद्रमा तें ॥
॥ जो लाजवी भूप सुरद्रुमातें ॥
॥ सुरद्रुमा योग्य अयोग्य नाहीं ॥
॥ ज्ञानें करी भूप सुयोजना ही ॥ ६० ॥
॥ ऐश्वर्यधीश्री युवराजयाची ॥
॥ न वर्णवे कीर्ति नरा जयाची ॥
॥ शिवांश हा शंकरतुल्य माना ॥
॥ जो हालवी स्थावरजंगमांना ॥ ६१ ॥

श्लोक ( शार्दूलविक्रीडित. )

॥ धैर्याचा बहु गर्व होय अचलां मेर्वादिकां भूतलीं ॥
॥ संग्रामीं परि भूपधैर्य बघतां व्रीडा तयां जाहली ॥
॥ नाहीं गोचर तो सुमेरु गमतें कोठें लपोनी बसे ॥
॥ सर्वांगीं धवळी हिमालयतनू आतां शिरीं कां दिसे? ॥६२॥
॥ झाले मोंगलतापवप्र जगतीं दुर्भेद्य देवानरा ॥
॥ भंगी विक्रमवज्र त्या नृपतिचें झाला तयांचा चुरा ॥
॥ पाही मेरु नृपप्रतापपवि हा भ्याला पळे अंबरीं ॥
॥ तेंव्हां टोप हिमाद्रि बर्फमय हा भीत्यर्थ घाली शिरीं ॥६३॥

# शिवराजलीला.

## भाग दहावा.

दिंड्या.

॥ अशा रीतीनें जिंकिलें अविंधा ॥
॥ तोषवीलें निजदेशविप्रवृंदा ॥
॥ उष्ट्रवाजीगजसंघ संग्रहातें ॥
॥ देति महिषी वृष धेनु भा गृहातें ॥ १ ॥
॥ कसा होता दळभार लढायाचा ॥
॥ अष्ट कैसा समुदाय सुमंतांचा ॥
॥ कशी होती तजवीज कारभारीं ॥
॥ कसें हांकी तें राज्य अविंधारि ॥ २ ॥

श्लोक (पृथ्वीछंद.)

॥ चमूंत बहु धीट ते गडकरी तसे मावळे ॥
॥ प्रतापरवि शत्रुचा बघुन त्या क्षणीं मावळे ॥
॥ बहू चढ रणांत ते करित एकमेकांवरी ॥
॥ रिपूस दचका बसे बघुन ती चमू कावरी ॥ ३ ॥

श्लोक (वसंततिलका.)

॥ मारावया प्रबळशा दशकंधरातें ॥
॥ झाले सहाय कपिही मणिकंधरातें ॥
॥ तैसे नृपा वनग हे बहु कार्यकारी ॥
॥ मारावयास यवनां द्विजदुःखकारी ॥ ४ ॥

॥ शोभे उणें बहुत लोह उणेंहि मोलें ॥
॥ डोले तरी सुजन त्या उपयुक्त बोले ॥
॥ विद्या तशा वनचरां नृप देइ मान ॥
॥ मानी तयां स्वजन; भूषण ज्यां इमान ॥ ५ ॥

श्लोक ( इंद्रवज्रा. )

॥ लांचावल्या दंडकरी प्रकोपें ॥
॥ युद्धीं लढे जो स्वबळें प्रतापें ॥
॥ त्या गौरवी देइ बहू इनामें ॥
॥ ठेवी तयां स्तुत्य विशेषनामें ॥ ६ ॥

श्लोक ( द्रुतविलंबित. )

॥ समर दुस्तर हा भव तारितें ॥
॥ प्रबळ या वनिताममतारि ते ॥
॥ रणनिषेध करी ललना महा ॥
॥ अनयं शिक्ष्य असे दृढ नेम हा ॥ ७ ॥

श्लोक ( इंद्रवज्रा. )

॥ शौर्यें लढे धीर रणीं शिपाई ॥
॥ दे बक्षिसें त्या करुनी बढाई ॥
॥ घायाळ वीरा बहुमान देशीं ॥
॥ देऊन ठेवी न कदा विदेशीं ॥ ८ ॥
॥ वित्तें गुणा दे जनदेव भारी ॥
॥ न जात पाहे नृप कारभारीं ॥
॥ शौर्यप्रभावावर भूप राजी ॥
॥ नेणे प्रभू वृत्ति कदा परा जी ॥ ९ ॥

## आर्या.

॥ स्थानीं सुता पित्याच्या स्थापी भूनाथ मात्र गुणराशी ॥
॥प्रिय त्या सद्गुण बोले मान गुणा दिव्य तो न शरिराशीं॥ १०॥
॥ अष्टप्रधान नृपती नेमी तो राज्यकारभारातें ॥
॥ ज्याला जैसा उचले ठेवी तच्छिरिं तशाच भारातें ॥ ११॥

चामर.

॥ पेशवा मयूर[1] तो अन्ना[2] अमात्य शोभतो ॥
॥ दत्तपुत्र[3] हा सचीव वाकनीस दत्त[4] तो ॥
॥ सोम[5] हा सुमंत सैन्यनायक प्रताप[6] हा ॥
॥ शास्त्रनेत्र रावपुत्र[7] शंभु[8] अष्टमीं पहा ॥ १२ ॥

श्लोक (वसंततिलका.)

॥ देदीप्य सूर्य नृप भूवरि हा उदेला ॥
॥ अष्टप्रधानसुदिशांत उजेड ठेला ॥
॥ वेगे द्विजद्विषतमां दृढ शत्रु आला ॥
॥ तेव्हां स्वधर्मकमलास विकास झाला ॥ १३ ॥
॥ पृथ्वीसुरालयसुधर्मसुरद्रुमाला[1] ॥
॥ ने यातु हा यवन; दुःख सुरद्विजाला ॥
॥ तेव्हां ससैन्य नृपतींद्र निघे लढाया ॥
॥ अष्टप्रधानभटदिग्पति त्या सहाया ॥ १४ ॥

---

१. मोरोपंत पिंगळे. २. आबाजी सोनदेव. ३ अनाजी दत्तो. ४. दत्ताजीपंत. ५. सोमनाथपंत. ६. प्रतापराव गुजर. ७. निराजी रावजी ८. शंभुपाध्ये.

१. पृथ्वीरूप स्वर्ग यांतील धर्मरूप कल्पवृक्षास यवन राक्षसानें नेलें म्हणून देवरूपीब्राह्मणास दुःख झालें. तेव्हां शिवाजीरूप इंद्र लढायास निघाला असतां अष्टदिक्पाळरूपी हे प्रधान त्याचे साह्यास आले.

श्लोक (मालिनी.)

॥ यवनअसुर लोटी धर्मरूपी धरा ते ॥
॥ अमित असुख झालें भूसुराभूधरातें[1] ॥
॥ क्षिति सबल रहावी दुष्ट मातंगजांना ॥
॥ ह्मणुनि नृपति ठेवी अष्ट या दिग्गजांना॥१५॥

श्लोक (इंद्रवज्रा.)

॥ मंत्री न ह्या अष्ट महा विभूती ॥
॥ भूतीं विभूति प्रसवे विभू ती ॥
॥ दावावया ओजस दानवांस ॥
॥ राखावया थार सदा नवांस[2] ॥ १६ ॥
॥ मानीच हें सत्य न वानवास ॥
॥ जनीं करी तो भगवान वास ॥
॥ केला स्वतेजोद्भव शंकरांनीं ॥
॥ तें घेतल्या ह्या तनु किंकरांनीं ॥ १७ ॥

दिंडी.

॥ बहिर्जी तो जासूद फार नामी ॥
॥ नृपाचा त्या बहु सक्त सदा कामीं ॥
॥ हात ज्याचा अश्रांतसा सलामीं ॥
॥ तिखट कानीं तो चपल पवनगामी ॥ १८ ॥

श्लोक (स्वागता.)

॥ देवदूत करितो जगवासा ॥
॥ नारदासम फिरे भगवासा ॥
॥ नीलकंठ गण हा शिव सेवी ॥

---

१. ब्राह्मणरूपी शेषास. २ नवरसांस.

॥ शब्द हे न कवि लाघवसे वी ॥ १९ ॥

**श्लोक**(वसंततिलका.)

॥ गेलीं रणारहित दोन सुखांत वर्षें ॥
॥ आतां परी परिस वीररसास हर्षें ॥
॥ उत्कर्ष होय बहु जो नृपविक्रमाचा ॥
॥ आला विषाद अति बादशहा तयाचा ॥२०॥

**दिंड्या.**

॥ बादशाहा तो अल्पबुद्धि जाण ॥
॥ घडी करितो तो एक घडी आन ॥
॥ थिल्लिराचा भरपूर कीं उतार ॥
॥ क्षणीं होई तैसाच त्या विचार ॥ २१ ॥

॥ वदे वाटे हा भूप मराठा हो ॥
॥ मुलुख घेई यवनास नसे ठावो ॥
॥ यास जिंकावें समरांत तरी आधीं ॥
॥ त्यास त्याचा अविचार फार बाधी ॥ २२ ॥

॥ कोप दिल्लीचा भूपत्त्दर्दी होता ॥
॥ प्रकट होण्या तो समय येइ आतां ॥
॥ शिवाजीचा अपमान कार्यकारी ॥
॥ देश भाग्योदय करी सुखद भारी ॥२३॥

॥ जरी त्याचा दिल्लींत मान होता ॥
॥ तरि न येता यवनास असा गोता ॥
॥ क्रोध आला भूपास बरें झालें ॥
॥ जूंच हिंदूंच्या खांदिचें निघालें ॥ २४ ॥

## साक्या.

॥ मोहबद् नामें खान असो तो धाडी नंतर देखीं ॥
॥ सेना मोठी त्यासह चाळिस सहस्त्र निवडक लेखीं ॥२५॥
॥ औंडा पाटा सुदुर्ग त्यानें प्रथमचि बळकावीले ॥
॥ लोक मराठे सुवीर त्यानें नव्हते अवलोकीले ॥ २६ ॥
॥ वदे शिवाजी मोहबद्खानें केला सर बहुसाळ ॥
॥ प्रतापरावा दळ घेउन तूं जाईं ठेंचीं व्याळ ॥ २७ ॥
॥ प्रतापरावें बल नेलें जों खानावरि तों तोही ॥
॥ सज्य होउनी ससैन्य आला भेटति फौजा दोही ॥२८॥

## श्लोक (इंद्रवज्रा.)

॥ प्रतापरावें सुविचार केला ॥
॥ पाठिवरी मोहुन शत्रु नेला ॥
॥ क्षणी फिरे सावध चोपुं लागे ॥
॥ भ्याला रिपू कांपत जाय मागें ॥ २९ ॥
॥ शौर्यें लढे तोहि परी न कांहीं ॥
॥ चाले तयाची बलधी कदाही ॥
॥ बिघाड झाल्यावर काय होतें? ॥
॥ घोळे मनीं मृत्यु न हो दुजें तें ॥ ३० ॥
॥ अविंध ते वीर बहु प्रतापी ॥
॥ येती रणा दारुण विप्रतापी ॥
॥ खद्योत तेजें तपनास काय? ॥
॥ झांकी जरी त्यास सुवर्णकाय ॥ ३१ ॥
॥ प्रतापयोद्धा जगतीं प्रतापें ॥
॥ तापे रणीं शूर अविंधतापें ॥

॥ देई बळी मृत्युस यातुधान ॥

॥ असंख्य तो एक नृपा निधान ! ॥ ३२ ॥

श्लोक ( भुजंगप्रयात. )

॥ न वीर ते[१] रक्षक गोखरांचे ॥

॥ न धीर ते तस्कर भूसुरांचे ॥

॥ न तीर ते सोडिति काकपक्ष ॥

॥ न मीर ते हो अनयास दक्ष ॥ ३३ ॥

॥ जरी माजले लठ्ठ ते पुष्टदेही ॥

॥ बहू गोजिरे यौवनीं साजरे ही ॥

॥ तयांनीं गृहीं योषिता भाळवाव्या ॥

॥ स्वदेहा रणीं पाहिजे आगलाव्या ॥ ३४ ॥

॥ निजाया मृदू अन्न साजूक खाई ॥

॥ स्त्रिया बोलती ज्यास नाजूक बाई! ॥

॥ अशानें रणातें रडायास जावें ॥

॥ स्वजातीजनां काय सौख्यास द्यावें? ॥ ३५ ॥

॥ कन्हे जो गृहींही सुखीं लोळतांना ॥

॥ बहू कष्टतो जो मुखें बोलतांना ॥

॥ सदा औषधें घोटितो पथ्य पाळी ॥

॥ तयाच्या कसें युद्ध आलें कपाळीं! ॥ ३६ ॥

॥ जरा वात वाहे जया शीत होई ॥

॥ जरा ऊन लागे गमे प्राण जाई ॥

॥ सवें वायको सर्वदा ज्यास व्हावी ॥

॥ तयानें कशी ते जयश्री वरावी ! ॥ ३७ ॥

---

१ मॉंगल.

॥ जरी पाहतो तोफ बंदूक डोळां ॥
॥ उडे ऊर तो प्राणही होय गोळा ॥
॥ सुटे बार तो बोट कानांत घाली ॥
॥ मिटी गच्च डोळे करी मान खालीं ॥ ३८ ॥
॥ शतीं एकही शूर तो ज्यांत नाहीं ॥
॥ महा आळशी आवडे ज्यां बढाई ॥
॥ असे वीर ते साजरे मोंगलाई ॥
॥ मराठी बिडाळांस लोणीच पाहीं ॥ ३९ ॥

दिंड्या.

॥ असो विजयी नृपवीर सदा ठेले ॥
॥ मोंगलांनीं त्यां हात जोडियेले ॥
॥ लीन झाले उन्माद सोडियेला ॥
॥ शिवाजीचा सत्कार फार केला ॥ ४० ॥
॥ एक थकला एकास येइ जोर ॥
॥ एक गेला तो एक ये समोर ॥
॥ परी झाली ऐशीच त्या नृपाला ॥
॥ विजापुरच्या यवनास जोर आला ॥ ४१ ॥
॥ मरण पावे तेथील बादशाहा ॥
॥ बहु ज्ञानी तो अलिअदिलशाहा ॥
॥ शहाजीच्या द्वारें सुसाम झाला ॥
॥ पुढें त्यांनीं तो बंध मोडियेला ॥ ४२ ॥
॥ संधि पाहुन तेथील सैनिकानें ॥
॥ महावीरा अबदूलकरीमानें ॥
॥ करी छापा घालून महा हल्ला ॥

॥ पन्हाळ्याचा घ्यावया थोर किल्ला ॥ ४३ ॥

**चामर.**

॥ प्रतापराव चाल तत्क्षणीं करी तयावरी ॥
॥ अविंध त्यास मारिती, सुधीर वीर केसरी ॥
॥ पुरास आग लागते तशीच हाक जाहली ॥
॥ चमू समग्र जीव घेउनी पळोंच लागली ॥ ४४ ॥

**साक्या.**

॥ मारो मारो सेना वदती मारा बडा मराठा ॥
॥ लूटो इनका मुलुख बतावो मुसल्मानका सोटा ॥ ४५ ॥
॥ बडे हरामी इन् लोकोंनें गमजा बहुत मचाया ॥
॥ पकडो इनके जोरू बच्चे बल्लन जो कुच पाया ॥ ४६ ॥
॥ भ्रष्ट करो ये औरत् बल्लन हड्ड्या मूंमें डालो ॥
॥ काहका लाया बडा शिवाजी अपनी जान समालो ॥ ४७ ॥

**दिंडी.**

॥ ग्रेइ हंसाजी मोहिता तशांत ॥
॥ हरी अवचित उन्मत्त त्या गजांत ॥
॥ ठार केले बहुतेक त्याच काळीं ॥
॥ पळाल्यांचीं जाहलीं मुखें काळीं ॥ ४८ ॥
॥ सूर्य उगवे तम सर्व पहा गेलें ॥
॥ अविंधाचें तें स्वप्नदुःख झालें ॥
॥ उडाले ते तत्काळ दिवाभीत ॥
॥ हात जोडिति ते वदति भीतभीत ॥ ४९ ॥
॥ अविंधाचा अपमान फार झाला ॥
॥ प्रमोदाचा ये पूर त्या नृपाला ॥

॥ नांव दिधलें हंबीरराव त्याला ॥
॥ शूरवीरा हंसाजि मोहित्याला ॥ ५० ॥
॥ औंड पाटा गड पुन्हा सही केले ॥
॥ नर्मदा ती उतरोनि सैन्य नेलें ॥
॥ बऱ्हाणपुरापर्यंत लुटी देश ॥
॥ भडोच्याचा परगणा सावकाश ॥ ५१ ॥

**श्लोक (शिखरिणी.)**

॥ पन्हाळा किल्ला घे रण करून तो भूपति पुन्हा ॥
॥ क्षमा म्लेच्छांचा तो करि न नृपती एकहि गुन्हा ॥
॥ लुटीयेलें त्याणें मग नगर विख्यात हुबळी ॥
॥ थरारोनी गेले खल यवन त्यातें बहुबळी ॥ ५२ ॥

**साक्या.**

॥ परळी किल्ला घेउन नंतर सातारा सर केला ॥
॥ यवनासुरसंहार करोनी यश संपादित गेला.॥ ५३ ॥
॥ चंदन वंदन नांदागिरी गड पांडव ताटोरा हे ॥
॥ दुर्ग पांचही घेउन सचमू युद्धा तयार राहे ॥ ५४ ॥
॥ पोंडा किल्ला सुरुंग लावुन बुरूज पाडुन घेई ॥
॥ घाटावरचा देश लुटोनी दुर्जय यवना देई ॥ ५५ ॥
॥ वर्धन भूषण मच्छिंद्रगड तो सदाशीव हे चार ॥
॥ किल्ले नूतन रचिले तेव्हां यवना पडे विचार ॥ ५६ ॥

**दिंडी.**

॥ अविंधाच्या मुलखांत असा दंगा ॥
॥ नृपानें त्या मांडिला पहा रंगा ॥
॥ कधिं न भ्याला तो विपति त्या भुजंगा ॥

॥ लढूं लागे वीराशिं महा चंगा ॥ ९७ ॥

**साक्या.**

॥ गविळकोंड्याच्या यवनाही केलें असेंचि जेर ॥
॥ बादशहा तो शरण येउनी वाही पदास शीर ॥ ९८ ॥
॥ तोफा जेजाला गज घोडे त्याचे घेइ तहांत ॥
॥ हंबिररावा तेथें ठेवुन आला नृप राज्यांत ॥ ९९ ॥

# शिवराजलीला.

## भाग अकरावा.

**श्लोक** ( पृथ्वीछंद. )

॥ अविंध बहु वर्णसंकर करावया पाहती ॥
॥ सकोप शिव चाप तो धरि वधावया त्यांप्रती ॥
॥ दया बहु असे जया स्वजन देश यांची पहा ॥
॥ स्वदेश अभिमानही नृप दुजा न ऐसा महा ॥१॥

**श्लोक** ( इंद्रवज्रा. )

॥ लीनत्व दावी सुजनास रंगीं ॥
॥ वक्तृत्व दावी स्वजना सुरंगीं ॥
॥ स्वप्रेम दावी जगदेकराया ॥
॥ सद्भाव दावी गुरुराजपाया ॥ २ ॥
॥ कर्नाटकीं काय पुढें जहालें ॥
॥ अविंध सेनारुह कोंवि हाले ॥
॥ त्यानंतरें काय कथौघ होता ॥
॥ सुधारसा या श्रवणांत ओता ॥ ३ ॥

**श्लोक** ( इंद्रवज्रा. )

॥ हंबीर योद्धा निजभूपभद्रा ॥
॥ कृष्णानदी निर्मळ तुंगभद्रा ॥
॥ मधील या दो रिपुच्या दळीं तो ॥

॥ शिरून रात्रीं खळ निर्दळीतो ॥ ४ ॥
॥ दैत्याधिराजा गमला बळी तो ॥
॥ अविंधसेनार्णव रंवूदळीतो ॥
॥ भुजंग कीं होय महा बळी तो ॥
॥ अल्पश्रमें भेक बहू गिळीतो ॥ ५ ॥
॥ मळी पदें कीं गज कर्दळी तो ॥
॥ जळीं करी विक्षय उत्पळीं तो ॥
॥ कळी जणू दुष्टजना छळीतो ॥
॥ महीतळीं शत्रुयवा दळीतो ॥ ६ ॥
॥ मळीन कीं अंतक दे सुळीं तो ॥
॥ गळीं धरी धीवर मासळी तो ॥
॥ अरी अळीसा चरकीं पिळीतो ॥
॥ वज्रातळीं पर्वत डळमळीतो ॥ ७ ॥
॥ दावानळीं जंतुक तळमळीतो ॥
॥ तुटे मुळीं पादप वादळीं तो ॥
॥ तशी दशा शत्रुस दे पळीं तो ॥
॥ भूमंडळीं गाजवितो कुळी तो ॥ ८ ॥
॥ किंवा गमे वानर योध मुख्य ॥
॥ रामायणीं वीर महा प्रमुख्य ॥
॥ द्यावी गमे या उपमा मनातें ॥
॥ प्रकाम याचें उपनाम नातें ॥ ९ ॥
॥ हा भीम कीं कौरवकाननातें ॥
॥ विध्वंसितो शत्रु सुयोधनातें ॥
॥ ना तें परी त्या यवनास नातें ॥

॥ वस्ताद दावी सुरणासनातें ॥ १० ॥
॥ दावी महा शौर्य सनातनांना ॥
॥ तैं रंग होती यवनांत नाना ॥
॥ उठे महा मृत्युभयें तनाना ॥
॥ तैं दुंदुभिध्वान उठे झनाना ॥ ११ ॥
॥ असो अशा दिग्विजया करीतो ॥
॥ कर्नाटकीं कीर्ति यशा भरी तो ॥
॥ योद्धा महा तो शिवराज यातें ॥
॥ भेटे तदा काय वदे पहा तें ॥ १२ ॥

**दिंड्या.**

॥ स्वराज्याला जगतांत नसे मोल ॥
॥ विचारा या महाराज पहा खोल ॥
॥ दुःखदायक ही भीति सर्व टाका ॥
॥ त्वरें देशांतुन यवनचमू हाका ॥ १३ ॥
॥ अहा ! हिंदुस्थान हा देश नामी ॥
॥ यास झाला यवनेश कसा स्वामी ॥
॥ कोण कोठिल हे ? चोर हो हरामी ॥
॥ नाचवीती हिंदूंस आत्मकामीं ॥ १४ ॥
॥ षंढ हिंदू हा दंड बोलताती ॥
॥ बंड केलें तर पुंड दोष देती ॥
॥ चंड यास्तव व्हा दंड धरा हातीं ॥
॥ दंड ठोका कां थंड जाय माती ॥ १५ ॥
॥ तुंड रिपुचें कोदंडशरें तोडा ॥
॥ खंड उडवा विध्वंडयशा जोडा ॥

॥ झुंड जमवा भट शत्रुकंडनास ॥
॥ मुंडमुंडण होईल शेवटास ॥ १६ ॥

**श्लोक** ( भुजंगप्रयात. )

॥ असे ऐकुनी वाक्य तो भूप बा रे ॥
॥ पदां न्हाणितो तत्वता अश्रुधारें ॥
॥ निघाले तदा दोन ते वीर मोठे ॥
॥ अशेषें अविंधा वधाया मराठे ॥ १७ ॥

**श्लोक** ( इंद्रवज्रा )

॥ जसा मरुत्वान् अमराग्रभागीं ॥
॥ शोभे तसा भूप त्रळीं सुभागी ॥
॥ घेऊन तो लोक रणा निघाला ॥
॥ अविंध सैन्यास रणांत घाला ॥ १८ ॥
॥ सेनापति स्कंद सुरेंद्रसेने ॥
॥ हंवीर हा भूपत्रळा तसें ने ॥
॥ दोघे महा वीर रणांत गाजी ॥
॥ धाके नपी तैं जल शत्रुवाजी ॥ १९ ॥

**दिंड्या.**

॥ पहा आतां तें युद्ध होइ भारी ॥
॥ मोंगलातें जिंकील अविंधारी ॥
॥ कथाभागा या परिस सावधानें ॥
॥ तापहरका प्रेमदा प्रमोदानें ॥ २० ॥
॥ साम सर्वहि मोडून धूम चाले ॥
॥ खानयवनांचे बहुत खून झाले ॥
॥ प्राण जाउन समरांत खून वाही ॥

॥ जाण मार्गी सर्वत्र खूण ना ही ॥ २१ ॥
॥ युद्धगर्दी माजेल ही रणांत ॥
॥ धडड धडडड हा नाद अंबरांत ॥
॥ यवनसत्रा मांडील भूप भावें ॥
॥ कथामार्गी या लक्ष्य जनीं द्यावें ॥ २२ ॥
॥ भूप जिंकाया सिद्ध मोंगलाला ॥
॥ परि न कारण त्या सांपडे रणाला ॥
॥ अशामध्यें अनुकूल दैव झालें ॥
॥ शिवाजीचें गृह पुसित युद्ध आलें ॥ २३ ॥
॥ विजापुरच्या राजास स्वसा होती ॥
॥ तीस फारच लावण्य रूपकांती ॥
॥ मोंगलाच्या सुलतान माजुमाला[1] ॥
॥ तीस पाहोनी प्रेमपूर आला ॥ २४ ॥

श्लोक (भुजंगप्रयात.)

॥ वदे सेवका काय सांगू तुला रे ॥
॥ करीं सुंदरी घेतसे ते फुला रे ॥
॥ परी हुंगण्या होतसे भार त्याचा ॥
॥ असा कोंवळा काय तो लोणियाचा ॥२५॥

श्लोक (वसंततिलका.)

॥ जेव्हां शुभी चरण पायजम्यांत जोडी ॥
॥ शोभे गमे गवसणींत सतारजोडी ॥
॥ साजे अलाबु सुनितंब तसा तिचा तो ॥
॥ खुंटी पयोधर तिला जणुं टांगला तो ॥ २६॥

---
१. औरंगजेबाचा पुत्र.

॥ बिंदू तिच्या हनुवरी लघु गोंधलेला ॥
॥ पद्मीं जसा भ्रमर सद्रससक्त ठेला ॥
॥ चक्षुद्वयीं सुनिलिमा सुरमा विराजे ॥
॥ दंतांतरीं स्थित मिसी बहु रम्य साजे ॥२७॥

## दिंड्या.

॥ असो विनवी तो बादशहा याला ॥
॥ ह्मणे वाहीं मज पुष्प तें नृपाला ॥
॥ शहाजादी ही मोहिली तयाला ॥
॥ परि न होई तें मान्य सुमंताला ॥ २८ ॥
॥ युद्ध यास्तव मांडिलें मोगलांनीं ॥
॥ विजापुरच्याही सर्व सैनिकांनीं ॥
॥ कंबरा कीं बांधिल्या कुरंगांनीं ॥
॥ चाल करण्या व्याघ्रांत महारानीं ॥ २९ ॥
॥ बिडाळासी मार्जार पथीं भेटे ॥
॥ श्वान लढतें श्वानाशि महा नेटें ॥
॥ अविंधाशीं तें युद्ध अविंधाचें ॥
॥ जाण तैसें अज्ञान भूत नाचे ॥ ३० ॥
॥ भूत नाचे तें घेइ कोलिताला ॥
॥ स्वहित नेणे लावि तें स्वगृहाला ॥
॥ जगा होतें कौतूक थोर साचें ॥
॥ तदा पिकतें तें शेत तस्कराचें ॥ ३१ ॥

## सवाई.

॥ राजसुता सुकुमार लता यवनी स्वहिता शमनार्थही तापा॥
॥शाइस मोगल जाइ निघोनिच्च घाइ करी तिस जाइ सुचापा॥

॥हंहि नसे तिस हेतु असे गमनास दिसे वर त्या लतिकेला॥
॥पुष्पधनू शरविद्धतनू करि वैद्य ह्मणूनिच माजुम केला॥३२॥

दिंडया.

॥ परि न मानी सुलतान तो तियेला ॥
॥ मानभंगचि होऊन अर्धा गेला ॥
॥ युद्ध कोपें करि कहर मांडियेला ॥
॥ राज्य वुडतें तैं गमे राजथाला[1] ॥ ३३ ॥
॥ विजापुरचे सरदार सर्व भ्याले ॥
॥ शिवाजीशीं मग वदति लीन बोलें ॥
॥ साह्य होई या समयिं महाराजा ॥
॥ सुखी कर तो त्वत्तात धनी राजा ॥ ३४ ॥

श्लोक (कामदा.)

॥ भूप तो बहू सौख्य पावला ॥
॥ सैन्य घेउनी वीर धांवला ॥
॥ मोंगलास तैं खूप झोडणें ॥
॥ थोर चालिलें मार मारणें ॥ ३५ ॥
॥ गांव लूटिले धूम मांडिली ॥
॥ मोंगला महा शक्ति दाविली ॥
॥ जालनापुरीं पीर फोडिले ॥
॥ यवन सोडिती प्राण आपुले ॥ ३६ ॥
॥ वर्त्तमान हें माजुमा कळे ॥
॥ फार कोपुनी अंतरीं जळे ॥
॥ सैन्य घेउनी तो लढावया ॥

---

१. विजापुरच्या बादशाहास.

॥ वीर्य चालिला दाखवावया ॥ ३७ ॥

**श्लोक** ( भुजंगप्रयात. )

॥ विजापूरचें युद्ध एकीकडे हो ॥
॥ पडोनी मधें विघ्न हेंची घडे हो ॥
॥ शिवाजीवरी लोटला सैन्यभार ॥
॥ तदा जाहल्या आहवा सावधार ॥ ३८ ॥

**श्लोक** ( स्वागता. )

॥ थोर भूपयशकीर्ति दिगंतरीं ॥
॥ पाहुनी जळति मोंगल अंतरीं ॥
॥ हेतु हा बहुत उत्तम दीसतो ॥
॥ घोर योजिति रणास्तव दीस तो ॥ ३९ ॥
॥ घोर युद्ध बहु होय पहा तें ॥
॥ मोंगलास निवटी नृप हातें ॥
॥ सार यांत करितो अवतारी ॥
॥ ईश हें परिसतां भव तारी ॥ ४० ॥

**दिंड्या.**

॥ मोंगलाचा विस्तीर्ण चमूभार ॥
॥ अश्व हत्ती तोफाहि ज्यांत फार ॥
॥ पादसेना अति शूर बहु स्वार ॥
॥ वीर पट्टे करयुद्ध खेळणार ॥ ४१ ॥
॥ शिवाजीचेंही सैन्य बहू थोर ॥
॥ चरणगामी सादीहि अती धीर ॥
॥ तोफवाले तरवार परजणार ॥
॥ उष्ट्रमातंगासनीं शूर वीर ॥ ४२ ॥

## आर्या.

॥ युद्धारंभीं तो नृप बद्धकरीं स्वकुलदेविला नमला ॥
॥ खलबलधींत भवानी एकाकी सोडिं दुर्बला न मला॥ ४३॥

## कटाव.

॥ यवनासुरमर्दन झाले ॥ नरकिन्नर सर्वहि भ्याले ॥ ध्रु०॥
॥ संगमनेराजवळी सेना ॥ घेउन भिडला मोगल राणा ॥ अविंध करिती बहू तनाना ॥ चक्रवर्ति भूनायक माना, विहित आदरें द्या सन्माना, निषेधाल तर नासिक् काना, कापुन उच्छेदूं त्या माना, वचनें ऐशीं बोलुन नाना, फार करीती मुखें वल्गना, श्रुत केली नचि सिंहगर्जना, तोंवरि वाटे प्रमोद हरिणा, परी देखिला जयिं बळभार, अश्वकरी ते नव सरदार, हार चमू दशयोजन पार, मार मार, ते करीत बार, जणुं संहार, एकचि वार, नृप तरवार, वार करोनी कारि भडिमार, भार सारण्या दृढ भूभार, वारंवार, थार घेउनी आर जनाला फार, तयाचा मार कटारचि, गार तनू धन, सार त्यांत प्रभुलीलाधारचि, तो अविचार न, त्यांत असार न, मायेकारण, रूपाकार न, निराकार जो तो अवतारून, दुष्टविदारणहेतु धरोनी, ये संग्रामीं अष्टमूर्ति त्रिलोकस्वामी, यवन हरामी, निजसुख धामीं, न्याया आला, यास्तव झाले मत्त मदें ते युक्त होउनी, मृत्युपथातें लक्ष्य देउनी, रणांगणीं निज शस्त्रअस्त्रही घेउन ठेले ॥ यवनासुर० ॥ १ ॥
॥ चमूपंक्ति रणिं उभ्या रहाती, भिंती रंगित सुंदर भाती, गजपंक्ती त्या नव्हेत गमती, कज्जलपर्वतआली

तर मग, आलीसह तूं अंजन घालीं, रणदेवी ही आली त्याली कज्जल असती, भ्याली परि ती फार चमूला, कोलाहल नभ व्यापुन गेला, अश्वभार तो फार लोटला, उभा ओळिनें दिगंत ठेला, शोभा देई तुमुल रणाला, सहस्रमुख रविअश्व भासला, वीरांची भा विशेष भारी, चमकति भाले स्कंधाधारी, ढाला खडखडतात पठारीं, चक चक चकचकती तरवारी, लख लख लख लख शस्त्रे करिती, थोर निशाणें फडफडताती, झग झग झग झग झेंडे हालति, लट लट लट लट वीर कांपती, टक मक टक मक लोक पहाती, सैन्य पाहुनी मनीं दचकती, चरणदळाच्या रांगा दिसती, सजीव भिंती जाती येती, बंदूकांतें करीं नाचविति, संगिनि वरच्या नयन दिपविती, कवाइतीनें बैठक मारिति, सर्वे उठोनी हात फेंकिती, पट्टा खेळुन कौतुक दाविति, घोडे ते झणि मंडळ घेती, धडा धडा त्या उड्या मारिती, एक सरीनें उभे रहाती, चक्राकारहि उभे राहुनी, चक्रव्यूह तो रचूं पहाती, वातवेत तो जिकडे तिकडे, सज्ज होउनी, चाप जोडुनी, नेम लावुनी ठेले ॥ यवना० ॥ २ ॥

॥ भंभंभंभं शंख वाजला, युद्धारंभचि होउन गेला, धडडड धडडड धडा धडा धड तोफा सुटती, कडा कडा कड कडाक्तिनी त्या, वाजति सररर बाण चालती, फडा फडा त्या सुटति बंदुका, चम चम चम चम करिति रंजुका, घर घर घर घर रथ नानाविध, किणि किणि किणि किणि वदति घंटिका, किर्र्र्र भिर्र्र्र तीं चक्रें गर्ज-

ति, दण दण दण दण पाय वाजती, नेजालेचा एक दणाणा, ठणणण ठणणण मेघगर्जना, जणुं होई झप त्या अवसाना, रणवाद्यांचा थोर झनाना, अंबर फोडुन अमित योजना गांठी, घे घे वीर गर्जती, तरवारींचे वार करीती, सप्प सप्प ते ध्वनी नीघती, चिर चिर चिर चिर शोणित वाहे, विश्व सर्वही जळून राहे, प्रळयकाळचें स्वरूप पाहे, यवनशत्रु शिव अस्त्रशस्त्रधर, कृपाणमंडित, विप्रसुरद्रुम, अखंडयश अर्धांगविभूति, तप्ततनू आरक्तनयन तो, शोभे अश्वासनीं रणांगणिं, अधर चावुनी सकोप धांवे, असुरकंदना, कंप अहींद्रा सुटला, भीती स्वर्गपथीं सुरकिन्नरही तैं, शांत शांत झणि शब्द वदोनी, सुमनवृष्टि ते करिते झाले ॥ यवनासुर० ॥ २ ॥

# शिवराजलीला.

## भाग बारावा.

### दिंडी.

॥ धूम गेला दाटोनि दिशा दाही ॥
॥ शतघ्नीचा ध्वनि फोडि अंबराहि ॥
॥ कहर केला बहु उभय सैनिकांहीं ॥
॥ कंप सुटला धरणीस थोर पाहीं ॥ १ ॥

### श्लोक (स्वागता.)

॥ धूममंडळ न तें मज वाटे ॥
॥ मेघमंडळ महीवर दाटे ॥
॥ रंजुका न निघती चपलाचि ॥
॥ गोलिका नव्हत वृष्टिच साची ॥ २ ॥

### श्लोक (भुजंगप्रयात.)

॥ शतघ्नीध्वनी ही न ती अंबुदाची ॥
॥ असे गर्जना हस्तनक्षत्रजाची ॥
॥ न ते वीर हो मोर हे धांवताती ॥
॥ घना पाहुनी कौतुकें नाचताती ॥ ३ ॥
॥ महाकाळ तो होय कल्पांत काळ ॥
॥ थके ओढितां जीव दाढेंत काळ ॥
॥ महाकाळ[1] आक्रांत कीं मांडि आजी ॥

---

१ महादेव.

॥ अविंधा तसा भासला तो शिवाजी ॥ ५ ॥

अंजनी वृत्त.

॥ तोफा बंदुकि सोडित येती ॥
॥ हळू हळू मग एकचि होती ॥
॥ शस्त्रें काढुन धांवुन जाती ॥
॥ एकावरि एक ॥ ५ ॥

श्लोक (इंद्रवज्रा.)

॥ गजावरी ते गज लोटताती ॥
॥ गंडस्थळाच्या भडकाच देती ॥
॥ धक्क्यासरीं पावक उद्भवे तो ॥
॥ तो ध्वान भेदीत नभास जातो ॥ ६ ॥
॥ शस्त्रें बहू घातुक बद्ध माने ॥
॥ गेंडा असा कापित जाइ सेने ॥
॥ लागे न गोळी असि त्या कदाही ॥
॥ मारावया त्यास उपाय नाहीं ॥ ७ ॥
॥ प्रचंडदेही जणुं तो पहाड ! ॥
॥ त्वचा किती जाड निकोप हाड! ॥
॥ वज्रापरी होय अभंगदेही ॥
॥ भीमाचिया दाद नसे गदेही ॥ ८ ॥
॥ वीरांवरी धांवुन वीर जाती ॥
॥ कोपें दिसेना पर कीं स्वजाती ॥
॥ कोणी गदा खड्ग कृपाण हातीं ॥
॥ घेऊन वारास करूं पहाती ॥ ९ ॥
॥ कोणी बळी ठोकुन ऊरु दंड ॥

॥ घेती करीं ठोकळ दीर्घ दंड ॥
॥ दंडावया ते यवना उदंड ॥
॥ दंडापरी भोगिति वीर दंड ॥ १० ॥
॥ सुदंड हा त्या नचि राजदंड ॥
॥ सुधारसा घेति न इक्षुदंड ॥
॥ खंडोनि माया सुयशा अखंड ॥
॥ ते जोडिती वीर रणीं न खंड ॥ ११ ॥
॥ दंडप्रहारास महा व सानीं ॥
॥ घालीति ते वीर महावसानी ॥
॥ पाहीं रणीं नासति दिव्य काय ॥
॥ मोदास शोकास जयास काय? ॥ १२ ॥

श्लोक ( भुजंगप्रयात. )

॥ कधीं दावितो वीर एकास तेज ॥
॥ मुखें बोलतो काय प्यालास पेज ॥
॥ अरे दूध प्यालों न मेल्या वयेचें ॥
॥ कसे जल्पशी शब्द युद्धीं दयेचे ॥ १३ ॥
॥ कटीं बांधुनी घट्ट कित्येक कांच्या ॥
॥ करीती मुखें वल्गना हो फुकाच्या ॥
॥ परी येउनी वीर लातेंचि पाडी ॥
॥ पदा दाबुनी एक ओढून फाडी ॥ १४ ॥

श्लोक ( मालिनी. )

॥ विकल गलित योद्धे थोर वाचाविशेषें ॥
॥ गरजति रणि पाहीं ते न हो वीर वेषें ॥
॥ रव नभपथिं गेला पार नाहींच नाशा ॥

॥ सुरनर जय झाला बोलती त्या क्षितीशा ॥१५॥

श्लोक ( इंद्रवज्रा. )

॥ रणांगणीं शोणितपूर आला ॥
॥ नद्यांसवें सिंधुजलीं मिळाला ॥
॥ शवांचिया पर्वततुल्य राशी ॥
॥ संख्या न त्यांची करवे नराशी ॥ १६ ॥

आर्या.

॥ अगणित सुवीर पडती सोडुन जीवां तटस्थ ते धरणी॥
॥ त्यांनीं काय करावें धाडी अंतक अकाल त्यां घरणीं॥१७॥

श्लोक ( द्रुतविलंबित. )

॥ बहुत वेळ असें रण चाललें ॥
॥ यवनदानव भेसुर माजले ॥
॥ द्विजजनावनशील तदा करी ॥
॥ प्रकट तेज सहस्रकरापरी ॥ १८ ॥

श्लोक (मालिनी.)

॥ धक धक धक जैसा अग्नि अत्यंत तापे ॥
॥ खलनरपरिपंथी तापला तेंवि कोपें ॥
॥ रदअधर नरेशें चावुनी धांवला हो ॥
॥ प्रलयसमय आला अंतिचा वाटला हो ॥ १९ ॥

श्लोक ( वसंततिलका. )

॥ आक्रांत होय मग काय वदूं सुवाचें ॥
॥ दावानळीं कथ कसें वनसत्व वांचे ॥
॥ बाळे समुद्र तरि काय दशा झषांची ॥
॥ आला प्रसंग यवनावरि तो तसाची ॥ २० ॥

### दिंडी.

॥ सुटे रंभाकाननीं चंडवात ॥
॥ महापूरच कीं लोटला पुरांत ॥
॥ तूलराशित तो अग्नि; कीं तमांत ॥
॥ भानु तैसा नृप शत्रुसमाजांत ॥ २१ ॥

### श्लोक (पृथ्वीछंद.)

॥ जसा वनकरी वनीं अमुप नाशितो कर्दळी ॥
॥ स्वशत्रुबलसिंधुही नृपति तो तसा रंवूदळी ॥
॥ जिवां भिउन तेधवां यवन ते पळों लागले ॥
॥ स्वधर्मरतपार्थिवा विजयपुष्प तें लाधले ॥ २२ ॥
॥ अविंधनृपपुत्र माजुम पळे सुयोद्धा रणीं ॥
॥ ससैन्य झणि लावि त्या पिटुन मावळ्यांचा धणी ॥
॥ तमारि उगवे तदा भगण सर्वही लोपती ॥
॥ तसे यवन सर्वथा दिसतना रणीं भूपती ॥ २३॥

### दिंडी.

॥ विजय वाद्ये स्वर उच्च वाजताती ॥
॥ महानंदें नृपयशा लोक गाती ॥
॥ प्रमोदानें चालिला राजधानी ॥
॥ मुखीं माती घातली मोगलांनीं ॥ २४ ॥

### आर्या.

॥ मोंगलबलजलधी हा या सुकवाया अगस्तिमुनि तो गा॥
॥ पुनरपि शिवरूपानें जन्मे यास्तव सदा नमुनि तो गा॥२५
॥ या युद्धे त्या भूपा लाधे यशकीर्तिचाच ठेवा हो ॥
॥कथिला कथींच लघु परि विस्तारें विबुधमानसीं वाहो॥२६॥

श्लोक ( इंद्रवज्रा. )

॥ महाप्रतापी नरपुंगवाला ॥
॥ कोणी न बोले मग बंडवाला ॥
॥ लोकत्रयीं कीर्ति भरे तयाची ॥
॥ झाली स्तुति स्वर्गपुरीं जयाची ॥ २७ ॥

श्लोक ( मालिनी. )

॥ क्षितिवरि परिपंथी त्या नुरे लोकपाला ॥
॥ प्रबल बहुत झाला वंद्य सर्वा नृपांला ॥
॥ द्विजरिपुवध केला स्वस्थ केली धरा हे ॥
॥ शिवनृप अवतारी सत्य देवीगिरा हे ॥ २८ ॥

श्लोक ( द्रुतविलंबित.)

॥ करुणवीररसात्मक सारणी ॥
॥ नृप दिसे भट होय कसा रणीं ॥
॥ करुण ऐक कथूं विबुधा रसें ॥
॥ मृदु सुशब्द सुधारसधारसे ॥ २९ ॥

साकी

॥ युद्ध घोर हें चाले तेव्हां सदनीं प्रिय नृपजाया ॥
॥ शोचति चौघी करुणावचनें परिसा करुणरसा या ॥ ३० ॥

श्लोक ( स्वागता. )

॥ युद्ध ऐकति रणीं घनघोर ॥
॥ लाविते सुयुवतीत्दर्दि घोर ॥
॥ मंदिरीं विकल त्या नृपजाया ॥
॥ दाटली सुमनीं बहु माया ॥ ३१ ॥
॥ घोर युद्ध जमलें समरांत ॥

॥ वीरशब्द चढले अमरांत ॥
॥ ढाळिती सुनयनीं असु वाला ॥
॥ धांव धांव वदती जगपाला ॥ ३२ ॥
॥ एक ते वदतसे दुसरीतें ॥
॥ "मानसीं कसनसेंच करीतें ॥
॥ नावडे सुखविहार मला, हें ॥
॥ शून्य मंदिर कसें सुख लाहे ॥ ३३ ॥
॥ अंबुवांचुन झषा सुख नाहीं ॥
॥ वाळली कुमुदिनी तपनें ही ॥
॥ प्राणवल्लभ सखे असु मातें ॥
॥ धांव धांव तुळजापुर मातें" ॥ ३४ ॥
॥ बोलली वच दुजी दिनवाणी ॥
॥ "मत्प्रिया करिं सहाय भवानी ॥
॥ धांव गे त्वरित जाइं रणांत ॥
॥ घाल शत्रु अवघे सरणांत ॥ ३५ ॥
॥ हिंदुदेशहितास रणातें ॥
॥ सेविलें भवनिभीतरणातें ॥
॥ घेतलें द्विजशिवा करिं शीर"
॥ क्षाळितें ह्रदय लोचननीर ॥ ३६ ॥
॥ बोल फुंदत वदे तिसरी ते ॥
॥ "दान दे नगसुते पति मातें ॥
॥ सारथी नट वये रथ हाकीं ॥
॥ संकटांत तव भक्त महा कीं ॥ ३७ ॥
॥ जा रणीं अभय नेइं सर्वे गे ॥

॥ प्राणनाथहृदयीं वस वेगें ॥
॥ आसरा तुजविणें नच मातें" ॥
॥ वाष्पतोय पुसते पदारातें ॥ ३८ ॥
॥ "हा सखे विधु गमे रवि माला ॥
॥ तप्तही मदनत्राण सुमाला ॥
॥ मंदवायु खुपतो शरिराशी ॥
॥ टाकिलेचि जणुं कंटकराशी ॥ ३९ ॥
॥ थंड चंदनउटी मज दाही ॥
॥ नावडे नगविलास कदाही ॥
॥ हेमरत्नयुत हे नग काढा ॥
॥ व्यर्थ भृंग नसतां मधु गाढा ॥ ४० ॥

**दिंडी**

॥ मंजु कंठध्वनि विरहवन्हिला गे ॥
॥ नको गाऊं प्रज्वलित करूं लागे ॥
॥ पुष्पगंधी टाकितो स्नेह आगीं ॥
॥ हृदय फाटुन होतसे दोन जागीं ॥ ४१ ॥

**श्लोक** (वसंततिलका.)

॥ उद्यान हा दिसतसे विपिनासमान ॥
॥ आधारवृक्ष उरलाचि विहंगमा न ॥
॥ देती सुगंधि सुमनें न सखे सुवास ॥
॥ वाटे स्मशानसदनीं घडतो निवास ॥ ४२ ॥

**श्लोक** (स्वागता.)

॥ व्यापिलें मजशि पंचशरानें ॥
॥ वेधिलें हृदय तीव्र शरानें ॥

॥ झोंप गे निशिदिनीं मज नाहीं ॥
॥ भाजिली तनु सखे मदनें ही ॥ ४३ ॥
॥ लोटितें क्षण युगासम पाहीं ॥
॥ नाथभेट कधि होइल बाई ॥
॥ कां विशाल ममचक्षु मिळे तें ॥
॥ कांतदर्शनसुधा क्षुधितांतें ॥ ४४ ॥

**श्लोक** (इंद्रवज्रा.)

॥ मरंद वाहे मुखसारसींचा ॥
॥ घेतो कधीं पत्यलि घोट त्याचा? ॥
॥ आकुंचले हे कुचपद्मकोश ॥
॥ केव्हां प्रकाशे रवि तो नरेश? ॥ ४५ ॥

**साक्या.**

॥ पतिपथचंद्रा निशिदिन माझे पाहति नयनचकोर ॥
॥ कांतमेघ कीं गोचर नसतां दुःखी सुमनमयूर ॥ ४६ ॥
॥ मी नलिनी मम कसें मुखांबुज पतिविधुवीण विकासे? ॥
॥ वसंत नसतां मंजु कोकिला गाइल सुगान कैसें?" ॥ ४७ ॥

**दिंड्या.**

॥ वदे दुसरी "मी नित्य नगा घालीं ॥
॥ लेइं कुंकू कोरूनि नित्य भालीं ॥
॥ हार गजरे तांबूल करीं रोज ॥
॥ आस वाटे येतील महाराज" ॥ ४८ ॥
॥ दूत आले धांवोनि तशा संधी ॥
॥ वदति आली हो स्वारि महानंदीं ॥
॥ महाविजयी सरकार रणीं झाले ॥

॥ समारंभें नगरास पहा आले ॥ ४९ ॥
॥ असें वचनामृत कर्णसंपुटांत ॥
॥ पडे कांचनपर्जन्य निर्धनांत ॥
॥ चातकांतें आनंद वृष्टि देते ॥
॥ मेघदर्शन कीं होय मयूरांतें ॥ ५० ॥
॥ महानंदा पावल्या भूपजाया ॥
॥ धांवल्या त्या शृंगार तो कराया ॥
॥ धडड झाले बहु बार सलामींचे ॥
॥ अश्व हत्ती देखिले ओळखीचे ॥ ५१ ॥
॥ रक्तलेपित सर्वांग थोर गाजी ॥
॥ हयस्थित ते पाहिली वीरराजी ॥
॥ देखियेला जयवंत राजराजा ॥
॥ सिद्ध चाऱ्ही जाहल्या भूपभाजा ॥ ५२ ॥
॥ दृष्ट काढी दहिंभात पट्टराणी ॥
॥ हेमकुंभें ओतितें दुजी पाणी ॥
॥ एक ओवाळी पंचदीप नामी ॥
॥ हार घाली ते एक हंसगामी ॥ ५३ ॥

श्लोक ( मालिनी. )

॥ अचलनयनदृष्टी. चंद्र पाही चकोर ॥
॥ विरहविकल कांता तेंवि तो भूप थोर ॥
॥ नृपवच मधु पी ती लाजती भाषणाला ॥
॥ स्मितमुख परि होती हर्ष चित्तास झाला ॥ ५४ ॥
॥ नरपति युवती हीं सर्व लावण्यकांती ॥
॥ व्रजवधु वनमाली तेंवि एकत्र भाती ॥

॥ नवरसरतिरंगीं क्रीडला दैवशाली ॥
॥ बहु सुरस कथा हे अग्र भागांत आली ॥९५॥

# शिवराजलीला.

## भाग तेरावा.

### दिंड्या.

॥ दिशाचाऱ्ही स्त्री[1] त्यांत भूपचंद्र ॥
॥ जणूं विलसे अप्सरांमाजि इंद्र ॥
॥ रमे प्रेमें गजराज हस्तिनींत ॥
॥ रमणरत कीं नृपमधुप मधुकरींत ॥ १ ॥
॥ एक लावी अंगास अत्तरातें ॥
॥ एक रमणी ते विंचरी कचांतें ॥
॥ एक अंगीं ते ओतितसे पाणी ॥
॥ भोजनाला मिष्टान्न एक आणी ॥ २ ॥
॥ मुखीं घाली तांबूल एक बाला ॥
॥ गळां घालीते एक पुष्पमाला ॥
॥ एक तरुणी ते पवन मंद घाली ॥
॥ एक चमरी वारिते मदनशाली ॥ ३ ॥
॥ मधुर गाती प्रिय मान डोलवी तो ॥
॥ मदनविव्हल त्यां नृपति नाचवीतो ॥
॥ सकल सुंदर त्या अधिक त्यांत नामी ॥
॥ तरुण पुतळी[2] बहु मोहि भूप कामी ॥ ४ ॥

---

१. स्त्रिया. २. पुतळाबाई.

॥ कनकपुतळी जणुं कुसुमशराची हे ॥
॥ रुचिरतनु मृदु अति मृदुल पराची हे ॥
॥ रमणकुशला रतिललितभराची ते ॥
॥ अमृतमदिरा मधु सुरस सुराची ते ॥ ५ ॥
॥ लपन लपवी लघु लपित वदे लाजे ॥
॥ चरणनूपुररव झुणुणु झुणुणु वाजे ॥
॥ कमलनयन स्मितवदन नृपा पाही ॥
॥ भ्रुकुटिचलनें प्रियसुमनचलन होई ॥ ६ ॥

**श्लोक** ( इंद्रवज्रा. )

॥ सुमध्यमा हास्यमुखी सदा ही ॥
॥ सप्रेम तो भूपति तीस पाही ॥
॥ अंभोजनेत्रा सुविशालभाला ॥
॥ तो भूपति श्रांत रणीं निवाला ॥ ७ ॥

**श्लोक** ( वसंततिळका.)

॥ रक्तोत्पलासम जिचे कर; दंतराजी ॥
॥ रत्नें अमोल जणुं तीं नृप तीस राजी ॥
॥ कंदर्पदिव्यपुतळी पुतळी नृपाची ॥
॥ बांधी गळयांत नृप ते जणुं सोनियाची ॥ ८ ॥
॥ जो तुंबला मद तिच्या बहुसाल अंगीं ॥
॥ तो हाव भाव करवी अति त्या प्रसंगीं ॥
॥ गालीं हंसे हनु धरी मृदु बोल बोले ॥
॥ प्रेमें सुनेत्र फिरवी मदनांत डोले ॥ ९ ॥
॥ भ्रूमंडळीं सुरस नर्तनरंग दावी ॥
॥ पीतांबरांत कुच झांकुन घे स्वभावीं ॥

॥ भावें अशा बहुत युक्त अनंगशाली ॥
॥ आलिंगिण्या नृपति उत्सुक फार झाली ॥ १० ॥
॥ तैं दाटती घन उरीं स्तनकुंभ नामी ॥
॥ ते कंचुकीमति दुभंगिति मुक्तकामी ॥
॥ येतां वसंत दिसतें रुचिरागरंगें ॥
॥ वृक्षावरीच पिकतां फल तें दुभंगे ॥ ११ ॥

**श्लोक** (इंद्रवज्रा.)

॥ लज्जावती फार मनांत भ्याली ॥
॥ भर्ता हंसे प्रीतिरसज्ञ गाली ॥
॥ घेऊन अंकावरि सुंदरीला ॥
॥ चुंबी जसा कीं अलि मंजरीला ॥ १२ ॥
॥ तैं सोयरा मोहनअस्त्र काढी ॥
॥ अत्युग्र ते लोचनबाण सोडी ॥
॥ वेधी नृपा खोंवुन ते पचंगा ॥
॥ आकर्षिते वीर सुहास्यरंगा ॥ १३ ॥

**दिंडी.**

॥ मधुररसयुत मुखकमल भूप भृंगा ॥
॥ कनकलतिका शशिवदन दावि रंगा ॥
॥ ललित वचन स्मितवदनयुक्त बोले ॥
॥ धरुन हनुतें नृपसुमनशकल केलें ॥ १४ ॥

**श्लोक** (वसंततिलका.)

॥ धांवे तिच्यावर तदा नृप कामरागें ॥
॥ स्त्री तैं दुजी त्यजिति तीव्र शरास रागें ॥
॥ वाटे नृपास रण सोडुन एक आलों ॥

॥ तों प्राप्त अन्य समराप्रति केविं झालों ॥ १५ ॥
॥ झालों महान विजयान्वित त्या रणांत ॥
॥ होतों पराजित परी रतिमंदिरांत ॥
॥ युद्धांत त्या जरि मला बहु कष्ट झाले ॥
॥ क्रीडारणीं रमणयुद्ध रसांत चाले ॥ १६ ॥
॥ अत्युग्र म्यां यवनवीर गतायु केले ॥
॥ हे दिव्य कोमल परी सुकुमार ठेले ॥
॥ त्यां धाडिलें वधुन म्यां दिव भोगण्याला ॥
॥ येथेंचि देति परि हे दिवसौख्य माला ॥१७॥
॥ ते क्रूर वीर बहु नावडती भयान ॥
॥ प्राणाहुनी परि मला प्रिय हे महान ॥
॥ ते शत्रु मित्र मम हे भव हा तराया ॥
॥ ऐसें वदोनि हृदयीं धरि चार जाया ॥ १८ ॥

श्लोक ( इंद्रवज्रा. )

॥ मिलिंद गुंगे अरविंदकोशीं ॥
॥ कोंदे सुखानें मकरंद शोषी ॥
॥ प्रेमें प्रिया मन्मथमूर्तिरंगा ॥
॥ कामान्विता वेष्टिति त्या शुभांगा ॥ १९ ॥
॥ सन्मंदिरीं सुंदर कंजनेत्रा ॥
॥ सदंबरी कोमलचारुगात्रा ॥
॥ भ्रूमंडळीं कुंतलदिव्यराजी ॥
॥ त्या वेष्टिती वेलि सुरद्रुमा जी ॥ २० ॥
॥ आलिंगिती चंदन नागिणी तो ॥
॥ समीरही मंद सुगंध येतो ॥

॥ पाहोनि तो रंग अनंग आला ॥
॥ आनंदरंगीं नृप दंग झाला ॥ २१ ॥
॥ माला करी हस्तभुजंगमाला ॥
॥ बालासुगल्लांबुज षट्पदाला ॥
॥ ज्या लालसा त्या कुचसत्फलाला ॥
॥ कालाविती त्या शुकहस्तकाला ॥ २२ ॥
॥ बाला लता त्या नृपपादपाला ॥
॥ का लालड्या भूपसुरम्यलाला ॥
॥ प्याला गमे भूपति त्या सुधाला ॥
॥ त्या लालना योग्य विशालभाला ॥ २३ ॥

**श्लोक** ( वसंततिलका. )

॥ वृंदांत या युवतिच्या नृपसौख्यकंदा ॥
॥ वृंदावनीं सुखद केलि जशी मुकुंदा ॥
॥ चंद्रार्कअस्त नुमजे दिनरात्रिखंडा ॥
॥ रंगांत दंग सुकृती नृप राजबिंडा ॥ २४ ॥

**दिंडी.**

॥ सुरस अद्भुत नृपकेलि यदा पाही ॥
॥ पशुपलोचनहुत मदन शांत होई ॥
॥ त्हदयरंजन हें अगद दुःखशोका ॥
॥ सुखद चंदन उटि देई कवी लोका ॥ २५ ॥

**श्लोक** ( वसंततिलका.)

॥ स्वामी असे नृपगृहीं अवचीत आले ॥
॥ तो भूप धुंद विषयीं बघतां निघाले ॥
॥ कामानिलें नृपविवेकसुकंज हाले ॥

॥ ते बोलती निजमनांत कसें जहालें ॥ २६ ॥

## दिंड्या.

॥ थंड डोहीं गजराज कीं बुडाला ॥
॥ रसद पद्मीं कीं भ्रमर हा दडाला ॥
॥ मधुरगानीं कीं हरिण सक्त झाला ॥
॥ तसा झाला या मोह राजयाला ॥ २७ ॥

॥ असो अपणाशी काय करायाचें ॥
॥ कर्म ओढवतें ज्यास त्यास त्याचें ॥
॥ परी माझा हा शिष्य संप्रदायी ॥
॥ आणि अवतारी अंश जगीं होई ॥ २८ ॥

॥ तरी किंचित् अनुवाद करूं याला ॥
॥ हात द्यावा बुडत्यास तरायाला ॥
॥ असें बोलुन तो सिद्ध राजयाला ॥
॥ वदे बाहुन त्या आयका नयाला ॥ २९ ॥

## श्लोक (वसंततिलका.)

॥ राजा अरे करिशि काय अनर्थ शोका ॥
॥ हीं लक्षणें घडिति संकटसंघ लोकां ॥
॥ ऐकोनि शब्द नृप विस्मित तो बघे तों ॥
॥ देखे गुरू तंव पदाप्रति धांव घेतो ॥ ३० ॥

॥ स्वामी वदे बहु घडे अपराध माला ॥
॥ मी विस्मरें रतिरसीं पदसारसाला ॥
॥ मी पावलों जय रणीं तुमच्या कृपेनें ॥
॥ झालों कृपेच नृप मी विजयी दयेनें ॥ ३१ ॥

॥ कारुण्यमेघ वळतां मज चातकाचे ॥
॥ ज्ञानांबुबिंदु पडले वदनीं सुखाचे ॥
॥ तैं ताप ते भवतृषान्वित शांत झाले ॥
॥ स्वानंदनंदनसुखीं जग हें समालें ॥ ३२ ॥
॥ धि:कारितें सकल जें मम संपदांतें ॥
॥ स्वामी अहो मज मिळेल कसें सदा तें ॥
॥ सांगा उपाय बरवा मज पामरातें ॥
॥ जेणें मिळे पद अतर्क्य नरामरा तें ॥ ३३ ॥
॥ ऐसें वदोनि नृप कागद घे लिहाया ॥
॥ हें वाहिलें सकल राज्य लिही पदा या ॥
॥ त्या प्रेमयुक्त लिखिता जंव दास वाची ॥
॥ बोले अहा ! नृपति तूं बहु धन्य साची ॥ ३४ ॥

**श्लोक** ( इंद्रवज्रा. )

॥ माझेंचि रक्षीं नगराज्य सारें ॥
॥ अलिप्त वागें जगतांत बा रे ॥
॥ विप्रास दे कांचन देहतोलीं ॥
॥ देहाभिमानाप्रति बंध घालीं ॥ ३५ ॥
॥ गेले असें बोलून रामदास ॥
॥ झाला विलासीं नृप तो उदास ॥
॥ करी व्यवस्था मग राजराजा ॥
॥ धर्मानुसारें करि लोककाजा ॥ ३६ ॥

**श्लोक** (वसंततिलका.)

॥ भेटे तया सुमति सुद्विज भट्ट गागा ॥
॥ राज्याभिषेक करितो नृपअग्रभागा ॥

॥ नामें तदा नृपति संस्कृत दे प्रधानां ॥
॥ मुद्रा करी कनकपात्रिं सुरेख राणा ॥ ३७ ॥

श्लोक (द्रुतविलं०)

॥ सुमणिकांचनयुक्त करी तुला ॥
॥ सकल इष्ट मनोरथहेतुला ॥
॥ द्विजवरा दिधली नृप सत्तमें ॥
॥ विधि यथास्थित साधुन उत्तमें ॥ ३८ ॥

श्लोक ( इंद्रवज्रा. )

॥ नो कोणि ते हेमतुला विलोकी ॥
॥ अपूर्व त्यातें गमलें त्रिलोकीं ॥
॥ बोले शिवाजी नृपती महा हा ॥
॥ सोनें किती धन्य जगीं अहाहा! ॥ ३९ ॥

श्लोक. (स्वागता.)

॥ तो शहाजिसुत वीरज पूत ॥
॥ आपणास ह्मणवी रजपूत ॥
॥ आत्मनाम लिहिण्या नृप रीती ॥
॥ घालितो बघ सुरेख परी ती ॥ ४० ॥

श्लोक ( शार्दूलविक्रीडित. )

॥ श्रीमत्छत्रपती महीश नृपती आजानुबाहू गुणी ॥
॥ सारे कोंकण देशपाद बहुधा वैदर्भ यांचा धणी ॥
॥ गाईब्राह्मणधर्मपालक सदाचारी प्रभू भूमिप ॥
॥ देवीदास सुधीरवीर यवनारि श्रीशिवाजी नृप ॥४१॥

दिंडी.

॥ असो एकांतीं एक दिनीं राजा ॥

॥ असे तैं ये सोयरा भूपभाजा ॥
॥ नयन फिरवी मृदु हस्त गळां घाली ॥
॥ बसे शेजारी मदनरती झाली ॥ ४२ ॥

आर्या.

॥ सस्मित सुजाति कलिका तोषवि त्यास मधुरोदितानें ती॥
॥ भाषणसदर्थओघा झाली सुदती सती हिता नेती॥४३॥

श्लोक (वसंततिलका.)

॥ रंभेपरी रुचिरकांति हसून गालीं ॥
॥ लाजून ती हळुच त्या क्षितिपा ह्मणाली ॥
॥ स्थापा पदीं तनय मत्प्रिय लोकनाथा ॥
॥ शंभू[1] महा कुटिल दुष्ट पिडी अनाथा ॥ ४४ ॥

श्लोक. (स्वागता.)

॥ सत्य हें प्रियतमे नृप बोले ॥
॥ तो असे परि वडील सुशीले ॥
॥ ऐकतांच विरली मृगनेत्रा ॥
॥ बाष्पबिंदु मनवेधक नेत्रां ॥ ४५ ॥

श्लोक. (पृथ्वीछंद.)

॥ तदाननविधु प्रफुल्लित बघून प्रीतीरसें ॥
॥ क्षितीश्वर मनःपयोनिधिस पूर आला असे ॥
॥ सुमेघकर झांकिती मुखशशी तदा विभ्र तें ॥
॥ गमे नृपति बोलिला वचन पादपद्मांकिते॥ ४६ ॥

श्लोक (वसंततिलका.)

॥ चित्तप्रिये वद कशास्तव हुंदका हा ॥

---

१. संभाजी.

॥ होतेंच तें घटत मन्मनिं सत्य पाहा ॥
॥ शंभू असे बहुत दुष्ट मलाहि आहे ॥
॥ ठावें त्वदुक्त वच युक्तचि तत्वता हें ॥ ४७ ॥

**आर्या.**

॥ पत्युत्तर तें ऐकुन प्रकटे मुखचंद्रभा महा तेनें ॥
॥ गणुं चंद्रचंद्रिका ती राकेची शोभवी गृहातें जे ॥४८॥
॥ मंदस्मितवदनानें मुरका मारून कामुका जाई ॥
॥ देउन त्या क्षितिपाला प्रीतीचा नेटका मुका जाई ॥४९॥

**दिंडी.**

॥ स्त्रिया होत्या सुस्वरूप चार त्याला ॥
॥ सुगुणसंपन्ना सुकुलजात बाला ॥
॥ शंभु राजाराम हे पुत्र दोन ॥
॥ भूप संपत्तीवान पुत्रवान ॥ ५० ॥

**आर्या.**

॥ निंबाळकराची ती पहिली पत्नी सती सईबाई ॥
॥ शिरक्याची ती दुसरी चंद्रमुखी दिव्य सोयराबाई ॥५१॥
॥ पुतळाबाई तिसरी बहुआवडतीच मोहित्याची हो ॥
॥नृप सक्त तो तियेवर मृगनयना प्रीति मोहि त्याची हो॥५२॥
॥ अतृप्तकामा राहे प्रेमें सेवुन क्षितीपतीस सती ॥
॥ उपभोगाया गेली त्यासह ह्मणुनीच त्या पतीस सती ॥५३॥
॥ चवथी प्रसिद्ध नव्हती परि आवडतीहि ती असावी जी ॥
॥प्रौढवयीं ती केली यास्तव कवि बोल तो असा वी जी॥५४॥

**श्लोक ( शिखरिणी. )**

॥ अविंधांनीं केला प्रलय असुरातुल्य जगतीं ॥

॥ तदा धर्मोद्धारा शिव अवतरे थोर सुमती ॥
॥ अविद्या जो नाशी द्विजनिगमधर्मा जनक हा ॥
॥ दिसे राज्यस्थानीं परि नृप न तो सिद्धचि महा॥९५।

आर्या.

यशवर्णनीय ज्याचें त्या महिपानेंच एक भुवना कां ॥
तोषवुनी लसवावें समानतेनें मही भुवा नाका ॥ ९६ ॥

श्लोक ( इंद्रवज्रा. )

॥ दिगंतरा तोषवुनी जनांना ॥
॥ पोसून गोविप्र महीज नाना ॥
॥ अस्तास अर्कासम भूप जातो ॥
॥ भूषावया लोक पहा दुजा तो ॥ ९७ ॥

श्लोक ( मालिनी )

॥ चिरगत सन सोळाशांतलें साल ऐशीं ॥
॥ शिवनृपविलयाची जाण ही खूण ऐशी ॥
॥ अनल हवन राहे पावुनी पंचभूतीं ॥
॥ त्रिभुवनसुखभोक्ता तेंवि देवाविभूतीं ॥ ९८ ॥

श्लोक ( वसंततिलका.)

॥ कन्या द्वितीय रुचिरा कविराजबाला ॥
॥ मल्ली जिच्या जवळ या कविता रसाला ॥
॥ गुंफी गुणांत गजरे सुजनां सुशीला ॥
॥ ती ही जगीं प्रकटते शिवराजलीला ॥ ९९ ॥

दिंड्या.

॥ सुवर्णानें ही युक्त अलंकारें ॥
॥ दिव्यशृंगारें ललितशब्दभारें ॥

॥ हास्यकरुणायुत मंद मंद बोले ॥
॥ कदा छंदीं स्वानंदरसीं डोले ॥ ६० ॥
॥ अभुक्ता हे नव तरुण राजबाला ॥
॥ दिली दासी सेवेस सज्जनांला ॥
॥ तोषवो ही नवरंगगुणें त्यांतें ॥
॥ महानंदें देवोत सत्पदा ते ॥ ६१ ॥

**श्लोक** ( भुजंगप्रयात.)

॥ कवी वंदितो श्रोतियांच्या पदांतें ॥
॥ गुणा घेउनी दोष टाका सदा ते ॥
॥ असे यांत दीप्ती नवांही रसांची ॥
॥ परी हा नवा ग्रंथकर्त्ता तसाची ॥ ६२ ॥

**दिंडी.**

॥ महा सुखदा जगदीशकृपा लाधे ॥
॥ कृपेनें हा सुरसाळ पाक साधे ॥
॥ शिवें केली जगतांत राजलीला ॥
॥ ह्मणुन आली बहु धन्यता कवीला ॥ ६३ ॥

**समाप्त.**

# ह्या ग्रंथांत आलेल्या कठिण शब्दांचा कोश.

अ

**अंक.** मांडी, चिन्ह.
**अंकित.** चिन्हित, आश्रित.
**अंकोल.** पिस्त्याचें झाड.
**अखिल.** संपूर्ण, सकल.
**अगद.** औषध.
**अगम्य.** अतर्क्य.
**अघ.** पाप.
**अचल.** पर्वत.
**अज.** मेंढरूं.
**अंजनीतनय.** मारुती.
**अटवी.** अरण्य.
**अटन.** फिरणें.
**अंतक.** यम.
**अंत्यज.** अतिशूद्र.
**अधर.** ओंठ.
**अनंग.** मदन.
**अनन्यगतिक.** ज्यास दुसरी गति नाहीं असा.

अ

**अनर्घ्य.** अमोल.
**अनल.** अग्नि.
**अनिल.** वायु.
**अनुग.** सेवक.
**अन्वित.** युक्त.
**अंबर.** आकाश, वस्त्र.
**अंबु.** पाणी.
**अंबुज.** कमळ.
**अंबुद.** मेघ.
**अभुक्ता.** नउपभोगिलेली.
**अंभोज.** कमळ.
**अमर.** देव.
**अमा.** अमावास्या.
**अमित.** पुष्कळ.
**अमुप.** पुष्कळ.
**अमोघ.** निष्फळ न होणारा.
**अरविंद.** कमळ.
**अर्णव.** समुद्र.

अर्भक. मूल.
अलि. भ्रमर.
अवन. रक्षण.
अविद्या. पाप.
असित. काळें.
असि. तरवार.
असु. प्राण.
असुर. दैत्य.
अस्वादित. न स्वाद घेतलेलें
अहि: ज्वाळा, सर्प.
अहित. शत्रु.
अहींद्र. शेष.
अक्षि. डोळा.
आकर. खाण.
आक्रंदन. ओरडणें.
आख्या. नांव.
आजि. युद्ध.
आतळणें. स्पर्श करणें.
आनन. तोंड.
आपदा. संकट, दारिद्र्य.
आलय. स्थान.
आहव. युद्ध.

इ.

इंदिरा. लक्ष्मी.
इंदीवर. कमळ.
इभी. हत्तीण.
इक्षुदंड. ऊस.
ईश. ईश्वर.

उ.

उत्पाटन. उपटणें.
उदधि. समुद्र.
उद्भिज. वनस्पति.
उद्यम. उद्योग.
उद्यान. बाग.
उत्पळ. कमळ.
उन्मद. माजलेले.
उन्माद. मस्ती.
उदित. भाषण.
उरोज. स्तन.
उष्ट्र. उंट.
ऊरु. मांडी.

औ.

औषधीनाथ. चंद्र.

क.

कंज. कमळ.
कटक. सैन्य, भूषणवि०
कंटक. कांटे.
कदन. नाश.
कंडन. कांडण.
कनक. सोनें.
कथिका. कढी.
कंदर्प. मदन.

करी. हत्ती.
कलहंस. राजहंस.
कांचन. सोनें.
कांड. बाण.
कातराक्ष. भयाभीत.
कांतार. अरण्य.
कानन. अरण्य.
कामारि. शिव.
कामुक. इच्छा करणारा
काय. देह.
कार्मुक. धनुष्य.
कारा. बंदीशाळा.
कास. आश्रय, कंबर.
किंकर. चाकर.
किन्नर. उपदेव.
कीर. पोपट,
कुंज. दाट झाडी.
कुंजर. हत्ती.
कुंतल. केश.
कुमुदिनी. कमळिणी.
कुरंग. हरिण.
कुसुमशर. मदन.
केतकी. केवडा.
केलि. क्रीडा.
केसरी. सिंह.
कोदंड. धनुष्य.
कोलाहल. गलबला.
कोश. खजीना, कळा.
कृपाण. शस्त्र वि०
कृशकटी. सिंह.
कृष्णांबर. काळें वस्त्र.
क्रुद्धमन्यु. रागावलेला.

ख.

खग. पक्षी, सूर्य, ग्रह.
खगराज. गरुड.
खगेंद्र. गरुड.
खड्ग. शस्त्र.
खद्योत. काजवा.
खर्जुरी. खारकेचें झाड.
ख्याति. कीर्ति.
खेव. आलिंगन.

ग.

गजनगर. दिल्लीशहर.
गजेंद्र. हत्ती.
गण. समुदाय.
गाजी. शूर.
गाधिज. विश्वामित्र.
गात्र. आंग.
गिरा. वाणी.
गुण. दोरी, सद्गुण.
गेह. घर.
गोप्ता. संरक्षक.

गोपुर. दरवाजा.
गोद्विष. गाईचा द्वेष करणारे (यवन).
गौतमी. गाय.

घ.

घन. मेघ, दाट, गर्द.

च.

चक्रवर्ती. सार्वभौम राजा.
चंड. प्रचंड.
चंडी. देवी.
चंडांशु. सूर्य.
चंद्रमा. चंद्र.
चंद्रमाभा. चंद्रासारखी जिची कांति ती.
चंद्रविरही. चकोरपक्षी.
चंद्रशेखर. शिव.
चंद्रिका. चांदणें.
चपला. वीज.
चंपा—चंपक. चापा.
चमू. सेना.
चर्म. ढाल, कातडें.
चाप. धनुष्य.
चामरी—चमरी. चंवरी.
चारु. सुंदर.
चापपाणि. धनुर्धारी.
चिर. चिरकाल.
चूर्णिका. गद्य.
चूडामणि. मुख्य.

ज.

जडत्व. अज्ञान.
जलद. मेघ.
जवन. तरुण.
जव. वेग.
जंबीर. इडनिंबाचें झाड.
जंबुक. कोल्हा.
जाति. जाई, जात.
जान्हवी. भागीरथी.
जाल. जाळें, समुदाय.
जीवन. पाणी, उपजीविक
जेमन. जेवण.

झ.

झल्लरी. झांज.
झष. मासा.

त.

तटाक. कांठ.
तडाग. तलाव.
तन्वी. सुकुमार स्त्री.
तन्वंगी. कोमळ स्त्री.
तपन. सूर्य.
तति. समुदाय.
तम. अंधार.
तत्वता. खरोखर-

तरी. उतार.
तरु. वृक्ष.
तामस. तमोगुणी.
तामरस. कमळ.
तारानायक. चंद्र.
ताराप. चंद्र.
तिमिर. अंधःकार.
तुंबळ. मोठा.
तुरंग–तुरग. घोडा.
तूल. कापूस.
तोय. पाणी.
तोतया. खोटा.
त्रिदिव. स्वर्ग.
त्रिपुरारि. शिव.
त्वत्. तुझा.

**थ.**

थिल्लिर. ओहोळ.

**द.**

दंडधारी. राजा.
दर्प. धाक, गर्व.
दर्पण. आरसा.
दशकंधर. रावण.
दानव. राक्षस.
दारुण. भयंकर.
दारा. स्त्री.
दायाद. शत्रु.
दिक्. दिशा.
दिग्वधू. दिशारूप स्त्री.
दिग्पति. दिग्पाळ.
दिनमणि. सूर्य.
दिव. स्वर्ग.
दिवाभीत. घुबड.
दुर्मद. दुष्टपणा, दुष्ट.
दुर्ग. किल्ला.
दोला. झोपाळा.
द्विज. ब्राह्मण.
द्विजद्विष. ब्राह्मणाचे वैरी, (यवन).
द्विष. द्वेष करणारे.
द्विप. हत्ती.
द्विपारि. सिंह.
द्विजराज. चंद्र.
द्रुम. वृक्ष.

**ध.**

धवली. पांढरी.
धी. बुद्धि.
धीवर. मासे धरणारा.
धाता. ब्रह्मदेव.
धाम. घर, तेज.
धूम. धूर.

**न.**

नग. पर्वत, दागिना.

नगकन्यका. पार्वती.
नगारि. इंद्र.
नभ. आकाश.
नभप्रयाणी. आकाशांतून चालणारा.
नय. न्याय.
नंदन. इंद्राची बाग.
नर्तन. नृत्य.
नरोत्तम. राजा.
नलिनी. कमळिणी.
नाक. स्वर्ग.
नाकेश. इंद्र.
निका. खरा.
निगम. वेद.
निधान. रत्न.
निदान. कारण, चिकित्सा.
निवटी. मारी.
नितंब. कटिपश्चाद्भाग.
नितंबिनी. स्त्री.
निशा, निशी. रात्र.
निष्काम. विनाकारण.
नूपुर. पादभूषण.
नेटका. चांगला.

प.

पंक. चिखल.
पंकज. कमळ.
पंचशर. मदन.
पट. वस्त्र.
पथ. रस्ता.
पद. पाय,स्थान,नांव,प्रदेश.
पद्म. कमळ.
पद्महस्ती. कमळासारखे हात जिचे ती.
पन्नग. सर्प.
पयोनिधि. समुद्र.
पयस्विनी. गाय.
पर. शत्रु, दुसरा.
परिरंभण. आलिंगन.
परिपंथी. शत्रु.
पराग. पुष्पांतील भूस.
परेश. ईश्वर.
पल्वल. डोहो.
पशुप. महादेव.
पवि. वज्र.
पवन. वारा.
पांडुर. पांढरा.
पातली. आली.
पार्थिव. राजा.
पावक. अग्नि.
पादप. झाड.
पिक. कोकिळा.

पिंड. शरीर.
पीत. पिंवळें.
पीनु. मांसल.पुष्ट.
पीयूष. अमृत.
पूत. पवित्र, पुत्र.
पुंगव. वाघ, श्रेष्ठ.
पुष्पचाप, पुष्पधन्वा. मदन.
पूरित. भरलेला.
पृतना. सेना.
प्रकाम. मोठें.
प्रगल्भ. प्रौढ.
प्रणत. दीन.
प्रतिपक्ष. शत्रु.
प्रमत्त. उन्मत्त.
प्रमाद. गर्व.
प्रमोद. आनंद.
प्रदान. देणें.
प्रबंध. छंद.
प्रभाव. अतिशयता,अतित्व.
प्रासिताजि. युद्धास तयार झालेला.
प्राचीदिशा. पूर्व.
प्रादुर्भाव. झपाटा. उत्पत्ति.
प्रावृट्काळ. पर्जन्यकाळ.
प्रासाद. वाडा.
प्रेक्षण. पाहणें.

फ.

फणी. सर्प.

ब.

बिडाळ. मांजर.
बुध. शहाणा.
बाष्प. अश्रु.

भ.

भगण. नक्षत्रें.
भट. योद्धा.
भद्र. कल्याण.
भव. संसार.
भद्रजाती. हत्ती.
भा. कांति.
भाती. शोभते.
भार. समुदाय, ओझें.
भास्वत्. सूर्य.
भीरु. स्त्री. भित्रा.
भुजंगम. सर्प.
भुव. पाताळ.
भूचर. पृथ्वीवर चालणारे.
भूधर. राजा, शेष.
भूसुर. ब्राह्मण.
भूषा. भूषण.
भेक. बेडूक.
भेद. कपट, युद्ध.
भोगी. सर्प.

भृत्य. चाकर.

म.

मकरंद. पुष्परस.
मंडित. भूषित.
मंडूक. बेडूक.
मणिकंधर. रामचंद्र.
मदनबाण. गुलछबू.
मंदाकिनी. भागीरथी.
मद. गर्व.
मदिरा. मद्य.
मधुप. भ्रमर.
मधुकरी. भ्रमरी.
मर्दन. मारणें.
मरंद. पुष्परस.
मरंदालय. कमळ.
मन्मथ. मदन.
मराळी. हंसी.
महीज. प्राणी.
मल्ली. मोगऱ्याच्या कळ्या.
मरुत्वान्. इंद्र.
मत्. माझें.
मा. लक्ष्मी.
मात. गोष्ट.
मातंग. हत्ती. चांडाल.
मातंगज. चांडालापासून जन्मलेला.
मार्तंड. सूर्य.
माया. कपट. देवी. खोटें ममता. कला. लीला.
मार. मदन.
माहर. लक्षी हरण करणारा
मिलिंद. भ्रमर.
मिसी. दांतवण.
मुमुक्षु. मुक्ति इच्छिणारा.
मूषक. उंदीर.
मुक्तकामी. मोकळे होऊं इच्छिणारे.
मृगराज. सिंह.
मृण्मिश्र. मातीनें मिसळलेलें
मृगी. हरणी.

य.

यवनद्विष. यवनांचा द्वेष करणारा.
यातु. राक्षस.
यातुधान. राक्षस.
यातुप. राक्षसेंद्र.
यान. वहन.
याम. प्रहर.
यामिनी. रात्र.
याम्य. दक्षिण.
योध. योद्धा.
युत. युक्त.

यौवन. तारुण्य.

र.

रंग. सभा, आनंद.
रजत. रुपें.
रजनी. रात्र.
रजनीपति. चंद्र.
रज्जु. दोर.
रण. युद्ध, युद्धभूमि.
रति. मदनस्त्री, नशीब, सुरत.
रतो. लागो.
रक्तोत्पल. लाल कमळ.
रद. दांत.
रंभा. केळ, अप्सरा.
रंभोरु. केळीच्या खांबासारख्या जिच्या मांड्या ती.
रमा. लक्ष्मी.
रमण. नवरा, क्रीडा.
रव. शब्द.
रसद्र. रसभरित.
रसना. जीभ.
रसज्ञ. रस जाणणारा.
रसा. पृथ्वी.
राका. पूर्णिमा.
राकेश. पूर्णचंद्र.
राजस. रजोगुणी.
राजमान शोभिवंत.
राजीव. कमळ.
राजी. ओळ. प्रसन्न.
राजे. शोभे.
रिपु. शत्रु.
रुचि. शोभा.
रुचिर. शोभिवंत.
रुह. झाड.
रोप. बाण.
रोम. केश.

ल.

लपन. मुख.
लपित. भाषण.
ललित. स्त्रियांचे भाव.
लव. थोडें.
लसे. शोभे.
लालन. रंजन, पालन.
लालसा. इच्छा.
लिखित लेख.
लेपित. भरलेलें.
लोह. लोखंड.

व.

वक्त्र. तोंड.
वच. शब्द.
वचका. भय.
वर्धिष्णु. वाढणारा.
वधू. स्त्री, मुलगी.

वन. पाणी.
वनमाळी. श्रीकृष्ण.
वनग. वनचर.
वनिता. स्त्री.
वर. श्रेष्ठ, योग्य, पति.
वप्र. पर्वताचा कडा.
वरणें. अंगीकारणें, देणें.
वरद. वर देणारा.
वंश. वेळू.
वसन. वस्त्र.
वसुमती. पृथ्वी.
वहिला. लौकर, वेगळा.
वानवा. संशय.
वायुपुत्र. मारुती.
वारि. पाणी.
वारण. हत्ती.
वारिधि. समुद्र.
वात्सल्य. ममतेचें पोषण.
विघ्नेश्वर. गणपति.
विक्रम. पराक्रम.
विजडा. निर्जिव.
वितान. छत चांदवा.
विद्रुम. पोंवळें.
विंधी. } मारी.
विद्धी. }
विधान. अस्तित्व संभव.
विधु. चंद्र
विध्यंड. ब्रह्मांड.
विधि. ब्रह्मदेव.
विपक्ष. शत्रु
विपिन. रान.
विप्र. ब्राह्मण.
विपति. गरुड.
विराजे. शोभे.
विलसे. शोभे.
विशिख. मुसलमान.
विभु. प्रभु, व्यापार.
विश्वकाय. ईश्वर.
विश्वाधिपति. ईश्वर.
विशारद. हुशार.
विषाद. खिन्नता.
विहंग. पक्षी.
विहित. योग्य.
विक्षय. नाश.
वी. प्रसवतो, (बोलतो).
वीरज. वीरापासून जन्मलेला.
वीर्य. पराक्रम.
वेदप. ब्राह्मण.
वैदिक. वेदपाठक.
वैदर्भ. वऱ्हाडदेश.
वृक. लांडगा.

वृत्ति. उपजीविका.
वृंद. समुदाय.
वृंदावन. गोकुळ.
वृत्र. दैत्यविशेष.
वृष. बैल.
वृष्टि. पर्जन्य.
व्यसन. संकट.
व्यामोहर्ती. मोहती.
व्याळ. सर्प.
व्योम. आकाश.
व्रज. समुदाय, गोकुळ.
त्वत्. तुझें.
व्रीडा. लज्जा.
व्रीडाकार. लज्जास्पद.

## श.

शकल. तुकडे.
शतघ्नी. तोफ.
शर. बाण.
शव. प्रेत.
शशक. ससा.
शशांक. चंद्र.
शशी. चंद्र.
शहाजादी. राजकन्या.
शार्दूल. वाघ.
शारदा. बुद्धि.
शाली. शोभणारा.
शिखा. शेंडी.
शिखी. अग्नि.
शिखानष्ट. मुसल्मान.
शिबंदी. फौज.
शिव. कल्याण, महादेव, शिवाजी.
शुक. पोपट.
शुनक. कुत्रा.
शुभ. कल्याण.
शुभांगी. सुंदर अंगाची.
शुभी. आनंद देणारी.
शेखी. शेवटीं.
शैल. पर्वत.
शोणित. रक्त.
श्रांत. थकलेला.
श्याम. काळा.
शृंगार. पोषाख, शृंगाररस.
शृगाल. कोल्हा.
श्रीश. ईश्वर.
श्रुतिपाठक. वैदिक.
श्वान. कुत्रा.
श्वापद. जनावर.

## ष.

षट्पद. भ्रमर.

## स.

सक्त. आसक्त.

**सकाना.** कानासह.
**संगर.** युद्ध.
**संग्राम.** युद्ध.
**संघ.** समुदाय.
**सज्ज.** तयार.
**सटा.** जटा.
**सत्.** चांगलें.
**सत्व.** प्राणी.
**सत्र.** यज्ञ.
**सत्राण.** बळानें.
**सदन.** घर.
**सदंगी.** चांगल्या अंगाची.
**सदृश.** सारखा.
**सनातन.** देव.
**संपुट.** वाटी.
**सप्तति.** सत्तर.
**समर.** युद्ध.
**समीर.** वायु.
**सर.** तलाव.
**सरित्.** नदी.
**सर्वोत्तम.** ईश्वर.
**सलिल.** पाणी.
**सवितृ.** सूर्य.
**सस्मित.** गालांत हसणारा, अर्ध उमललेलें.
**सहस्त्रकर.** सूर्य.
**सादी.** स्वार.
**साम.** तह.
**सायक.** बाण.
**सार.** सारांश.
**सारसाक्षी.** ज्ञानी, पद्मनेत्रा.
**सारिका.** साळुंकी.
**सिंधु.** समुद्र.
**सुगडी.** चांगली.
**सुदती.** चांगल्या दांतांची स्त्री.
**सुम.** फूल.
**सुमन.** फूल, चांगलें मन.
**सुनील.** काळें.
**सुधा.** अमृत.
**सुभटी.** योग्य, चांगली.
**सुमंत.** प्रधान.
**सुमध्यमा.** जिची कंबर बारिक ती.
**सुर.** देव.
**सुरत.** क्रीडा.
**सुरराज.** इंद्र.
**सुरद्रुम.** कल्पवृक्ष.
**सुरवर.** देवश्रेष्ठ.
**सुराधिप.** इंद्र.
**सुरालय.** स्वर्ग.

सुरेंद्र. इंद्र.
सुभ्रू. चांगल्या भिवयांची स्त्री.
सुलतान. बादशाहा.
सुवर्ण. सोनें, चांगले वर्ण.
सूकर. डुकर.
सूदिलें. कैद केलें.
सेनिक, सैनिक. सेनापति.
सोदर. भाऊ.
सौदामिनी. वीज.
स्कंद. षडानन.
स्कंध. खांदा.
स्तोम. समुदाय.
स्नेह. तेल.
स्मित. हास्य, अर्ध उमललेलें.
स्यंदन. रथ.
स्पृहा. इच्छा.
स्त्रैण. कामी पुरुष.
स्वसा. बहीण.
स्वांत. अंतःकरण.

ह.

हत. मृत. मारलेला.
हय. घोडा.
हर. हरण करणारा.
हरि. सिंह.
हस्तनक्षत्रज. हस्तनक्षत्रीं उत्पन्न झालेले.
हाला. मद्य.
हालाहल. विष.
हितानुगामी. अनुकूल.
हुत. जळालेला.
हुताश. अग्नि.
हेम. सोनें.
हेमरंगी. सोन्यासारख्या रंगाची.
होरा. प्रश्न, दैव.
हृद्. ह्रदय.
ऱ्हद. डोहो.

क्ष.

क्षणायु. क्षणभर आयुष्याचा.
क्षमा. पृथ्वी, माफी.
क्षपा. रात्र.
क्षर. नाशवंत.
क्षाळिते. धुते.
क्षिति. पृथ्वी.
क्षितिप. राजा.
क्षितीश्वर. राजा.
क्षुद्र. क्षुल्लक.
क्षोभ. राग.

ज्ञ.

ज्ञात. अनुभविक.
ज्ञाति. जाति.